
महाराष्ट्राचे
शिल्पकार
पंडिता रमाबाई
डॉ. सिसिलिया कार्व्हालो
RAJA BADSAL
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

# पंडिता रमाबाई

डॉ. सिसिलिया कार्व्हालो

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : मे, २००७
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २९

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल, पुणे

किंमत : रु. ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

१९ व्या शतकामध्ये भारतामध्ये आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडून आल्याचे दिसते. इंग्रजांचा व ख्रिस्ती धर्माचा- प्रभाव, पाश्चिमात्य शिक्षणामुळे विचारांना मिळालेल्या नव्या दिशा, यामुळे अनेक परिवर्तनशील व्यक्तिमत्त्वांना हिंदू धर्म व चातुवर्ण्यावर आधारलेली समाज रचना याबद्दल पुनर्विचार करावासा वाटू लागला व त्याप्रमाणे त्याची पावले पडू लागली हे बौद्धिक स्थित्यंतर उच्चवर्णियांपासून तत्कालीन अस्पृश्य वर्गापर्यंत पोहोचले व त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे हिंदू धर्मातून विशेष करून ख्रिस्ती धर्माकडे ओढ घेण्याची प्रवृत्ती वाढू लागली. कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण कुटुंबात जन्मास आलेल्या रमाबाई डोंगरे यांचे व्यक्तिमत्त्व या विचारसरणीने प्रभावित झाल्यामुळे त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आणि तत्कालीन समाज रचनेमध्ये एक महत्त्वाचे परिवर्तनवादी पाऊल उचलले. धर्मांतरानंतर 'पंडिता रमाबाई' या नावाने त्या त्यांच्या विद्वत्तेमुळे ओळखू जाऊ लागल्या. पंडिता रमाबाईंनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तरी भारतीयत्वापासून, हिंदू धर्मातील उच्च तत्त्वज्ञानापासून फारकत घेतली नव्हती. त्यामुळेच त्यांनी जे सामाजिक व शैक्षणिक कार्य केले त्याचा पाया भारतीयत्व हाच राहिला. जे काम सावित्रीबाई फुले यांनी हिंदू धर्मामध्ये राहून पार पडले त्याच प्रतीचे कार्य पंडिता रमाबाईंनी धर्मांतरानंतरही तत्कालीन महाराष्ट्रामध्ये प्रभावीपणे पार पाडले. स्त्री स्वातंत्र्याचा उद्धार व विचार महाराष्ट्रामध्ये रमाबाईंनी त्या काळात प्रकर्षाने प्रगट केला असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

तत्कालीन समाजातील बालविधवा, निराधार स्त्रिया, स्त्रियांना घुसमटावयास लावणाऱ्या अनेक विषम चालीरिती, शिक्षणाचा अभाव, बालकांची उपेक्षा व एकूणच बहुजन समाजाची दुर्दशा याकडे पंडिता रमाबाईंनी केवळ समाजहितकारिणी म्हणून पाहिले नाही तर मातृत्वाच्या

वत्सल भावनेने या साऱ्यांचा जन्म पंडिता रमाबाईंच्या सुधारणावादी भूमिकेमध्ये असल्याचे आपणांस आढळून येते त्या दृष्टीने आजच्या महाराष्ट्राने त्यांचे सदैव ऋणाईत राहिले पाहिजे.

अशा या कर्तृत्ववान महिलेचे चरित्र 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे' प्रकाशित होत असलेल्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालेमध्ये लिहिण्याची कामगिरी मराठीतील सिद्धहस्त लेखिका व कवयित्री डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी पं. रमाबाईंचे हे चरित्र आत्मीयतेने लिहून पूर्ण केले. हे चरित्र आजही महाराष्ट्रातील महिला वर्गालाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकालाही उद्बोधक वाटेल यात मंडळाला शंका वाटत नाही. हे पुस्तक प्रकाशित करण्याचा सुयोग मंडळाला लाभला याबद्दल मी धन्यता व्यक्त करतो.

**मधु मंगेश कर्णिक**

मुंबई
अध्यक्ष
२३ फेब्रुवारी, २००७
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## प्रस्तावना

आज व्यक्ती आणि समाज यांच्याकडे बघण्याचा व्यापक, जाती-धर्म-लिंग भेदातीत असा दृष्टिकोन बळावत चाललेला आहे. परंतु दीडशे-दोनशे वर्षापूर्वी जाती-धर्म व्यवस्थेचा विलक्षण पगडा समाजमनावर होता. एकीकडे 'जागतिक खेड्या' ची संकल्पना वाढीस लागलेली आहे; तर दुसरीकडे मूलतत्त्ववाद बोकाळत चाललेला आहे. एकीकडे स्त्री देहाची विटंबना, देहप्रदर्शन, बाजारूवृत्ती बळावत चाललेली आहे. एकीकडे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झालेली आहेत; तर दुसरीकडे स्त्रीचा घर आणि नोकरी सांभाळताना गोंधळ उडालेला आहे. एकीकडे स्वेच्छा व सक्तीच्या निवृत्तीचे प्रस्थ, गिरण्या-कारखान्यांना बसणारे टाळे यामुळे पुरुषाला घरी बसण्याची वेळ आलेली आहे, तर घर चालवण्यासाठी, अर्थार्जन करण्यासाठी स्त्रियांना घराबाहेर पडण्याची वेळ आलेली आहे. यातून उद्भवणाऱ्या संघर्षातून कुटुंबव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ लागलेला आहे. या परस्परविरोधी घटना सुज्ञांस विचार करायला लावणाऱ्या आहेत. तशाच संघर्षातून यथायोग्य निर्णयही घ्यावयास लावणाऱ्या आहेत.

दोनशे वर्षापूर्वीच्या धार्मिक सामाजिक परिस्थितीत स्त्रियांना करावा लागणारा संघर्ष आणि विकासाची दारे सताड उघडलेली असताना आत्मविकासासाठी व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्त्रियांना करावा लागणारा संघर्षही विलक्षण आहे. त्यामुळे त्या काळातील व्यक्तींनी, काळाचं आव्हान कसं स्वीकारलं आणि काळाला आव्हान कसं दिलं, हे पाहण उद्बोधक आहे. आज धर्मनिरपेक्ष दृष्टिकोणातून त्या व्यक्तींकडे, त्यांच्या कार्याकडे पाहिलं, की त्यांचे थोरपण विशेषत्वाने जाणवते.

कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण कुटुंबात जन्मास आलेल्या रमाबाई डोंगरे, यांच्या जीवनात घडलेली स्थित्यंतरे म्हणजे त्यांनी काळाच्या हाकेला दिलेली उत्तरे होती. रमा डोंगरे, पंडिता रमाबाई सरस्वती,

रमाबाई डोंगरे-मेधावी, मेरी रमा अशा स्थित्यंतरातून आज पंडिता रमाबाई म्हणून त्या सर्वांना परिचित आहेत. हिंदूधर्म, भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञानावर पोसला गेलेला रमाबाईंचा पिंड ख्रिस्ती धर्मस्वीकारानंतरही आहार-विहार-पोषाख यातही पूर्णपणे भारतीयच राहिला. पंडिता रमाबाईंनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे हिंदू धर्मियांमध्ये नाराजी उमटली. रमाबाई ख्रिस्ती झाल्या; परंतु ख्रिस्ती धर्मातील कोणत्या पंथाचे वा धर्माधिकाऱ्याचे अधिपत्य त्यांनी स्वीकारले नाही. त्यामुळे ख्रिस्ती धर्मियांनीही त्यांना फारसे आपलेसे केले नाही. तरीही या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव महाराष्ट्रावर राहिला.

कवी रेव्ह. नारायण वामन टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक यांना ख्रिस्ती धर्मातील अनेक पंथियांनी स्वीकारलं. नारायण वामन टिळक यांनी ख्रिस्ती धर्माच्या भारतीयीकरणाला महत्त्व दिले. कविवृत्तीचे असल्यामुळे भजन कीर्तन या भारतीय पूजापद्धतीने त्यांनी भारतीय ख्रिस्ती व परदेशी ख्रिस्तप्रसारकांच्या हृदयाला हात घातला होता. लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या मिस्कील स्वभावाने व लेखनाने अनेकांना जिंकले होते. त्यामुळे हे टिळक दांपत्य मराठी समाजालाही परके वाटले नाही. पंडिता रमाबाई कवयित्री असल्या ; तरी सामाजिक कार्याबाबत त्यांच्या विचारांची धार प्रखर होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आलेली, अत्यंत स्वच्छ व स्पष्ट विचार व चारित्र्याची एक तरुण विधवा, कर्मठ समाजाला आव्हान देते. 'बायबल' सारखा ख्रिस्ती धर्मग्रंथ, एकटीच्या बळावर, मराठीत भाषांतर करायला घेत, त्यातही भारतीय धर्माच्या संकल्पना नाकारीत पूर्णत्वास नेते, ही तिची ताकद अजमावता पुरुषप्रधान संस्कृतीची दमछाक झाली असणार. अन्य कुणा पुरुषाला आपलं मानण्यापेक्षा, त्या ख्रिस्तालाच आपलं मानतात. याबाबतीत रमाबाईंची तुलना संत मीराबाईंशी होऊ शकेल. धर्मग्रंथांचा पगडा असलेल्या पुरुषप्रधान मानसिकतेला दिलेल्या आव्हानामुळे हिंदू व ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांचा पुरुषी अंहकार दुखावला गेला होता. त्यामुळे रमाबाईंच्या

विरोधात रण माजले. रमाबाईंनी खिस्ती धर्मात प्रवेश केल्यामुळे वैदिक धर्माचे अभिमानी असलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचाही रमाबाईंवर रोष होता. आपल्या समाजासाठी एका सभ्य, विद्वान स्त्रीने आपल्याच धर्माचा अवलंब करीत जीवन जगणे पसंत केले असते; तर खूप मोठे कार्य होऊ शकले असते. असा विश्वास लोकमान्य टिळकांना वाटत असला पाहिजे. तथापि याच धर्मातील दांभिकतेचा अनुभव गाठीस असल्याने रमाबाईंनी तो धर्म सोडला, हेही तितकेच खरे आहे.

कवी नारायण वामन टिळक यांच्याबरोबरही पंडिता रमाबाईंचा वाद झाला होता, तो खिस्ताला व खिस्तविचारांना भारतीय रंग चढविण्याबाबत! भारतीय भाषा संस्कृतीचा पुरस्कार करीत जगणाऱ्या पंडिता रमाबाईंनी खिस्तविचारांना भारतीय धर्मसंकल्पनांचा लेप लावण्यास नकार दिला. भारतीय संकल्पनांतून खिस्तविचार विकसित करण्यात काहीच गैर नाही अशी नारायण वामन टिळकांची भूमिका होती. रमाबाईंनी आरती-ओवी-अभंग हे रचनाप्रकार स्वीकारले; पण संकल्पना मात्र स्वीकारल्या नाहीत. हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, पुजाऱ्यांचा दांभिकपणा, देवापर्यंत पोहोचण्यास लागणारा मध्यस्थ, यापेक्षा, देवाशी थेट संवाद साधणं खिस्ती धर्मात शक्य आहे असे त्यांना वाटले. वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत आई-वडिल-बहीण-भाऊ यांच्या आधारावर रमाबाईंना त्यांच्या मृत्युनंतर स्वतःच्या निर्णयासाठी, दुसऱ्याच कोणावर विसंबून राहावं लागलं नाही. बालपणापासून भोगलेल्या प्रतिकूल परिस्थितीने त्यांना खंबीर मनाची, समतोल विचारशक्ती व विवेकाची देणगी मिळाली होती. त्यामुळे खिस्ताशी थेट संवाद साधणे त्यांना अधिक पसंत पडले असावे.

पुढे तर रमाबाईंनी आपला जीवनाधार म्हणून खिस्तालाच स्वीकारले. त्या खिस्तावर पूर्णपणे विसंबून राहू लागल्या. खिस्ताला त्यांनी इतके मानले, इतके जिवंत केले की त्यावर त्यांनी स्वतःचे चैतन्य जागते ठेवले. मान्यवर लेखक वि.द. घाटे म्हणतात, 'महाराष्ट्रात नारायण वामन

टिळक व पंडिता रमाबाई ख्रिस्ती झाले. पण त्यांनी ख्रिस्तालाच हिंदू केले.' पौर्वात्य देशातील ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म त्यांनी स्वीकारला खरा, पण भारतीय संस्कृतीला ते पारखे झाले नाहीत. या संदर्भात त्यांनी ख्रिस्ताला हिंदू अथवा भारतीय केले होते. आज हिंदू-ख्रिस्ती-मुसलमान या संकल्पना मुळावते आहे. हे सर्व धर्म शेवटी एकाच ईश्वराकडे जाणारे आहेत, हे लोकांना कळू लागले आहे. धर्मग्रंथांतील मिथकांना नवे अर्थ लावण्याचे प्रयत्न होत आहेत. शेवटी महिमा काळाचा असतो. हा काळ आपल्या कर्तृत्वाने गोठवण्याचा प्रयत्न प्रज्ञावंत करीत असतात. कवयित्री सरोजिनी नायडू यांनी पंडिता रमाबाईंना श्रद्धांजली अर्पण करताना काढलेले उद्गानर सूचक आहेत. त्या म्हणतात, 'पंडिता रमाबाई म्हणजे, भारतीय संतांच्या मालिकेतील एक ख्रिस्ती संत आहेत.' रमाबाईंचे हे संतत्व भारतीय मान्य करतात, यात संदेह नाही.

आज 'व्यक्तिस्वातंत्र्य' हे बदलत्या काळाचे ब्रीद बनले आहे. त्यामुळे एक व्यक्ति म्हणून, पंडिता रमाबाईंनी मांडलेले विचार आजही स्तुत्य व प्रेरणादायी आहेत. त्यामुळे त्यांच्या धर्मांतराने गैरसमज होण्याचा प्रश्न उद्भ वत नाही. पंडिता रमाबाई नामक एका मनस्विनीचे अंतरंग समजून घेताना असा कोणताही प्रत्यवाय उपस्थित होऊ नये असे वाटते.

'पंडिता रमाबाईः व्यक्तित्वः आणि साहित्य' असा माझा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. पंडिता रमाबाईंच्या साहित्यावर मी माझा एम्.फिल. चा शोधनिबंध, अर्थात प्रबंधिका लिहिली होती. त्यांच्या सामाजिक व आध्यात्मिक स्वरूपाच्या कार्यावर मला जास्त लक्ष केंद्रित करता येणे त्यावेळी शक्य नव्हते. पंडिता रमाबाईंना अनेक भाषा अवगत होत्या. विविध भाषातले त्यांचे साहित्य पाहिले तरी लक्षात येते, ती त्यांची समाजाविषयी, स्त्रियांविषयी त्यांना असलेली कळकळ समाजाच्या वैचारिक उत्थापनासाठी त्यांनी मांडलेले विचार आजही आपल्याला प्रभावीत करतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेत पंडिता रमाबाईंचे चरित्र लेखन

करण्यास सांगितले; तेव्हा पंडिता रमाबाईंच्या जीवनाचा व साहित्याचा पुनश्च धांडोळा घेताना, त्यांच्या कर्तृत्वाची, व्यक्तित्वाची, वैचारिकतेची आजही समाजाला गरज आहे याची जाणीव झाली. हे छोटेखानी चरित्र लिहिताना जो आनंद व जी प्रेरणा मिळाली, ती आजच्या पिढीलाही मिळेल अशी आशा आहे.

**-डॉ. सिसिलिया कार्व्हालो**
वसई

## अनुक्रमणिका


प्रस्तावना

१. स्त्री स्वातंत्र्याचा पहिला स्वर ------------ १

२. विद्युल्लतेचा जन्म ---------------------- ४

३. दुर्दैवाशी सामना ---------------------- ६

४. जया अंगी मोठेपण--------------------- ११

५. स्त्री उद्धाराच्या कार्याची सुरुवात---------- १६

६. परदेश प्रवास------------------------- २१

७. तळह्रदयातला स्त्रीचा आवाज------------ २६

८. बालविधवांना प्रेमाची ऊब---------------- ३२

९. दुष्काळग्रस्तांना मदतीचा आवाज---------- ३९

१०. 'मुक्तिसदन' मधील दिवस--------------- ४३

११. एक मनोरम वारसा-------------------- ५१

१२. चित्शक्तीचा प्रत्यय--------------------- ५५

१३. एकखांबी जेरुसालेम नगरी-------------- ५९

१४. मातृभूमीची सेवा----------------------- ६६

१५. निसर्गप्रेम---------------------------- ७४

१६. स्त्रीस्वातंत्र्याचा आविष्कार--------------- ८३

१७. कर्तृत्वशालिनी------------------------ ९९

पंडिता रमाबाईंचा जीवनपट-------------- १०४

पंडिता रमाबाईंची प्रसिद्ध झालेली पुस्तके---- १०६

## स्त्री-स्वातंत्र्याचा पहिला स्वर

१८६६ साली 'पायोनियर' या इंग्रजी वृत्तपत्रात एक बातमी प्रसिद्ध झाली होती. "अयोध्येत दक्षिणेतून एक मोठा पंडित आला आहे. त्याच्याबरोबर त्याची पत्नी, अठरा व आठ वर्षांच्या अशा दोन कन्या व सोळा वर्षांचा मुलगा आहेत, त्या सर्वांना कित्येक ग्रंथसुद्धा तोंडपाठ येतात. एका सभेत त्या पंडिताने हजारो श्लोक पाठ म्हटले. धाकट्या मुलीनेसुद्धा आपल्या वयाप्रमाणेच श्लोक स्पष्ट व सुंदर रीतीने म्हटले."

या बातमीत कुणाही व्यक्तीचे नाव दिलेले नाही. परंतु संस्कृतविद्या व भाषा पारंगत अशा अनंतशास्त्री डोंगरे यांच्या कुटुंबाविषयीची ही बातमी आहे. 'धाकटी मुलगी' म्हणजे रमाबाई आहेत. मराठी कुटुंबात जन्मास आलेल्या, संस्कृत भाषा अवगत केलेल्या रमेला पहिली प्रसिद्धी अशी एका इंग्रजी वृत्तपत्रात मिळाली आणि त्यांना त्याविषयी काही माहितीही नव्हती. त्यांचे पदभ्रमण चाललेलेच होते.

१८७८ साली जुलै महिन्यात मुंबईतील दैनिकात पुनश्च एक बातमी झळकली. 'हल्ली कोलकत्यास रमाबाई नावाची कोणी मराठी स्त्री आली आहे. तिने कलकत्त्यास काही दिवस मुक्काम करून तेथील विद्वान मंडळीस चकित करून सोडले आहे. बाई संस्कृत भाषा बोलते. जागच्या जागी संस्कृत काव्य करते. तिचे वय वीस वर्षांचे असून ती अविवाहित आहे. महाराष्ट्रीय असली तरी कर्नाटक प्रांतातून आली आहे.'

या बातमीने महाराष्ट्रात खळबळ उडाली. स्त्री असूनसुद्धा संस्कृत भाषा कशी शिकली ? अजूनही अविवाहित कशी ? कलकत्त्यापर्यंत मराठी बाई पोहोचली कशी ? ज्या काळात मुलीचा जन्म झाल्यास नाकं मुरडली जात होती. ज्या काळात बालविवाह होत होते. मुलीला अविवाहित ठेवणे पाप समजले जात होते, पतिनिधनानंतर सती जाण्यात धन्यता मानली जात होती. स्त्रीने शिक्षण घेणे, घराबाहेर-गावाबाहेर पडणे, प्रवास करणे निषिद्ध मानले जात होते, त्या काळात एका स्त्रीची

विद्वता बंगालसारखा पुरोगामी प्रांत स्वीकारतो. हे सारे मराठी समाजाला विस्मयचकित करणारे होते. ही दुसरी बातमी म्हणजे पंडिता रमाबाईंच्या स्त्रीशिक्षणविषयक व समाजोन्नतिविषयक त्याबरोबर साहित्यविषयक कार्याचा पूर्वसूर होता.

कलकत्ता ही त्यावेळी भारताची राजधानी होती. बंगाल हा सुधारणेत अग्रेसर असा प्रांत होता. राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, कालीचरण बॅनर्जी यासारख्या विचारवंतांनी ब्राह्मोसमाज स्थापन करून धर्म-स्त्री-समाजविषयक सुधारणेचे सूतोवाच केलेले होते. या पार्श्वभूमीवर रमा नामक तरुणीचे आपला भाऊ श्रीनिवास शास्त्री याच्याबरोबर १८७८ साली कलकत्त्यात आगमन झालेले होते. या दोघांनाही हा प्रांत अनोळखी होता. भारत भ्रमण करीत ते येथे आले होते. दोघेही संस्कृत भाषा व विद्या प्राप्त केलेले होते. ज्या काळात स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. त्या काळात वीस वर्षाच्या या तरुणीला अठरा हजार श्लोक मुखोद्गेत होते. भारतभ्रमण करीत ही भावंडं येथे आली होती. व एका विद्वत् सभेत आपल्या पांडित्याची प्रचिती तिने दिली होती.

कलकत्त्यात एका देवळात ही दोन्ही भावंडं आली. एका वस्त्रानिशी आलेल्या रमेने आपल्या संस्कृत ज्ञानाने व संभाषणाने चुणूक दाखविताच कलकत्ता शहरात ही बातमी वायुवेगाने पसरली. उपासमारीने कृश झालेल्या; परंतु ज्ञानाच्या तेजाची चमक असलेल्या त्यांच्या मुद्रेवरील भाव पुरोगामी कलकत्तावासियांनी ओळखले. एका तरुणीला धर्मग्रंथांचे ज्ञान आहे कळल्यावर कलकत्त्याच्या सिनेट हाऊसमध्ये त्यांच्या स्वागतासाठी एक खास जाहीर सभा आयोजित करण्यात आली. सभेत व्यासपीठावर प्रो. टाने, प्रो. गौ. पंडित महेशचंद्र न्यायरत्न बसले होते. प्रो. टोन यांनी इतर पंडितांच्या साहाय्याने स्वागतपर संस्कृत श्लोक रचला व म्हटले.

यया भवत्या चकितः पण्डिता ईदश्या वयम् |
ततो भव्यामहे साक्षात् वर्तते ऽत्र सरस्वती ||

(हे मोठमोठ्या पंडितांना थक्क करणाऱ्यास मुली; येथे साक्षात सरस्वती अवतरलेली आहे..)

ते पुढे म्हणाले 'मी स्वतः जरी म्लेंच्छ असलो; तरी मी आजपर्यंत पंडितांच्या विद्वतेचे प्रदर्शन पाहिले आहे. परंतु आपल्यासारखे उदाहरण प्रथमच पाहात आहे, काव्यरचनेतून आपली स्तुती करण्यास मी असमर्थ आहे. मी आपणास नमस्कार करतो.

यावर रमेने त्वरित परंतु नम्रपणे सत्काराला संस्कृतात उत्तर दिले.

नाहं सरस्वती साक्षात मन्यध्वे मां न शारदाम्

किंतु तस्याः सभामध्ये एको ऽहं परिचारिका.

(मी सरस्वती नाही वा शारदाही नाही. या सरस्वती मंदिरातील मी, विद्येची एक नम्र उपासक आहे. सेविका आहे.) तिच्या अस्खालित संस्कृत वाणीने सारी सभा अवाक् झाली. तिचे वक्तृत्व, कवित्व व पांडित्य पाहून तेथे उपस्थित असलेल्या विद्वानांनी या वीस वर्षीय तरुणीला 'पंडिता रमाबाई सरस्वती' हा किताब बहाल केला आणि रमाबाईंच्या आई-वडिलांनी तिला शिक्षण देण्यासाठी केलेल्या परिश्रमाने आणि प्रयासाचे, इतकी वर्षे सहन केलेल्या वनवासाचे आणि तपश्चर्येचे याप्रसंगी सार्थक झाले. याच क्षणापासून पंडिता रमाबाईंच्या समाजसुधारणेच्या कार्याला सुरूवात झाली. त्यानंतरच्या अनेक सभांमध्ये, पंडिता रमाबाईंनी प्राचीन कालातील स्त्रीला समाजात किती महत्त्वाचे स्थान होते, बालविवाहाने स्त्रियांच्या प्रगतीचे सर्व मार्ग कसे कुंठित झाले, असे स्पष्टपणे सांगायला सुरूवात केली. वैदिक वाङ्मरयाचा रमाबाईंचा गाढा अभ्यास होता. त्यांचे विचार ऐकून सभा दिपून जात असे. देशभक्त आनंद मोहनदास यांनी बोलविलेल्या एका सभेत रमाबाईंना बंगाली भाषेत मानपत्र देण्यात आले. इंग्रज आमदानीत स्त्रियांसाठी बोलविलेली ही पहिलीच सभा होती. स्त्रीच्या स्वतंत्र विचाराचा पहिला स्वर... असा घराबाहेरील.. सामाजित मेळाव्यात, उमटला अन् त्या अनंतात विलीन होईपर्यंत घुमतच राहिला.

# विद्युल्लतेचा जन्म

अनंतशास्त्री डोंगरे हे म्हैसूर संस्थानातील माळहेरंब येथील रहिवासी होते. ते वेदाध्ययन व शेती करणारे कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण होते. प्रचलित पद्धतीनुसार, एका बालिकेशी त्यांचा विवाह झाला होता. पुढे ही मुलगी मरण पावली. अनंतशास्त्री यांना विद्याप्राप्तीची आस होती. त्यामुळे घरातील कटकटींपासून पळून जाऊन त्यांनी श्रृंगेरीच्या शंकराचार्यांच्या मठात प्रवेश केला. तेथून त्यांनी पुणे गाठले. दुसऱ्या बाजीरावांचे गुरू वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री साठे यांचे ते शिष्य बनले.

रामचंद्रशास्त्री पुण्यातील पेशव्यांच्या राजवाड्यात राजघराण्यातील स्त्रियांना संस्कृत शिकविण्यासाठी जात. तो काळ असा होता की, सर्वसामान्य वर्गातील स्त्रियांना शिकविले जात नसे. तशी सोयही नव्हती. राजघराण्यातील स्त्रिया थोड्या फार शिकत.

पेशव्यांच्या राजवाड्यात बाजीरावांच्या पत्नी वाराणशीबाई यांना साठेशास्त्री संस्कृत 'रघुवंश' शिकवीत. आपल्या गुरुंबरोबर अनंतशास्त्र्यांनीही राजवाड्यात अनेकदा प्रवेश केलेला होता. वाराणशीबाईंना संस्कृत श्लोक म्हणताना त्यांनी पाहिले, ऐकले, तेव्हाच त्यांनी मनाशी निश्चय केला, की, आपल्या पत्नीलाही संस्कृत शिकवायचे. त्या काळातला, त्यांच्यापुरता तरी हा निर्णय धाडसीच म्हणायला हवा.

आपल्या घरात योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने अनंतशास्त्री घराबाहेर पडले होते. दहा वर्षेपर्यंत ते घराबाहेर होते. कालांतराने आपल्या गावी, मंगलोरला परतत असताना; ते पैठण गावी थांबले होते. तेथे माधवराव अभ्यंकर या एका ब्राह्मणाशी त्यांची भेट झाली. अभ्यंकर कुटुंब काशीयात्रेला निघाले होते. अनंतशास्त्री विधुर आहेत हे कळल्यावर त्यांनी आपल्या उपवर मुलीचा हात हातात घेण्यास त्यांना विनंती केली. अनंतशास्त्रींनी त्यांना होकार दिला, व अभ्यंकरांची अंबा नावाची मुलगी लक्ष्मीबाई झाली.

अनंतशास्त्री परंपरावादी असूनही सुधारकी प्रवृत्तीचे होते. धर्मशास्त्राला अनुसरून जरी ते जगत होते, तरी आपल्या पत्नीला संस्कृत धर्मग्रंथातील ज्ञानही देत होते. त्यांचे हे वागणे एका पंडिताने त्यांच्या गुरूला सांगितले. गुरूंनी त्यांना आपल्या समोर उभे राहून पंडितांच्या सभेत आपण केलेल्या 'पापा' ची, म्हणजे बाईला धर्मग्रंथ शिकविले; या पापाची कबुली द्यावी असे सांगितले. त्याप्रमाणे अनंतशास्त्री त्यांच्यासमोर हजर झाले. आपल्या पत्नीला आपण का शिकवितो, व त्यात काही गैर नाही, हे त्यांनी चारशे पंडितांच्या समोर सांगितले. त्यांना आपण धर्मग्रंथांतील अवतरणे शिकवितो. श्रुती, स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत इ. चा अभ्यास करण्याचा स्त्रियांना अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या गुरूचे मन वळविण्यात अनंतशास्त्री यशस्वी झाले व स्त्रीशिक्षणाचा मार्ग त्यांनी खुला केला.

अनंतशास्त्री मंगलोरला राहात असत. परंतु म्हैसूरच्या सीमेवर, पश्चिम घाटाच्या शिखरावरील गंगामूळ या डोंगराळ प्रदेशात हे डोंगरे कुटुंब येऊन राहिले. याठिकाणी त्यांना खडतर दिवस कंठावे लागले. येथे हिंस्त्र श्वापदांचे भय असे. तथापि याच ठिकाणी तुंगभद्रेच्या तीरावर वयाने छोट्या असलेल्या लक्ष्मीबाईंच्या तोंडून संस्कृतचे समधुर स्वर उमटत राहिले. संस्कृत शिकण्यास लक्ष्मीबाईंनी अनंतशास्त्र्यांना चांगला प्रतिसाद दिला.

अनंतशास्त्रीनी याच ठिकाणी एक छोटेसे घर बांधले. भातशेती व नारळाची लागवड यावर त्यांचा उदरनिर्वाह चाले. तीर्थक्षेत्राची जागा असल्याने अनेक यात्रेकरू येथे येत. अनंतशास्त्री स्वतः त्यांची सेवा करण्यास सिद्ध असत. तेरा वर्षेपर्यंत ते येथेच राहात होते. गंगामूळ गावी त्यांचे कुटुंब विस्तारत गेले. त्यांनी सहा मुलं झाली. कृष्णाबाई (१८४९) श्रीनिवास (१८५०) आणि रमाबाई (१८५८) अशी तीन अपत्ये जगली. बाकीची तीन लहानपणीच मरण पावली. रमाबाईंचा जन्मदिवस २३ एप्रिल होता.

यात्रेकरूंना दानधर्म करण्यात अनंतशास्त्रींनी आपली संपत्ती घालवली. त्यामुळे गंगामूळ सोडून आपल्या कुटुंबासह त्यांना तीर्थयात्रा करीत फिरावे लगाले. त्यावेळी रमा फक्त सहा महिन्यांची होती. घर सोडताना त्यांनी रमेला एका वेताच्या टोपलीत घालून एकाच्या डोक्यावर ती टोपली दिली होती. रमाबाईंच्या आयुष्यातील प्रवास असा सुरू झाला. या प्रवासानेच तिला अनुभवसमुद्ध बनविले. नंतर तर तिच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन साऱ्या जगाने तिला डोक्यावर घेतले.

# दुर्दैवाशी सामना

अनंतशास्त्री आपल्या परिवारासह दक्षिण भारताच्या कोनाकोपऱ्यात भ्रमण करीत होते. कुठेतरी देवळात उतरून पुराणे वाचून जपजाप्य करून दररोजचे अन्न मिळवीत असत. या काळात अनंतशास्त्री व लक्ष्मीबाई यांनी आपल्या मुलांचे शिक्षणही केले. अनंतशास्त्रींचा दुसरा विवाह वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी झाला होता. वाढत्या परिवाराच्या विवंचनानी ते आता थकत चालले होते. संस्कृत विद्यासंपन्न असलेल्या लक्ष्मीबाईंनी या विद्येचे बाळकडू रमेला पाजायला सुरूवात केली होती. रमेच्या तल्लख बुद्धीने अवघ्या बाराव्या वर्षी अठरा हजार श्लोक मुखोद्गदत केले होते. 'पायोनियर' वृत्तपत्राने १८६६ साली दिलेली बातमी रमाबाईसंबंधीची होती. वयाच्या आठव्या वर्षी आपल्या बापाप्रमाणेच सुंदर व स्पष्ट श्लोक ती उच्चारू लागलेली होती.

आईबाबांच्या सहवासाबरोबरच निसर्गाच्या खुल्या शाळेत विविध अनुभवांचे शिक्षण रमेला मिळत गेले. निसर्ग-पशु-पक्षी यांच्या सहवासामुळेच तिच्यातील कविवृत्तीला खतपाणी मिळत गेले असावे. तसेच कौटुंबिक व सामाजिक प्रतिकूलतेच्या धगीत तावून सुलाखून तिचे व्यक्तिमत्त्व समृद्ध बनत गेले.

अनंतशास्त्रींना धर्मग्रंथ जरी अवगत असले, तरी केवळ ब्राह्मण असल्यामुळे अंगमेहनतीचे काम ते करू शकत नव्हते. जो काही थोडाथोडका पैसा कमवलेला होता; तो देवाब्राह्मणांना दान करण्यात त्यांनी घालवला होता. घरातील मूल्यवान वस्तू त्यांना विकाव्या लागल्या होत्या. हातात काही चांदीची व तांब्याची नाणी तेवढी उरली होती. कीडलेले अन्न ते विकत आणीत आणि शिजवून खात. नंतर तर असे दिवस आले की, घरात एक दाणाही शिल्लक राहिला नाही. परिस्थिती इतकी पराकोटीची प्रतिकूल होती; की, उपासमारीने आपल्या डोळ्यांनी आपला मृत्यु बघणे त्यांच्या हातात राहिले होते. मग कुटुंबातील

साऱ्यांनीच ठरविले; की, दारिद्र्यात खितपत इथे मरण्यापेक्षा कुणाच्या नजरेस येणार नाहीत; अशा जंगलात जाऊन तेथेच मरायचे.

गंगामूळसारख्या निर्जन प्रदेशात लक्ष्मीबाईंच्या व श्रीनिवास व रमेच्या संस्कृत अध्ययनाचे सूर घुमले होते. या अनौपचारिक शिक्षणाचा त्यांच्या पोटापाण्यासाठी त्यांना उपयोग करता येत नव्हता. शेवटी मृत्युची प्रतिक्षा करण्यासाठी त्यांना निर्जन अशा जंगलात जाणे भाग पडले.

व्यंकटगिरीच्या शिखरावर वसलेल्या तिरूपतीसारख्या पवित्र क्षेत्रातील आपले वास्तव्य सोडून अनंतशास्त्रीचे कुटुंब केवळ मृत्युच्या शोधात घनदाट जंगलात आले. अकरा रात्री आणि दिवस ते केवळ जंगली खजूर, पाने खाऊन व पाणी पिऊन राहिले. शारीरिक व मानसिक यातनांतून जात ते जगत होते. अनंतशास्त्री खूप म्हातारे व अशक्त झाले होते. त्यांना अंधत्व आलेले होते. एखाद्या पवित्र कुंडात उडी घेऊन जीव देण्याचा विचार ते करीत होते. कुटुंबातील इतरांनीही त्याच पद्धतीने आत्महत्या करावी वा आपापल्या वाटेने निघून जावे असा विचार त्यांनी केला होता. हिंदूधर्मशास्त्रानुसार पवित्र कुंडात बुडी मारून जीव देणे आत्महत्या समजली जात नव्हती. त्यामुळे हाच मार्ग सर्वांना व्यवहार्य वाटला. त्यामुळे अनंतशास्त्रींनी प्रथमतः बुडी मारण्याचा निर्णय घेतला. रमा सर्वात धाकटी. त्यामुळे सर्वात शेवटी उडी मारण्याचे तिच्या नशिबात होते.

अनंतशास्त्र्यांना नीट दिसत नव्हते. त्यांनी आपल्या धाकट्या मुलीला, रमेला आपल्या कवेत घेतले. तिचे डोके आपल्या हातात घेतले. तिच्या चेहऱ्यावर मायेने हात फिरवीत विद्ध हृदयाने ते म्हणाले, "माझ्या लाडक्या मुली ! नेहमीच लक्षात ठेव. तू माझी सर्वात धाकटी , लाडाची मुलगी आहेस. मी तुला देवाच्या हाती सोपवितो. तू त्याची आहेस. आयुष्यभर तू त्याची सेवा कर." त्यांना पुढे बोलणे अशक्य झाले. त्यांनी आपल्या मुलांना नेहमीच सत्यवचनी रहाण्यास शिकविले होते.

अनंतशास्त्री आपल्या मृत्युची तयारी करीत होते. त्यासाठी चिंतन करीत होते. तेव्हा श्रीनिवासच्या मनात विचार चमकला. तो म्हणाला, “आपले वडील दारिद्र्याने पिंजून, पिचून जाऊन आत्महत्या करीत आहेत. हे विदारक दृश्य आपल्याला बघवणार नाही.” आपल्या जातीचा, वर्णाचा, धर्माचा सगळा अभिमान दूर ठेवून त्याने काम करण्याचा निश्चय केला. अनंतशास्त्र्यांना चालण्याचेही त्राण नव्हते. श्रीनिवासने त्यांना खांद्यावरून वाहून आणले. ते जंगलातून बाहेर पडत होते. बाहेर पडण्यास त्यांना दोन दिवस लागले. त्याही अवस्थेत त्यांना वाटत होते., की, निदान वाघ, साप, वा इतर हिंस्त्र प्राण्यांनी तरी आपले आयुष्य संपुष्टात आणावे. परंतु तसे झाले नाही. ते जंगलाच्या पायथ्याशी आले.

उपासमार आणि आयुष्यभर उपसलेले कष्ट यामुळे आलेला शीण, यामुळे अनंतशास्त्र्यांचा मृत्यु जवळ येत चालला होता. गावाजवळच्या एका देवळात ते आसऱ्यासाठी थांबले. तेथील पुजाऱ्याने त्यांना तेथे टेकण्यास मनाई केली. तेथून ते आणखी एका पडक्या देवळापाशी आले. तेथे हिंस्त्र श्वापदे रात्री आश्रयासाठी येत असत. त्या जागी ते चार दिवस राहिले. त्यांची असहाय अवस्था ओळखून एक तरूण ब्राह्मणाने त्यांना थोडे खावयास दिले. अनंतशास्त्र्यांना खूप ताप आलेला होता. त्यांना पाणी व साखर हवी होती. साखर मिळाली नाही. एक पाणी दिले. त्यावर त्यांनी आपला प्राण सोडला.

या कुटुंबाची दुरावस्था इतकी होती की त्यांना जरी संस्कृत ज्ञात होते. तरी त्यांच्या ब्राह्मण असण्याची शंका यावी तशी परिस्थिती निर्माण झालेली होती. त्यांना मदत करण्यास पुढे आलेला तरुण ब्राह्मण अनंतशास्त्र्यांच्या मृतदेहाचे अंत्यविधी करण्यास कचरत होता. मृत्युपूर्वी अनंतशास्त्र्यांनी संन्यासाशी दीक्षा घेतल्यामुळे धर्मशास्त्रानुसार त्यांच्या प्रेताचे दफन करणे आवश्यक होते. त्या तरुण ब्राह्मणाने इतर तरुणाना अनंतशास्त्रींचे प्रेत पुरण्यासाठी खड्डा खणण्यास सांगितले. श्रीनिवासने आपल्या एका धोतरामध्ये वडिलांचे प्रेत गुंडाळले आणि दफनासाठी दोन

मैलपर्यंत आपल्या खांद्यावरून वाहून नेले. गावापासून दूर एका नदीकाठी त्यांनी वडिलांना पुरले. जंगलातून बाहेर पडताना वडिलांचा अस्थिपंजर मृतवत् देह श्रीनिवासने खांद्यावरून वाहून आणला होता. आता त्यांचा मृतदेहही त्याला वाहावा लागला.

अनंतशास्त्र्यांचे दफन झाले; त्याच संध्याकाळी लक्ष्मीबाईही तापाने फणफणल्या. त्यांना वाटले आता आपणही काही जास्त दिवस राहाणार नाहीत. हृदयावर दगड ठेवून ही तिन्हीं मुलं आपल्या आईला घेऊन निघाली. त्या गावातून ते बाहेर पडले. अन्नाच्या व कामात शोधात त्यांना भटकावे लागणार होते. एका दयाळू माणसाने त्यांना अन्न व प्रवासासाठी पैसे दिले. तेथून ते रायपूरला आले. निराशा आणि उपासमार यांनी ते पीडले होते. भाऊ तर अशक्तपणामुळे काही काम करू शकत नव्हता आणि अजूनही भीक मागण्याचे धैर्य त्यांच्याकडे नव्हते. भूक आणि ताप यामुळे आईची होणारी तडफड मुलांना बघवत नव्हती. आईला केवळ घासभर अन्न हवे होते. तेही त्यांना मिळू शकत नव्हते.

लक्ष्मीबाईंनी बाजरीच्या भाकरीचा तुकडा मागण्यासाठी रमेला शेजारच्या एका घरात पाठविले. रमा तेथे गेली. पण भाकरीच्या तुकड्यासाठी; तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. मोठ्या धैर्याने तिने आपले अश्रू आवरून धरले होते. त्या घरातील बाईंने रमेला प्रेमाने विचारले. तुला काही खायला हवे का ? रमा म्हणाली, हो! फक्त बाजरीच्या भाकरीचा तुकडा. बाईंनी तो दिला. त्याबरोबर रमेने धूम ठोकली., व आपल्या आईला तिने भाकरी आणून दिली. तिची आई इतकी अशक्त झाली होती की, तिला भाकरीही खाता येत नव्हती. एके दिवशी तापाचा कहर झाला. त्यात लक्ष्मीबाई बेशुद्ध होऊन काही दिवसातच मरण पावल्या. त्यांचा अंत्यविधी तर अनंतशास्त्रांच्या अंत्यविधीपेक्षा दुःखद होता. गावातील दोन ब्राह्मण फक्त मदतीला आले. श्रीनिवास होताच. उंचीने कमी असलेल्या रमेने तिरडीला आपल्या

डोक्याचा आधार देऊन चौथा ‘खांदा’ दिला आणि तीन मैल अंतरावर असलेल्या स्मशानभूमीत त्यांनी प्रेत नेले.

१८७४ साली अनंतशास्त्र्यांचा आणि त्यांच्यानंतर अगदी सहा महिन्यातच लक्ष्मीबाईंचा झालेला मृत्यु म्हणजे त्याकाळचे भूकबळी होते. सोळा वर्षीय रमेने पाहिलेले व अनुभवलेले हे पहिले भूकबळी !

कृष्णाबाई ही श्रीनिवास व रमेची थोरली बहिण. तिचे लग्न झाले होते. लग्न झाल्यापासून दुर्दैव तिच्या पाठीस लागले होते. आपल्या जावयाने विद्याभ्यास करावा अशी अनंतशास्त्र्यांची इच्छा होती. पण त्याचे अभ्यासात लक्ष नव्हते. वाईट संगतीमुळे एकदा तो घरातून पळून गेला. लग्नाला तेरा वर्षे होऊन गेल्यावर मग तो आपली बायको मागायला आला. परंतु कृष्णाबाई त्याच्याबरोबर गेली नाही. श्रीनिवासचे लग्नही अठराव्या वर्षी झाले होते. पण श्रीनिवासला ती मुलगी आवडत नव्हती. आणि तीही या भटक्यांच्या भ्रमंतीत सहभागी होण्यास राजी नव्हती. त्यामुळे आईवडिलाच्या मृत्युनंतर ही तिन्ही भावंडे एकमेंकासाठी उरली. त्यातच १८७५ मध्ये कृष्णाबाईंना कॉलरा झाला; व त्यात ती मरण पावली. आता श्रीनिवास आणि रमा यांचा भारतभर पायी पायी प्रवास सुरू झाला.

श्रीनिवासचे तारुण्यातील पीळदार शरीर उपासमार व उपास-तपास यांनी अशक्त झाले होते. तो कुठेतरी काहीसं काम करीत असे. तरीही अनेक दिवस त्यांना अन्नाविना घालवावे लागले. चार रुपये महिना असे त्याला कुठले काम मिळत असे. त्यामुळे पाण्यात भिजवलेले दाणे व थोडेसे मीठ असे त्यांचे जेवण असे. अंगावर पांघरण्यासाठी पुरेसे कपडेही नसत. त्यांची अनवाणी मार्गक्रमणा चालली होती. रस्त्याच्या कडेला, झाडाखाली किंवा उघड्या मैदानात रात्र काढीत. एकदा पंजाबमध्ये झेलम नदीच्या किनारी, थंडीपासून बचाव करण्यासाठी त्यांनी जमिनीत खड्डे खणले, आणि त्यात स्वतःला गळ्यापर्यंत गाडून घेतले. उघड्यावर राहाणं, फिरणं, थंडी-पावसाचा परिणाम यामुळे पुढे रमाबाईंना बहिरेपणा आलेला होता.

१८७६ मध्ये हिमालयाच्या आसपास भटकत असताना मंडी येथील रेवळस सरोवरजवळ ही दोन्ही भावंडे आली. तेथील सात टेकड्या म्हणजे सप्तर्षी आहेत. ते प्रसन्न झाले तर किनाऱ्यावर येऊन भक्तांना दर्शन देतात, असे त्यांना कोणीतरी सांगितले. श्रीनिवास आणि रमा यांनी त्यातील खरेपणा तपासायचा प्रयत्न केला. पाण्यातील सुसरी खाऊन टाकतील, अशी भीती घातलेली असूनही श्रीनिवासने न घाबरता भल्या पहाटेच पाण्यात उडी घेतली. पोहोत पोहोत तो त्या टेकड्यांजवळ गेला, तेव्हा त्याला समजले की, देवदार लाकडाच्या तरफ्यावर दगडमाती रचून त्यावर गवत व झाडपाला उगवलेल्या त्या टेकड्या आहेत. मागे जाऊन ढकलल्या की; त्या सहज किनाऱ्यापर्यंत तरंगत येतात व सप्तर्षी भाविकांना भेटायला येतात, असे सांगितले जात होते. यातील खोटेपणा त्यांना कळला. लहानपणी आईवडिलांबरोबरच्या भ्रमंतीतही त्यांना असाच एक अनुभव आला होता. तीर्थयात्रा करीत द्वारका येथे ते आले होते. तेथे 'पुराणातील' सुवर्णगिरी दिसला नाही. त्यामुळे श्रीनिवासने पवित्र होण्यासाठी अधिक उपासतपास करायला सुरूवात केली होती.

अनंतशास्त्रींनी कृष्णाबाई व श्रीनिवास यांचे लग्न केवळ घरातील वडिलधाऱ्यांच्या दडपणामुळे बालपणीच केले होते. आपल्या पहिल्या पत्नीपासून झालेल्या मुलीचे लग्नही बालपणीच उरकले होते. तथापि रमेचे लग्न बालवयात करण्याचे त्यांनी टाळले होते. आपल्या दुसऱ्या पत्नीला त्यांनी संस्कृतज्ञानसंपन्न केले; तसेच रमेलाही शिक्षणाची आवड निर्माण करून बालवयातील सांसारिक जबाबदारीपासून दूर ठेवले होते. त्यानंतर कुटुंबातील एकेकाचे विपरीत परिस्थितीतील मृत्यू, दारिद्य. यांना सामोर जात सतत प्रवास करीत १८७८ साली श्रीनिवास आणि रमा कलकत्ता येथे आले. तीर्थयात्रा करीत असता तीर्थक्षेत्री भेटलेले दांभिक, ढोंगीबुवा यांच्यामधून हे दोघेजण पुरोगामी, सुधारकी विचाराच्या लोकांमध्ये, कलकत्ता या ठिकाणी आहे. लहानपणी प्राप्त केलेल्या संस्कृत भाषा व धर्मग्रंथांचे ज्ञान यांची येथे कसोटी लागली. विसाव्या वर्षापर्यंत

अविवाहित, ज्ञान आणि अनुष्ठानाने चेहऱ्यावर फाकलेली प्रभा आणि मुळातले देखणेपण असलेली ही तरुणी, कलकत्त्यातील विद्वान, पंडित, सुधारकी लोकांच्या नजरेस न पडती तर नवलच! एका वस्त्रानिशी आपल्या भावाबरोबर आलेली रमा, पंडिता रमाबाई सरस्वती बनली आणि भारतीय स्त्रीशिक्षणाचा दीपस्तंभ ठरली.

# जया अंगी मोठेपण

पंडिता रमाबाई आणि श्रीनिवास यांचे कलकत्त्यातील वास्तव्य साधारणपणे एक वर्षांचे होते. या वास्तव्यात केशवचंद्रसेन या धर्मसुधारकांशी रमाबाईंची ओळख झाली. ते ब्राह्मो समाजाचे सभासद होते. एकदा ही दोन्ही भावंडे केशवचंद्रसेन यांच्या घरी गेली असता, त्यांनी अत्यंत प्रेमाने या दोघांचे स्वागत केले. त्यांनी आपली बायको व मुलगी यांच्याबरोबरही त्यांची ओळख करून दिली. त्यांच्या मुलीचे नुकतेच लग्न झाले होते. चौदा वर्षाखालील मुलीचे लग्न करून ब्राह्मो समाजाचा नियम मोडल्यामुळे ब्रह्मो समाजीय त्यांच्यावर नाराज होते. केशवचंद्रसेन यांनी रमाबाईंना वेदाची एक प्रत भेट म्हणून दिली. त्यांनी तिला विचारले, “तू वेदांचा अभ्यास केला आहेस का? ” तेव्हा रमाबाई म्हणाली, “स्त्रियांना वेदांचा अभ्यास निषिद्ध आहे. जर मी वेद वाचले तर धर्माच्या नियमांचे उल्लघंन केले असे होईल. ” तेव्हा त्यांनी फक्त स्मित केले. परंतु त्यांनी तिला वेद व उपनिषदांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले.

रमाबाईंनी वेद वेदांत, उपनिषदे वाचण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या मनात त्याबद्दल निरनिराळे प्रश्न निर्माण झाले. बालपणी तीर्थक्षेत्री पाहिलेला दांभिकपणा. एवढी अनुष्ठाने करूनही न झालेली देवाची भेट... धर्मग्रंथांच्या अभ्यासानेही दूर न झालेले दारिद्र्य आणि वेद-उपनिषदात स्त्री शूद्रांबद्दल व्यक्त झालेले विचार. यामुळे श्रीनिवास आणि रमाबाई या दोघांचाही हिंदू धर्मावरील विश्वास डळमळीत होऊ लागला होता.

धर्मग्रंथात स्त्रियांना दिलेले दुय्यम स्थान पाहून रमाबाईंचे अंतःकरण व्यथित झाले. यातून मार्ग काढण्याचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. स्त्रीचे महत्त्व पटवून देणारी, समाज प्रबोधनपर अशी व्याख्याने देण्यास त्यांनी सुरुवात केली.

कलकत्त्यात असताना श्रीनिवास व रमाबाई यांना एका सभेचे आमंत्रण आले. ही सभा काही खिस्ती लोकांनी आयोजित केलेली होती. ही भावंडे अशा प्रकारच्या सभेला कधी गेली नव्हती. मग काही परिचित ब्राह्मणांनी त्यांना, त्या सभेचे निमंत्रण स्वीकारून सभेला जावे असे सांगितले. म्हणून ते तेथे गेले. त्या सभेतील वातावरण त्यांना वेगळे वाटले. तेथे खुर्च्या टेबले, दिवे, सोफा अशा त्यांनी कधी न पाहिलेल्या गोष्टी होत्या. काही भारतीय स्त्री-पुरुष इंग्रजांसारख्या पोशाखात वावरताना त्यांनी तेथे पाहिले. रेव्ह. के.एम. बॅनर्जी तसेच कालिचरण बॅनर्जी ही नावे ब्राह्मणांसारखी असूनही ही माणसं मात्र 'साहेब' बनल्यासारखी त्यांना दिसत होती. ते लोक तेथे पाव-बिस्कीटे खात होते. चहा पीत होते, त्यांनी या भावंडांनाही त्यात सहभागी व्हायला सांगितले. परंतु त्यांनी त्या गोष्टींना स्पर्शही केला नाही. असले अधार्मिक वागणे त्यांना मान्य नव्हते.

ती खिस्ती माणसे कोणतीही मूर्ति समोर न ठेवता, खुर्चीसमोर गुडघे टेकून प्रार्थना करीत होते. रमाबाईंना तर वाटले की; ते सारे खुर्च्यांसमोरच नतमस्तक झालेले आहेत. त्यानंतर एका खिस्ती माणसाने रमाबाईंना 'पवित्र बायबल' ची संस्कृत प्रत दिली. रमाबाईंना त्या पुस्तकाचे बाह्य दर्शन आवडले. त्यांनी त्यातील रचना वाचण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना काही कळले नाही. हिंदूंच्या संस्कृत धर्मशास्त्रातील भाषेपेक्षा ही संस्कृत भाषा त्यांना काहीशी वेगळी वाटली. त्यातली शिकवणही इतकी विचित्र वाटली की, असले पुस्तक वाचणे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे, असे त्यांना वाटले. त्यानंतर असल्या सभेत ही भावंडे कधी सहभागी झाली नाहीत. पंडिता रमाबाईंना ग्रंथरूप 'बायबल' चे झालेले हे प्रथम दर्शन. या आधी बालपणी आईवडिलांबरोबर प्रवास करताना घागरा घातलेल्या गोऱ्या मडमा त्यांनी पाहिल्या होत्या. त्या खिस्ती स्त्रियांना पाहून त्या खूप घाबरल्याचेही त्यांनी नोंदवून ठेवलेले आहे.

श्रीनिवासची साथ जोपर्यंत आहे, तोपर्यंत एकटीने जीवन कंठण्यास आपण समर्थ आहोत, असे रमाबाईंना वाटत होते. त्यामुळे विवाहाच्या मागण्यांना त्यांनी दाद दिलेली नव्हती. मुंबई इलाख्यातील पहिले आय.सी.एस. श्रीपाद बाबाजी ठाकूर हे पंडिता रमाबाईंची ख्याती ऐकून कलकत्त्यातील सिल्हट येथे आले. एका सभेत श्रीनिवासशास्त्रींच्या अध्यक्षतेखाली श्रीपाद ठाकूर यांनी अस्खलित संस्कृतमध्ये भाषणही केले. त्यांना पंडिता रमाबाईंचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायचे होते. परंतु त्या सभेला रमाबाई उपस्थित नव्हत्या. योगायोगाची गोष्ट अशी की ही सभा आयोजित करणारे बिपीन बिहारी दास, अथवा मेधावी आणि रमाबाई यांना परस्परांविषयी आकर्षण निर्माण झाले होते.

एका सभेत बिपीन बिहारी मेधावी यांनी पंडिता रमाबाईंच्या पूर्वजीवनाचा इतिहास आपल्या तेजस्वी भाषेत श्रोत्यांना सांगितला. त्यावेळी रमाबाईंचा त्यांच्याशी प्रथम परिचय झाला. त्यातून स्नेह वाढत गेला होता. त्यामुळे श्रीपाद ठाकूर यांच्या मागणीची त्यांनी फारशी दखल घेतली नव्हती. मात्र याच सुमारास दुर्दैवाने रमाबाईंवर पुन्हा घाला घातला. ढाक्यात श्रीनिवास आजारी पडला. ८ मे १८८० रोजी त्याचे निधन झाले. आता रमाबाई पूर्ण एकट्या राहिल्या. नातेवाईक कोणी नव्हतेच. काही परिचित तेवढे होते. श्रीनिवासने प्राण सोडताना सांगितले होते- “आता देवच तुला सांभाळील” त्यांच्या वडिलांनीही मृत्युवेळी त्यांना नेमके हेच सांगितले होते. भावाच्या मृत्युचे दुःख होतेच. परंतु ईश्वरावर विश्वास ठेवून त्या पुन्हा खंबीरपणे उभ्या राहिल्या.

रमाबाईंविषयी महाराष्ट्रातील वृत्तपत्रात सतत बातम्या झळकत होत्या. त्यात श्रीनिवासच्या मृत्यूची बातमी कळताच त्यांच्या भवितव्याची चिंता मराठी माणसांना भेडसावू लागली. त्यांना लग्न करण्याविषयी सुचविण्यात येऊ लागले. यावेळी बिपीन बिहारी मेधावी यांनी त्यांना लग्नाची मागणी घातली. रमाबाईंना त्यांचा आधार वाटला व त्यांनी १३ जून १८८० रोजी बांकीपूर शहरात नोंदणी पद्धतीने विवाह केला.

पंडिता रमाबाईंचा विवाह अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण होता. तो प्रेमविवाह होता. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीबरोबर त्यांनी विवाह केला होता. वयाच्या बाविसाव्या वर्षी झालेला म्हणजे तो प्रौढविवाह होता. बिपीन बिहारी हे शूद्र समाजातील होते. परंतु उच्चविद्याविभूषित होते. त्यामुळे विचारपूर्वक केलेला हा आंतरजातीय विवाह होता. मेधावी हे बंगाली होते. त्यामुळे हा विवाह आंतरप्रांतीयही होता आणि नोंदणी पद्धतीने झालेला म्हणून हा विवाह प्रतिलोम पद्धतीचाही होता.

पंडिता रमाबाईंचे वडील धर्माभिमानी अथवा पुराणमतवादी असूनही स्त्रीशिक्षणासंदर्भात सुधारकी प्रवृत्तीचे होते. परंतु त्यांची मुलगी तर त्यांच्यापेक्षाही अधिक सुधारकी निघाली. अनंतशास्त्र्यांच्या मनात स्त्रियांना शिक्षण देण्यासंबंधीच्या विचाराचे जे बीज पडले त्याचा वृक्ष, पंडिता रमाबाईंच्या कर्तृत्वाने जणू बहरून आलेला होता.

ब्राह्मण स्त्रीने शूद्राबरोबर लग्न करणे हिंदू धर्माविरोधात होते. परंतु रमाबाई म्हणतात, "मी आणि माझा नवरा, दोघेही हिंदूधर्मावर विश्वास ठेवत नव्हतो. त्यामुळे आम्ही नोंदणी पद्धतीने विवाह केला."

रमाबाई बिपीनबाबूंना 'बी' या नावाने हाक मारीत असत. हेही त्यांच्या पुरोगामी विचारांचेच दर्शक आहे. बिपीन बिहारी वकील होते. कोर्टाच्या कामानिमित्ताने ते दिवसभर बाहेर असत. आसाममधील सिलचर प्रांती त्यांचे वास्तव्य होते. रमाबाई आपला बराचसा वेळ वाचनात घालवीत असत. सिलचरमधील ॲनलन नावाचे एक बॅप्टिस्ट मिशनरी मेधावींकडे येत असत. मेधावींचे शिक्षण मिशन शाळेत झाले होते आणि त्यांना 'बायबल' विषयी माहितीही होती. रेव्ह. ॲलन, रमाबाईंना 'बायबल' मधील भागांचे स्पष्टीकरण देत असत. हिंदू पुराणे आणि शास्त्रे यापेक्षा 'बायबल' मधील 'उत्पत्ति' च्या कथा वेगळ्या आहेत, असे रमाबाईंना जाणवू लागले. एकतर रमाबाईंचा हिंदू धर्मावरील विश्वास डळमळीत व्हायला लागला होता. त्या नवी तत्त्वे असलेल्या धर्माच्या शोधात होत्याच. त्यातच बंगाली भाषेतील 'सेंट लूकचे शुभवर्तमान' हे छोटेसे

पुस्तक त्यांना बिपीनबाबूंच्या ग्रंथसंग्रहात सापडले होते. ते वाचायला त्यांनी सुरूवात केली होती. आपली खिस्ती होण्याची इच्छा तिने बिपीनबाबूंना बोलून दाखवली. मेधावींना ते आवडले नाही. तथापि त्यांनी रेव्ह. ॲलन यांना आपल्या घरी येण्याची बंदी केली होती.

दुर्दैव रमाबाईंच्या पाठी हात धुऊन लागले होते. लग्नानंतर एकोणीस महिन्यांनी बिपीनबाबूंचा कॉलऱ्याने बळी घेतला. ४ फेब्रुवारी १८८२ रोजी ते मरण पावले. तेव्हा रमाबाईंच्या पदरात दहा महिन्याची मुलगी मनोरमा होती.

३ फेब्रुवारी १८८२ रोजी बिपीनबाबू कोर्टातून रात्री घरी आले. तेव्हा रमाबाई तापाने फणफणलेल्या होत्या. मनोरमेकडे लक्ष देण्यासाठी कोणी नव्हते. त्या रात्री खाण्यासाठीही घरात काही नव्हते. म्हणून त्यांनी फुटाणे खाल्ले. त्या रात्री ओकाऱ्या, पोटात कळ येणे असे होऊन पहाटे त्यांचे निधन झाले. रमाबाईंना त्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांच्या समाजाने त्यांना जातीबहिष्कृत ठरविले होते. त्यामुळे बिपीनबाबूंच्या मृत्युनंतर त्यांच्या शवदहनासाठीही कोणी पुढे आले नाही. महाप्राण श्री राम हरिचरणदास बहादूर यांनी शवाची व्यवस्था केली. आपल्या आयुष्यातील अत्यंत प्रिय अशा वडिल, आई, बहीण, भाऊ, पती यांच्या अंत्यविधीचे दारुण सोहळे रमाबाईंना बघावे लागले.

बिपीनबाबूंच्या मृत्युनंतर रमाबाईंना आपल्या नवऱ्याने केलेले कर्ज फेडायचे होते. अभ्यासाच्या निमित्ताने त्यांनी कधीतरी अडीचशे रुपयाचे कर्ज काढले होते. वैधव्यानंतर रमाबाई पुण्यात आल्या. तेव्हा त्यांनी त्यांचे कर्ज फेडले. आपल्या व्यवहारातील चोखपण त्यांनी येथे दाखवून दिले.

पंचविशीच्या आत रमाबाईंवर अनेक संकटे आली. परंतु त्या डगमगल्या नाहीत. प्रतिकूल अनुभवांनी त्यांना प्रौढ व परिपक्व बनविले. वडिलांच्या प्रेताचे दफन झाल्यावर या भावंडांना लगेच तेथला मुक्काम हलवावा लागला. आईच्या मृतदेहाचे दहन झाल्यावर ते गाव सोडून पुढे जावे लागले. बहिणीच्या मृत्युनंतर त्यांना आपला प्रवास केवळ दारिद्य व

उपासमार यामुळे थांबवता आला नाही. कलकत्त्यात त्यांना मायेची ऊब मिळाली. त्या प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात आल्या. परंतु श्रीनिवासच्या मृत्युने एकाकीपणाचा अंधार रमाबाईंसमोर उभा राहिला. तिच्या प्रखर तेजापुढे हा अंधार फार काळ टिकला नाही. बिपीन बिहारी मेधावींची साथ त्यांना मिळाली. ज्या ज्या ठिकाणी पाऊल ठेवावे त्या त्या ठिकाणची जमीन खचत जावी तसे रमाबाईंच्या बाबतीत झाले. लग्नानंतर अठका-एकोणिस महिन्याच्या आतच बिपीनबिहारी मरण पावले. परंतु दोन-तीन महिन्यांनी लगेचच रमाबाईंनी आपली मुलगी मनोरमा हिच्यासह सिलचर सोडले. त्यांना फार मोठा पल्ला गाठायचा होता.

## स्त्रीउद्धाराच्या कार्याची सुरूवात...

१८८० साली कलकत्त्यातील सिनेट हॉलमध्ये कर्तृत्व गाजविल्यानंतर मुंबईतील एका वर्तमानपत्रात रमाबाईंविषयी बातमी आली होती की; हल्ली कलकत्त्यास रमाबाई नावाची कोणी मराठी स्त्री आली आहे. तिने कलकत्त्यातील विद्वान मंडळीस चकीत करून सोडले आहे. बाई संस्कृत भाषा बोलते. जागच्या जागी काव्य करते. अशा विद्वान कवयित्रीविषयी महाराष्ट्रात आधीच कुतूहल निर्माण झाले होते. त्यानंतर त्यांच्या अकाली वैधव्याची बातमी महाराष्ट्रात थडकली आणि महाराष्ट्रातील सुधारकी विचाराच्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग प्रभृतींनी रमाबाईंना पुण्यात येण्याचे आमंत्रण दिले. पुणे हे त्याकाळी साहित्य व संस्कृतीचे माहेरघर होते. अनेक सामाजिक व राजकीय वादळाचे केंद्रस्थान होते. प्रार्थना समाजाने समाजकार्यासाठी रमाबाईंना मदतीचा हात दिला. येथे येताच रमाबाई प्रार्थनासमाजात सामील झाल्या. न्या. महादेव गोविंद रानडे व रमाबाई रानडे यांनी त्यांना मानसिक आधार दिला.

चोवीस वर्षीय विधवा रमाबाई पुण्यात आल्या, तेव्हा तत्कालीन बालविधवांची व एकूणच सामाजिक परिस्थिती त्यांच्या पुढे आव्हान म्हणून उभी ठाकली होती. घराघरात बालविधवा हुंदके दाबून बसलेल्या होत्या. समाजमनावर धर्मग्रंथ, त्यातील कर्मठपणा यांचा इतका पगडा होता; की, प्रचलित पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीला चार भिंतीत कोंडून ठेवले होते. स्त्रीने सौभाग्यवती बनणे व पुरुषाला स्वर्गप्राप्ती मिळावी म्हणून मुलगा जन्मास घालणे हे तिचे भागधेय बनले होते. वांझ स्त्री, विधवा यांना अशुभ समजले जात होते. सौभग्यवती व विधवा यात फरक केला जात असे. विधवेला विनाकिनारीचे विटकरी रंगाचे आलवण नेसणे भाग असे. दागिने घालणे निषिद्ध असे, केशवपन करून तिला विद्रूप केले जात असे. बोडक्या केलेल्या डोक्यावरून पदर घ्यावा लागे. लिंगभेदावर

आधारलेल्या समाजव्यवस्थेवर पंडिता रमाबाईंना घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली. हिंदूधर्मग्रंथ-वेद-वेदांत-उपनिषदे-श्रुति-स्मृति-पुराणे यातून प्राप्त केलेले ज्ञान रमाबाईंना उपयोगी ठरले. त्या बळावर त्या समाजात प्रबोधन करीत फिरू लागल्या. स्त्रीचे महत्त्व पटवून देऊ लागल्या. स्त्रियांना घर सांभाळणे भाग असल्यामुळे रमाबाईंच्या सभेला पुरुष अधिक असत. त्यामुळे प्रत्येक पुरुषाने आपल्याबरोबर आपल्या बायकोला वा घरातील अन्य स्त्रीला घेऊन यावे असा दंडक रमाबाईंनी घातला होता.

स्त्रियांच्या हक्कांसंबंधी महाराष्ट्रभर प्रबोधन करीत फिरताना आपल्या भाषणात रमाबाई सागंत, “पुरुषांना वाटते की, स्त्री त्यांची मालमत्ता आहे. धर्मशास्त्रात तर, ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’असे म्हटले आहे. स्त्रीला या दास्यातून मुक्त करण्यासाठी माझे प्रयत्न आहेत. लोक म्हणतात; की, हे पुरुषाविरुद्ध बंड आहे. त्यामुळे हे पाप आहे, परंतु मला वाटते, स्त्रियांविषयी पुरुषांचा असलेला संकुचित दृष्टिकोन आपण बदलत नाहीत आणि स्त्रिया स्वतःला मुक्त करण्याचा प्रयत्न करीत नाहीत, तर हेच मोठे पाप आहे.”

बोलक्या सुधारकांप्रमाणे रमाबाईंची भूमिका मिळमिळीत नव्हती; तर कर्त्या सुधारकांप्रमाणे ती ठाम भूमिका होती. कोणाही पुरुषाची साथ नसताना रमाबाई ही विधाने करीत होत्या. त्या आपण प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या बळावर. या काळात महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे दांपत्य समाजाची टीका सहन करीत स्त्रीशिक्षण व समाजसुधारणेचे कार्य करीत होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व रमाबाई रानडे पुरोगामी विचार प्रसृत करण्याचे कार्य करीत होते. हे ध्यानात घेतले . म्हणजे एकट्या विधवा स्त्रीने, रमाबाईंनी, स्वतंत्रपणे स्त्रीशिक्षणाचे हाती घेतलेले कार्य ठळकपणे नजरेत भरते. अनौपचारिक शिक्षण प्राप्त केलेली एक तरुणी समाजशिक्षिकेची भूमिका वठवीत होती.

कलकत्त्यातून आपल्या मुलीला घेऊन रमाबाई आधी मुंबईत आल्या व त्यानंतर लगेचच पुण्यात गेल्या. ३० एप्रिल, १८८२ रोजी पुण्यात त्यांचे व्याख्यान दीड तास चालले. १ मे, १८८२ रोजी पुण्यात 'आर्य महिला समाज' स्थापन झाला. स्त्रियांचा उद्धार हे या समाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते. धर्म आणि परंपरेच्या जोखडातून बालविधवांना मुक्त करण्याचा तो प्रयत्न होता. त्यात शिक्षण व स्वावलंबनाला प्राधान्य होते.

स्त्रियांसाठी कार्य करीत असताना १८८२ साली रमाबाईंनी 'हंटर कमिशन' समोर दिलेली साक्ष महत्त्वाची आहे. डब्ल्यू, डब्ल्यू हंटर , या इंग्रज शिक्षण तज्ज्ञाच्या अध्यक्षतेखाली भारतातील शिक्षणाबाबत चौकशी करण्यासाठी आलेल्या मंडळापुढे रमाबाईंनी दिलेली ही साक्ष आहे. आपले स्पष्ट विचार स्वच्छ शब्दात सांगून रमाबाईंनी आपली बाणेदार वृत्ती दाखवून दिली. यात, नुकताच शाळेत जाण्यात निघालेल्या मुलीस लग्नाच्या बेडीत अडकवणे, हातात लेखणी धरली तर वैधव्य येते अशी भीती घालणे, स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शिक्षिकांची असलेली उणीव असा अनेक गोष्टी त्यांनी 'कमिशन' च्या नजरेस आणून दिल्या. 'स्त्रिया या लोकसंख्येच्या अर्ध्या प्रमाणात आहेत व लोकसंख्येचा दुसरा अर्धाभाग त्यांना पायाखाली तुडवीत आहे. भारतीय स्त्री पुरुष डॉक्टरांकडे औषधोपचारासाठी जाण्यास संकोच बाळगणारी आहे. त्यामुळे अनेक स्त्रिया मृत्युमुखी पडतात. त्यामुळे या देशाला स्त्री-डॉक्टरांची गरज आहे. केवळ शिक्षणाच्या अभावी या देशातील मोठी संख्या आज मृत्युमुखी पडत आहे,' रमाबाईंनी ठासून सांगितले.

यावेळी कमिशनच्या सभासदांनी रमाबाईंची उलटतपासणी केली. त्यांना अनेक प्रश्न विचारले. पुरुषवर्ग स्त्रीशिक्षणाच्या विरोधात असल्याबद्दल आपला अनुभव काय? काही स्त्रियांना घरच्या घरी शिक्षण मिळते; असे अनेक प्रश्न विचारले व रमाबाईंनी त्यांना सडेतोड उत्तरे दिली. त्यावेळी रमाबाईंना फारसे इंग्रजी येत नव्हते. त्यामुळे त्यांचे विचार इंग्रजीत भाषांतर करून इंग्लंडला पाठवले. त्यांनी प्रभावीत होऊन

व्हिक्टोरिया राणीने स्त्रियांसाठी हॉस्पिटले उघडण्यासाठी आणि इंग्लंडहून डॉक्टर पाठवण्यासाठी 'डफरीन फंड' स्थापन केला.

आपण स्वतः डॉक्टर होऊन स्त्रियांच्या उत्थानाचे काम अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो, असे रमाबाईंना वाटत होते. पुण्यात प्रबोधनाचे कार्य चालले असताना पंचहौद मिशनच्या सेंट मेरीज होममधील मिस हर्फर्ड बरोबर रमाबाईंचा परिचय झाला होता. तसेच फ्रान्सिसा सोराबजी या ख्रिस्ती बाईबरोबर मैत्री झाली होती. मिस हर्फर्डच्या सहाय्याने त्या इंग्रजी शिकू लागल्या होत्या.

फा. नेहेम्या गोरे हे एकेकाळी हिंदू ब्राह्मण होते. धर्मांतर करून ते ख्रिस्ती झाले होते. १८८२ मध्ये रमाबाईंची फा. गोरे यांच्याशी पंचहौद-मिशन-हाऊसमध्ये भेट झाली होती. आणि ख्रिस्ताच्या शिकवणुकीविषयी आपल्या मनात निर्माण झालेल्या शंका रमाबाईंनी त्यांच्यापुढे प्रकट केलेल्या होत्या.

इंग्लंडला जाऊन वैद्यकशास्त्र शिकावे, असे रमाबाईंना वाटत होते. हर्फर्ड यांनी रमाबाईंना इंग्लंडला जाण्यास प्रोत्साहन दिले. प्रवासखर्च निभवणे भाग होते. रमाबाईंनी वक्तृत्वाबरोबरच आता लेखनालाही सुरूवात केली. 'स्त्रीधर्मनीती' नामक ग्रंथ लिहायला त्यांनी सुरूवात केली. हे पुस्तक लिहिण्यामागे इंग्लंडला जाण्याचा प्रवासखर्च भरून काढणे हे एक तात्कालिक कारण असले; तरी पुस्तकाच्या प्रस्तावनेत रमाबाईंनी स्वच्छपणे आपली भूमिका मांडली आहे की, 'या देशातील स्त्रिया अगदी असहाय आणि ज्ञानशून्य आहेत. त्यामुळे त्यांस आपले हित कसे करून घ्यावे, हेही समजत नाही. याजकरिता ज्ञानी लोकांनी, त्यांते हित काय केल्याने होईल, हे त्यांस सांगून त्यांच्याकडून त्याप्रमाणे आचरण करविले पाहिजे.' स्त्रियांना नीतीज्ञानविषयक सार सांगणारा संस्कृत, मराठी ग्रंथ त्यांच्या वाचनात आला नसल्याने ही उणीव रमाबाईंना भरून काढावयाची होती.

पतिनिधनाचे दुःख ताजे असताना रमाबाईंनी हा ग्रंथ लिहिला होता. ‘अस्वस्थ मनःस्थितीत असताना महाराष्ट्र भाषेत प्रथम लिहिण्याचे धाडस केले आहे.’ असेही रमाबाईंनी प्रस्तावनेत लिहिले आहे.

स्त्रीजीवनाच्या विविध बाजू रमाबाईंनी ‘स्त्रीधर्मनीती’ त विचारात घेतलेल्या आहेत. आत्मविश्वास, स्वावलंबन व नीटनेटका यावर त्यांचा भर आहे. आत्मविश्वास हा व्यक्तिजीवनाचा पाया आहे, असे त्या म्हणतात. ज्याची कोणी चोरी करू शकत नाही, व जे संकटातही आपले रक्षण करते. असे ‘विद्या’ नामक धन मिळविण्यास झटले पाहिजे. संयम व मर्यादा या गुणांना असलेले महत्त्व त्या प्रतिपादन करतात. बालविवाहातील अनिष्टतेवर त्या प्रकाश टाकतात. गृहकार्य, दक्षता, काटेकोरपणा, शिस्तबद्धता, बालकाचे पालन व शिक्षण सर्वसामान्य जीवनोपयोगी व व्यावहारिक मार्गदर्शन असे अनेक विषय प्रस्तुत पुस्तकात हाताळले आहेत.

‘स्त्रीधर्मनीती’ हे संस्कृतप्रचुर पुस्तक असल्याची टीका २३ जुलै, १८८२ च्या ‘नेटिव्ह ओपिनियन’ या वृत्तपत्राने केली. परंतु हिंदू स्त्री-पुरुषांनी त्यातील उपदेश स्वीकारण्यालायक आहेत, असेही म्हटले आहे.

‘स्त्रीधर्मनीती’ वरील १ ऑगस्ट, १८८२ रोजी आलेली ‘केसरी’ तील टीका मात्र प्रखर होती. रमाबाईंच्या धर्मांतराच्या आधीची ही टीका आहे. त्यावेळी गोपाळ गणेश आगरकरही लोकमान्य टिळकांबरोबर ‘केसरी’ त होते. ‘केसरी’ त लिहिले आहे, ‘या बाईंवर संस्कृतचा इतका प्रभाव आहे की, शुद्ध मराठीत साधा शब्द जरी उच्चारायचा असेल; तर त्यावरही संस्कृताची झलक दिसेल. ’ यानंतर ‘केसरी’ च्या २२ ऑगस्ट, १८८२ च्या अंकात लिहिले आहे की, ‘जर पंडिता रमाबाईंना अधिक पुस्तके लिहायची असतील ; तर तिने मराठीचा यथायोग्य रीतीने अभ्यास करावा.’

रमाबाईंच्या, नंतरच्या मराठी पुस्तकात मात्र सुधारणा झालेली दिसते. परंतु त्यानंतर तर रमाबाईंनी इंग्लंडला प्रयाण केले व तेथे

प्रवासवर्णनात्मक लेखन केले. पुढे तर इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आले आणि भारतीय हिंदू स्त्रीविषयी इंग्रजीतच पुस्तक लिहिले.

'स्त्रीधर्मनीती' या पुस्तकाच्या बऱ्याच प्रती सरकारने विकत घेतल्या. स्त्रीशिक्षणासंबंधी, स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक सद्गुणांचे वर्णन त्यात असल्याकारणाने व त्याआधी 'हंटर कमिशन' पुढे दिलेली साक्ष व त्यानुसार इंग्लंडच्या राणीने घेतलेली दखल, याची खात्री पटल्याने व काळाची गरज ओळखून सरकारने या पुस्तकाच्या प्रती विकत घेतल्या. त्यातून पुरेसा पैसा जमा झाला व रमाबाईंनी इंग्लंडला जाण्याचा निर्णय पक्का केला.

# परदेश प्रवास

जून, १८८२ मध्ये इंग्लंडमधील वॉण्टेज सिस्टरांनी रमाबाईंचे स्वागत केले. रमाबाईंबरोबर दोन वर्षाची मनोरमा व आनंदीबाई भगत नावाची रमाबाईंची मैत्रीण होती. शिक्षिका म्हणून तिला प्रशिक्षित करता आले; तर बघावे, असा विचार करून तिला त्यांनी सोबत घेतले होते.

रमाबाई इंग्लंडला जाण्यास निघाल्या; तेव्हा पुण्या-मुंबईतील त्यांच्या मित्रमंडळींनी काही कारणे सांगून त्यांच्या परदेशगमनात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास रमाबाईंकडे लगोलग वेळ नव्हता म्हणून इंग्लंडला पोहोचताक्षणीच त्यांनी साऱ्या आक्षेपांची उत्तरे लिहून व प्रवासातील अनुभव लिहून आपले स्नेही, सदाशिव पांडुरंग केळकर यांना पत्र पाठवले. केळकरांना रमाबाईंच्या कार्याची जाणीव असल्यामुळे त्यांनी हे पत्र छापून, रमाबाईंना इंग्लंडमधील खर्चासाठी त्याचे पैसे पाठवून दिले. आपल्या मित्राला पत्र लिहून रमाबाईंनी विशुद्ध मैत्रीचा एक आदर्शही घालून दिला.

एक स्वतंत्र विराची, विधायक कार्यासाठी बुरसटलेल्या विचाराच्या लोकांची पर्वा न करणारी, त्याचबरोबर कवयित्री, प्रवासवर्णन करणारी लेखिका अशी तिच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक अंगे या प्रवासवर्णनातून उजळून निघतात. तत्कालीन परिस्थितीचे वर्णन ललितरम्य भाषेतून लिहिलेले मराठी साहित्यातील हे पहिले प्रवासवर्णन म्हणावे लागेल.

इंग्लंडमध्ये गेल्यावर कुणाचा मिंधेपणा स्वीकारावा लागू नये. म्हणून रमाबाईंनी हिंदुस्थानात येणाऱया तेथील सिस्टरांना (मठवासिनी) मराठी शिकविण्याचा व त्या बदल्यात इंग्रजी शिकण्याचा करार केला होता. स्वतंत्र प्रज्ञेची पंडिता रमाबाई म्हणते, ‘सिस्टर सुपिरीअरने असे सुचविल्यावर, मी त्यास सांगून पाठविले की, त्यांनी जो माझा खर्च चालविण्याचा पतकर घेतला तो निःस्वार्थ असावा, (म्हणजे पुढे मला आभारी करून ख्रिश्चन करण्याच्या आशेने किंवा दुसऱ्या कोणत्याही

प्रकारच्या मतलबाने असू नये.) तरच मी त्यांच्या मंडळीपाशी राहीन. नाहीपेक्षा जाणार नाही. हे माझे म्हणणे त्यांनी कबूल केल्यावर माझे या देशात राहाण्याचे ठिकाण निश्चित करून मी इकडे येण्याची तयारी केली.' इतक्या कोवळ्या वयातील रमाबाईंचा हा बाणेदारपणा नजरेत भरतो. परंतु त्यांनी तिकडच्या सिस्टरांची दयाकृत्ये, सेवाकार्ये पाहिली व तीन महिन्यांनी लगेचच २९ सप्टेंबर, १८८३ रोजी, धर्मांतर केले. सिस्टर जिराल्डीनला रमाबाई आईसमान मानत होत्या. त्या या धर्मांतर प्रसंगाच्या साक्षीदार होत्या. आता पंडिता रमाबाई, मेरी रमाबाई झाल्या व मनोरमाच्या नावाआधीही मेरी असे लावण्यात आले. कारण ख्रिस्ती मठवासिनी आपल्या नावाआधी 'मेरी' असे लावत असत. मात्र धर्मांतरानंतर रमाबाईंनी आपले नाव कायम ठेवले.

खिस्ती धर्म स्वीकारल्यानंतरही रमाबाई ख्रिस्ती धर्माचा, धर्मग्रंथाचा व पंथांचाही अभ्यास करीत होत्या. पंथांतील मतभिन्नता पाहून त्यांना आश्चर्य व खेदही वाटला. आपल्या विचारांना योग्य असा ख्रिस्ती धर्म आपल्याला सापडलेला आहे मात्र ख्रिस्ती धर्माचा गाभा असलेल्या ख्रिस्ताच्या शोधात त्या होत्या.

परिस्थितीनुसार स्वतःत बदल करण्याची रमाबाईंची प्रवृत्ती व प्रकृती होती. बालपणापासून कराव्या लागणाऱ्या प्रवासाचा तो परिणाम होता. आपल्या भारतीयत्वाची जाणीव, परदेशातही पावला-पावलावर त्यांना होत होती. लंडनमधील बागांमधून हिंडणाऱ्या, अर्ध्या फुलेल्या गुलाबासारख्या लहान मुली पाहून 'महाभारता' त वर्णिलेल्या ऋषिकन्यांची त्यांना आठवण होते. 'डेजी' ची फुले त्यांना खाशिया व गारो पर्वतातील वनप्रदेशांची आठवण करून देतात.

इंग्लंडला जाण्यास निघालेल्या रमाबाईंवर 'तिची प्रकृति सशक्त नाही' असा आक्षेप घेतला होता. रमाबाई म्हणते, 'ही माझी रोगमूलक अशक्तता नव्हे. अशी सुदृढ प्रकृती फारशी लोकांची नसते. आज आठ वर्षापासून सतत प्रवासात माझे आयुष्य गेले असून, शेकडो ठिकाणचे हवापाणी

माझ्या प्रकृतीला मानवले आहे. मित भोजने व मिताचार असल्याने सहसा रोग होण्याचे भय नाही.'

दोन वर्षाच्या मनोरमेला घेऊन रमाबाई इंग्लंडला निघाल्या होत्या. त्या विषयीही काहूर माजले होते. याचे स्पष्टीकरण देताना रमाबाई म्हणतात, 'भुईवर ठेविली; तर मुंगी चावेल. आणि अंधातरी ठेविली; तर कावळा नेईल. अशी आशंका करून तिला अगदी नाजुकपणाने वाढविली आहे... असेही नाही. किती तटस्थपणे... व तर्कशुद्धपणे त्या निर्णय घेत होत्या. हे यावरून दिसून येते.'

ख्रिस्ती मठवासिनी भगिनींबरोबर रमाबाई राहात असल्यामुळे रमाबाईंना खूप सुरक्षित वाटत होते. अर्थात, इतकी तरूण विधवा इंग्लंडमध्ये राहाणार कशी, कुठे? या प्रश्नांची उत्तरे त्यांनी कॉन्व्हेंटमधील मठातील आपल्या वास्तव्यातून दिली. इंग्लंडमध्ये गेल्यावर रमाबाईंनी आपला पोशाख बदलला. हवामानानुसार पोशाख बदलण्याची आवश्यकता होती. पण आपला भारतीय आहार मात्र रमाबाईंनी बदलला नाही.

रमाबाईंच्या गंभीर प्रवृत्तीमागे मिस्कीलपणा, विनोदबुद्धीही दडलेली होती, याचे प्रत्यंतर एका ठिकाणी येते. त्या जेव्हा माल्टा शहर बघायला गेल्या; तेव्हा रस्त्यावरील सगळे लोक त्यांना काळ्या पोशाखात दिसले; आपल्या नजरेतून स्वतःचा 'अवतार' वर्णन करताना रमाबाई म्हणतात, "आम्ही त्या शहरात गेलो; तेव्हा सगळी माणसे आमच्याकडे टक लावून पाहू लागली. त्यांना वाटले असेल; हे पांढऱ्या कापडाने वेष्टिलेले नवीन पदार्थ कोणत्या प्रदर्शनाकरिता, कोणी येथे पाठविले आहेत, कोणास ठाऊक?"

इंग्लंडमधील चेल्टनहॅम महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका कु. डॉरथी बेल व सेंट मेरीज होममधील सिस्टर जिराल्डीन यांचा भरभक्कम आधार रमाबाईंना मिळाला होता. आध्यात्मिकता आणि धार्मिकता याविषयी सिस्टर जिराल्डीन व रमाबाई यांच्या चर्चा चालत. 'होम्स ऑफ फुलहॅम'

येथील दयाकृत्ये करणाऱ्या धर्मभगिनी पाहून हिंदू व ख्रिस्ती धर्माचा तुलनात्मक विचार त्या करू लागल्या. आपल्याकडे सापाला दूध पाजतील, मुंगीला साखर घालतील, पण एखाद्या उपेक्षित स्त्रीकडे ढुंकूनही पाहाणार नाहीत. हा फरक त्यांना विशेषत्वाने जाणवला. ख्रिस्ती धर्मातील समानता, अनुकंपा, करुणा त्यांना खूप भावली. मानवतेचा व करुणेचा मंत्र देणाऱ्या ख्रिस्ताकडे त्या आकर्षित झाल्या. शिवाय फा. नेहेम्या गोरे यांच्या पत्रामुळे रमाबाईंना एक गोष्ट कळली. सिस्टर जिराल्डीनबरोबर झालेल्या, आपल्या पत्रव्यवहारात त्या लिहितात की, 'मी ज्या ब्राह्मो समाजाची एक भाग आहे, तो वेदांनी शिकवलेला नाही. या प्रवाहाचे मूळ जर ख्रिस्ती असेल; तर मी त्यालाच प्रगटपणे का स्वीकारू नये?'

रमाबाईंनी लहानपणी कधीतरी 'येशू' शब्दाचा केलेला पुनरूच्चार संस्कृत 'बायबल' ची न वाचताच बाजूला ठेवून दिलेली प्रत, बंगाली भाषेतील, 'सेंट लूकचे शुभवर्तमान' वाचून निर्माण झालेले तरंग, या सर्वांना धर्मांतराने एक वेगळी दिशा मिळाली. नवीन आध्यात्मिक जीवनाचे आव्हान त्यांनी स्वीकारले. या घटनेमुळे पुण्यात त्यांच्यावर टीकेचे मोहोळ उठले. परंतु हे आघातसुद्धा झेलण्याची त्यांची मानसिक तयारी आधीच झालेली होती. आपल्या वैयक्तिक जीवनातील हार पत्करूनही बिपीन बिहारी मेधावींच्या मृत्युनंतर रमाबाई म्हणतात, 'ते अधिक जगले असते तर काय झाले असते, सांगता येत नाही.' कदाचित रमाबाईंचे धर्मांतर झाले नसते. कारण आपल्याकडे येणाऱ्या ॲलन नामक मिशनऱ्याला, बिपीन बाबूंनी आपल्या घरी येण्यास बंदी घातली होती. तीही रमाबाईंच्या ख्रिस्ती धर्माबाबत वाढत चाललेल्या उत्सुकतेमुळेच!

देवाची कृपा आपल्यावर असणे, आपल्या शक्तीनुसार सत्कृत्ये करणे, पापापासून दूर राहाणे, हे आपल्या मुक्तीसाठी पुरेसे आहे. अशी रमाबाईंची ख्रिस्ती धर्मासंबंधी, स्वतःची समजूत होती. धर्मातरानंतरही रमाबाईंनी आपला स्वाभिमानी बाणा बदलला नाही. त्या म्हणतात, 'माझ्या

आध्यात्मिक आईबापांचा मी मान राखते; पण त्याबरोबर त्यांना प्रश्न विचारण्यासाठी, मी कमी करणार नाही. आणि श्रद्धेबाबतच्या सर्व विषयांवर मी त्यांच्याशी सहमत असेनच असे नाही. मला माझ्या स्वतःचा विचार व्यक्त करण्याची मुभा असावी' एकदा रमाबाईंनी सिस्टर जिराल्डीन यांना लिहिले- 'मी माझ्या जातीच्या पूर्वग्रहांपासून दूर गेलेले नाही; हे खरे आहे. मी हिंदू आहे. कारण माझ्या पूर्वजांच्या अनेक रीतीभाती मी अनुसरते.'

खिस्ती धर्मात आनंदाचे निदान सापडल्यावर खिस्ती धर्माचा, अधिक जोमाने अभ्यास करण्यास रमाबाईंनी सुरूवात केली. त्याचबरोबर विविध शास्त्रे, गणित, इंग्रजी वाङ्‌म य यांचा अभ्यास केला. मूळ 'बायबल' ग्रीक व हिब्रू भाषेत होते. त्यामुळे त्या भाषा शिकण्यासाठी रमाबाईंनी सुरूवात केली. सप्टेंबर १८८४ मध्ये चेल्टनहॅम येथे त्या संस्कृतच्या अध्यापिका म्हणून रूजू झाल्या. कानाच्या बहिरेपणामुळे वैद्यक शिकण्याचा विचार रमाबाईंना सोडून द्यावा लागला.

या सगळ्या घडामोडीत रमाबाईंवर इंग्लंडला गेलेल्या आनंदीबाई भगत यांनी आत्महत्या केली. मृत्युच्या आधी तिच्या इच्छेप्रमाणे तिला बाप्तीज्मा दिला गेला. इंग्लंडला 'बुखारा' नामक आगबोटीतून रमाबाई व आनंदीबाई निघाल्यावर आपल्या मैत्रिणीची योग्य ती काळजी रमाबाई घेत होत्या. आगबोटीत त्यांना २७ दिवस उपवास काढावा लागला. रमाबाईंना अशा खडतर आयुष्याची सवय होती. पण आनंदीबाईंना नव्हती. ती तर कधी घराबाहेरही पडली नव्हती. याची रमाबाईंना जाणीव होती. आणि आता तर तिने अगदी आत्महत्याच केली. या घटनेने रमाबाई एकदम खचून गेल्या. रमाबाईंवर एकदम दडपण आले. रमाबाईंनी आपल्या आयुष्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले होते. वेळोवेळी जीवनातील बदलालाही सामोरे जाऊन त्याचा स्वीकारही केला होता. त्यामुळेच तर परक्या प्रांतातही रमाबाईंना जमवून घेता आले. आनंदीबाईंना ते जमले नसावे.

पंडिता रमाबाईंच्या धर्मांतराकडे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, डॉक्टर भांडारकर यांनी जराशा सहिष्णुतेने पाहिले; तर ज्योतिराव फुलेंनी हिंदू धर्मातील कर्मठ प्रवृत्तीला, स्त्री-शूद्रांना दिलेल्या नीच स्थानालाच रमाबाईंनी आव्हान दिल्यामुळे त्यांना, त्यांनी पाठिंबा दिला, जोतीराव फुले म्हणतात, 'ज्यावेळी पुण्यात पंडिता रमाबाईंने येऊन हिंदूधर्मप्रतिपादक अनेक व्याख्याने दिली त्यावेळी मला त्यांच्या व्याख्यानाची फारशी थोरवी वाटली नाही. कारण हिंदूधर्माचे उत्पादकांनी स्त्री शूद्रादी अतिशूद्र जातीवर कोणकोणत्या प्रकारची आग पाखडून त्याजवर अनेक प्रकारचे जुलमी लेख केले. हे त्या बिचाऱ्या बाईबापड्या पंडिता रमाबाईस माहीत कोठून? परंतु त्यांनी विलायतेस जाऊन हिंदू व खिस्ती धर्माची तुलना केल्यामुळे त्यास हिंदूधर्माचा हेकट व पक्षपातीपणा दिसून आल्याबरोबर त्यांनी हिंदू धर्माचा धिक्कार करून खिस्ती धर्माचा अंगीकार केला. अशा शोधक साध्विनीस पाहण्याची कित्येकास फार इच्छा झाली आहे. पंडिता रमाबाई मनाचा दृछ निश्चय करून इंग्लीश अभ्यास करण्याकरता असमंजस पत्रकर्त्यांनी ह्या अबलेस नानाप्रकारची निरर्थक 'इसापनीतीतील कोल्ह्या' सारखी दूषणे दिली. अरे ह्या स्त्रियांबरोबर हुंबर घालणाऱ्याने पं. रमाबाईंचे नावसुद्धा घ्यावयाचे नव्हते. कारण याची समजूत ती किती? जर पंडिता रमाबाईंबरोबर यास तोलून पाहिले; तर याचे वजन खंडीस नवटक्यासारखे भरणार आहे.' जोतीराव फुल्यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत, रमाबाईंच्या धर्मांतरावर टीका करणाऱ्या पत्रकर्त्याचा समाचार घेतलेला आहे.

## तळहृदयातला स्त्रीचा आवाज

इंग्लंडमध्ये तीन वर्षे रमाबाईंचे वास्तव्य होते. अमेरिकेतील पेनिसिल्वानिया येथील स्त्रियांच्या वैद्यक महाविद्यालयाच्या डीन डॉ. रचेल बॉडले यांनी, आनंदीबाई जोशी यांच्या डॉक्टरकीच्या पदवीदान समारंभाचे आमंत्रण केल्यामुळे १८८६ मध्ये रमाबाई फिलाडेल्फियाला आल्या. आनंदीबाई जोशींची आईकडील आजी, अनंतशास्त्री डोंगरेंची मावसबहिण लागत होती. भारतातील पहिली महिला डॉक्टर म्हणून आनंदीबाईंच्या या आनंदसोहळ्यात उपस्थित राहणे रमाबाईंना आपले कर्तव्य वाटले. शिवाय आपण स्वतः डॉक्टर होऊ शकलो नाहीत; तरी आपल्या दूरच्या नात्यातील व विशेषतः मराठी भगिनी डॉक्टर होतेय याचा त्यांना मोठा आनंद होता. त्यावेळी रमाबाईंचे भाषणही झाले.

डॉ. आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभानंतर दुसऱ्या दिवशी अमेरिकन प्रेसने रमाबाईंचे भाषण व भारतीय महिलांसाठी झटणारी व्यक्ती म्हणून रमाबाईविषयी वृत्तांत दिला होता. हा वृत्तांत २ मे, १८८६ च्या 'द मराठा' या लोकमान्य टिळकांच्या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला होता. तथापि त्यात डॉ. आनंदीबाईंचे अभिनंदन करताना, पंडिता रमाबाईंना गौण लेखले होते. पंडिता रमाबाईंचे कार्य मोठे असले, तरी धर्मांतरामुळे, लोकमान्य टिळकांचा त्यांच्यावर रोष होता.

रमाबाई अडीच वर्षे अमेरिकेत होत्या. खरं तर रमाबाईंचा गोरा रंग, घारे डोळे, यामुळे त्या 'त्यांच्या' पैकीच (अमेरिकेतल्यासारख्या) दिसत होत्या. आनंदीबाई जोशींची चरित्रकथा लिहिणारी कॅरोलिन डाल म्हणते; 'रमाबाई दिसायला सुंदर होती. तिच्या त्या विधवेच्या पांढऱ्या साडीवरून ती भारतीय वाटत होती इतकेच! ब्राह्मण व्यक्तीकडे असणारा गंभीरपणा, तिची तेज बुद्धिमत्ता आणि इंग्रजीचे ज्ञान यामुळे तिचा फिलाडेल्फिया व बोस्टन येथील उच्चवर्गात सहज प्रवेश झाला.

रमाबाईंनी अमेरिकेतील आपल्या वास्तव्यात शैक्षणिक सामाजिक क्षेत्रांची पाहणी करण्यास सुरूवात केली. शिक्षणाला व्यावसायिकतेची जोड असावी, असे त्यांना वाटत होते. आपल्याकडे बालवाडीची नितांत आवश्यकता आहे, असे वाटल्यामुळे 'फ्रोबेल्स किंडरगार्टन' चा त्यांनी अभ्यास केला. असे शिक्षण आपल्याकडील बालविधवांना देऊन त्यांना शिक्षिका म्हणून घडवावे, असा त्यांचा विचार होता. अमेरिकेत त्यांनी शालेय क्रमिक पुस्तकांची भाषांतरे केली. ही पुस्तके छापण्यासाठी आर्थिक साहाय्य मिळावे; म्हणून स्वतः 'The High Caste Hindoo Woman' (१८८७) हे इंग्रजी पुस्तक लिहिले. या लेखनाचा मुख्य उद्देश भारतातील स्त्रीजीवनाचा पाश्चात्यांना परिचय करून द्यावा हा होता. त्याचबरोबर भारतीय स्त्रीला शिक्षणाची असलेली नितांत गरज त्यांना पटवून द्यावयाची होती. आपल्या समाजाविषयीचे त्यांचे निरीक्षण सूक्ष्म होते. तत्त्वासाठी, ध्येयासाठी हिरीरीने कार्य करू इच्छिणाऱ्या एका झुंजार स्त्रीचे दर्शन प्रस्तुत पुस्तकातून होते. यामधील रूढी-परंपरा स्त्रीच्या माथी मारल्या त्याविषयी त्यांना मनस्वी चीड आहे. केवळ मुलाचा जन्म व्हावा म्हणून साजरे केले जाणारे धार्मिक विधी, ज्या समाजव्यवस्थेची स्त्री बळी ठरलेली आहे, ती जाचक व्यवस्था, या साऱ्यांचा खरपूस समाचार रमाबाईंनी प्रस्तुत ग्रंथात घेतलेला आहे.

परदेशात जाऊन रमाबाई आपल्या देशातील आपल्या लोकांनी चालविलेल्या स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडतात. मुलीच्या जन्माविषयी रमाबाई म्हणतात. 'एखादे मच्छर वा एखादा त्रासदायक कीटक चिरडून टाकावा, तसे मुलीला चिरडले जाते. तिच्या 'गळ्याला नख लावून मारले जाते' मुलीच्या मृत्युचे, बालिका मृत्युचे प्रमाण इतके होते, की एकदा पाहणी करताना रमाबाईंना असे आढळून आले की, मुलगी तरसाने पळवून नेली असे आईबाप सांगत आहेत. सगळ्या घरातील फक्त मुलीच तरस कसा काय पळवून नेतो. याविषयी त्यांनी

आश्चर्य व्यक्त केले. खरे कारण म्हणजे या बालिकांच्या 'गळ्याला नख' लावून त्यांना मारण्यात आलेले होते.

स्त्रीशूद्रांना 'धर्मशास्त्रा'चे ज्ञान दिल्यास, 'धर्मशास्त्र' अपवित्र होतील. म्हणून त्यांना धर्मज्ञानापासून दूर ठेवणे; त्यामुळे त्यांच्यावर सतत धर्माचे दडपण राहिले व त्यांचा विकास होऊ शकला नाही.

'धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील स्त्रीचे स्थान' या प्रकरणात, त्या काळात गाजलेला एक खटला, रखमाबाई सावे प्रकरणाचा उल्लेख करीत रमाबाई लिहितात, 'शक्तिशाली हिंदू धर्मशास्त्र, बलवान, ब्रिटिश सरकार, भारतातील बारा कोटी पुरुष आणि तेहतीस कोटी देव यांच्या विरोधात रखमाबाईंनी आवाज उठवला.' पंडिता रमाबाईंच्या शब्दांना विलक्षण धार प्राप्त झालेली आहे. 'इंग्लंडचा प्रवास'लिहिणाऱ्या आर्जवी रमाबाई चार वर्षात किती बदलल्या याचे प्रत्यंतर 'The High Caste Hindoo Woman' या पुस्तकावरून येते. इंग्लंडपेक्षा अमेरिकेत विचारस्वातंत्र्य, आविष्कारस्वातंत्र्य अधिक असल्याचाही हा परिणाम असावा. अत्यंत कल्पकतेने रमाबाईंनी एकेका शब्दाचा वापर केलेला आहे. 'चितेच्या अग्नीपासून पळून गेल्या तरी स्त्रिया लोकांच्या दाहक नजरात 'सती' जातातच.' हे या अनुभवातील स्त्रीसुलभ निरीक्षण फार महत्त्वाचे आहे. जेथे स्त्रियांनी हातात लेखणी घेतली; तर ती विधवा होते, असा समज प्रचलित होता. त्याच देशातील एक स्त्री अमेरिकन लोकांना आपल्या लेखणीचे सामर्थ्य दाखवीत आहे.

पंडिता रमाबाईंचे हे धारदार लेखन म्हणजे, जागतिक पातळीवरील भारतीय स्त्रीचा, स्त्रीस्वातंत्र्याचा पूर्वसूर आहे. याआधी १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' नामक शंभर पानांचा निबंध लिहून पुरुषप्रधान भारतीय मानसिकतेवर कोरडे ओढलेले होतेच. रमाबाईंनी हे लोण इंग्रजी भाषेतून परदेशापर्यंत पोहोचवले. या लेखनाला त्यांनी कृतीची देखील जोड दिली. 'An Appeal' या प्रकरणात, अमेरिकन जनतेकडून निदान दहा वर्षेपर्यंत तरी आपल्या कार्यासाठी

मदत मिळावी म्हणून भावनिक आवाहन केले. तळमळून त्या लिहितात- 'माझ्या मायबापांनो! तुमच्या लाडक्या बाळांची तुलना तुम्ही भारतातील त्या बालिकांशी करून बघा, ज्या अगदी कोवळ्या वयात सामाजिक अनिष्टतेच्या अपवित्र वेदीवर बळी जातात. त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या त्यांच्या मातापित्यांच्या हातून तुम्ही या बालविधवांना वाचवा. हजारो बालविधवा आशेच्या किरणाविना दरवर्षी मरतात, आणि आणखी हजारो पाप आणि नाचक्की याखाली चिरडून जातात. भारतीय कन्यकांचा क्षीण आवाज आपल्या कानापर्यंत आणि हृदयापर्यंत पोहोचो!'

स्त्रीजीवनस्थितीची पौरस्त्य व पाश्चात्य परिस्थितीतील दोन चित्रे एकमेकांशेजारी ठेवून ज्या कळकळीने रमाबाईंनी हे आवाहन केलेले आहे, त्यात त्यांची भावनिक प्रगल्भता, त्यांचे देशप्रेम व मानवताधर्माने झपाटलेले त्यांचे मनही दिसून येते.

या काळात रमाबाईंनी पाच वर्षीय मनोरमेला इंग्लंडला पाठवले होते आणि त्या आपल्या स्त्रीशिक्षण विषयक कार्यासाठी अमेरिकेत प्रबोधनपर व माहितीपर व्याख्याने देत होत्या. 'The High Caste Hindoo Woman' च्या लेखनाने रमाबाईंच्या विचारांना खूप प्रसिद्धी मिळाली. यातूनच डिसेंबर १८८७ मध्ये The Ramabai Association of Bostan' ची स्थापना झाली. अनेक संस्थांनी त्यासाठी आपली संमति आणि सहकार्य दिले. दहा वर्षेपर्यंत आर्थिक मदत देण्याचा करारही झाला.

अमेरिकेतील वास्तव्यात अमेरिकेतील लोकांसाठी, रमाबाईंनी, व्यवस्थेच्या दबावाखाली वावरणाऱ्या भारतीय स्त्रीच्या स्थितीविषयी इंग्रजीत अनुभवलेखन केले; तर भारतीय, विशेषतः मराठी समाजासाठी मराठीतून प्रगतीशील अमेरिकेचे वर्णन केले. 'युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त' असे या पुस्तकाचे नाव होते. अमेरिकेत, या पुस्तकाचे लेखन केले होते. फेब्रुवारी १८८९ मध्ये मुंबईत आल्यावर हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

प्रस्तुत ग्रंथातही स्त्रीसुधारणाविषयक विचारांना रमाबाईंनी प्राधान्य दिलेले आहे. स्त्रीशिक्षणास लोकमत अनुकूल नसताना देखील ‘आनंदीबाई ही पहिली हिंदू स्त्री वैद्यक शिकून पदवी पावल्याबद्दल ’ रमाबाई तिच्याबद्दलचा अभिमान व्यक्त करतात आणि स्त्रीशिक्षणाबद्दल भारतीय स्त्रियांच्या मनातील पूर्वग्रह व पुरुषांच्या मनातील दुराग्रह दूर व्हावा म्हणून प्रयत्न करतात. शिक्षणामुळे स्त्रियांच्या शरीर संपत्तीचा किंवा सौंदर्याची हानी झालेली कोठे दिसून येत नाही. शिवाय कोर्नल, वेसले इ. विद्यालयाच्या झालेल्या पाहणीवरून एकंदरीत स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत रमाबाई लिहितात- ‘या विद्यालयांतून पदव्या मिळवून गेलेल्या स्त्रिया विवाहित होऊन, उत्तम रीतीने संसार चालवीत आहेत. त्या शिक्षित झाल्या म्हणून मुलाबाळांचा, गृहकृत्यांचा अव्हेर करीत नाहीत. त्यांच्या संसाराची वाताहत झालेली नाही.’ फ्लॉरेन्स नाइटिंगेल, बायकांच्या कुसेड्स इ. चा संदर्भ त्या देतात. ‘स्त्रियांच्या कुसेड्स लोकांचे प्राण वाचवून, त्यांना नरकातून ओढून काढून शांती आणि आनंद देणाऱ्या असतात.’ हे नमूद करायला रमाबाई विसरत नाहीत.

अमेरिकेतील स्त्रियांचे कपडे, बूट इ. फॅशनवर रमाबाई टीकाही करतात. प्राणीपाखरांविषयी रमाबाईंच्या मनात कणव आहे. आपला ‘नखरा’ सजवण्यासाठी अमेरिकन लोक पाखरांचा बळी घेतात ही गोष्ट त्यांना अजिबात रूचत नाही. प्राणी व पाखरे पेंढा भरून देखावा म्हणून ठेवणेही त्यांना आवडत नाही. ‘भूतदये’ विषयीचा रमाबाईंचा हा ‘आवाज’ ही लक्षात घेतला पाहिजे. करुणामयी गाईची हत्या करणाऱ्या कसायांवरही रमाबाई शाब्दिक वार करतात. भारतातील भूतदयेबाबतीतील विरोधाभासही नजरेस आणून देतात. ‘आमच्या देशातील भूतदया, अमेरिकनांच्या उलट आहे. ते मनुष्येतर प्राण्यांना यातना देतात. आम्ही त्यांच्यासाठी पांजरपोळ घालतो. गोशाळा स्थापन करतो. ढेकूण-उवा-चिलटे-मुंग्या-यांस मोठ्या दयेने मनुष्याचे रक्त देऊन त्यांचे पोषण करतो. सापाला दूध पाजून त्याची पूजा करतो. पण

मनुष्यांच्या जीवांचे आम्हाला काही वाटत नाही. शेजारी कोण मेले, तर आम्ही घराची दारे लावून बसतो. आमच्या बायका नाना प्रकारचे रोग होऊन मरतात; पण इंग्रजांनी तंबी दिल्यावाचून आम्ही बायकांकरिता दवाखाने घालीत नाहीत. आम्ही गाईला मातेसमान समजून तिच्या पाया पडतो. पण आमच्या बायकांना, आमच्या मुलांच्या आयांना, आम्ही मरेपर्यंत मारतो.'

खिस्ती धर्मातही न्याय व समानतेची शिकवण दिलेली असूनही धर्मातील आणि समाजातील प्रचलित रुढीपरंपरांनी स्त्रियांना जे गौण स्थान दिले आहे. त्यावरही रमाबाई नेमके बोट ठेवतात. त्या लिहितात 'स्वतः खिस्ताचा व त्यास अनुसरून चालणाऱ्या पौलसाचा खिस्ती धर्म म्हणतो की, खिस्तात पुरुष आणि बाई असा भेद नाही. तर सर्व लोक परमेश्वराची लेकरे आहेत. परंतु हल्ली या देशी चालू असलेल्या बहुतेक मतात बायका पुरुषांपेक्षा अवर मानिल्या जातात व त्यांस पुरुषांप्रमाणे उपदेश करण्याचा अधिकार व संस्कारादि धर्मकृत्य करण्याचा अधिकार नाही. त्यांचा विवाह होताना, 'मी आपल्या भ्रताराची आज्ञा पालन करीन' अशी शपथ घ्यावी लागते. नवरा बायकोच्या शिरःस्थानी आहे असे धर्मोपदेशकाचे (पुरुषांचे) सांगणे आहे.'

हिंदू धर्मग्रथांत स्त्रीला कमी लेखलेले आहेच. परंतु खिस्ती धर्मग्रंथांतील स्त्रीविषयक अशा उल्लेखांचाही त्यांना खेद वाटतो. स्त्रियांबाबत धर्मातीत अशी समानतेची भूमिका त्यांनी घेतली आहे. याबाबतीत त्या, आधुनिक स्त्री-मुक्तिवादी विचारसरणीच्या कार्यकर्त्या स्त्रियांच्या फार जवळ आहेत.

अमेरिकेतील लोकांचे स्वावलंबन, 'तारायंत्र, आगगाड्या, डाक इ. सारख्या लोकस्थापित मंडळ्या' तसेच त्यांच्या हृदयातील धगधगणारा स्वदेशाभिमान याबद्दल रमाबाई गौरवोद्गा र काढतात. भारतीयांनी मात्र त्यांचे अंधानुकरण करीत आपला देश विकला, यासंदर्भात त्या लिहितात-'आम्ही आपले सोने देऊन विलायती जस्ताची भांडी घेतली.

आपले मार्ग बंद करून, विलायती स्वस्त कापड नेसायला लागलो. आम्ही काचेचे मणी व मद्य भरून आलेल्या काचेच्या बाटल्या घेऊन आपली रत्नभूमी परदेशी लोकांस विकून टाकली आणि आता त्या मद्याने आमचे प्राण जात आहेत. शंभर वर्षापूर्वीच रमाबाईंनी जागतिकीकरणाचे सूतोवाच करून ठेवले होते.

भारताची राष्ट्रभाषा हिंदी असावी म्हणून रमाबाईंनी मांडलेले विचारही मननीय आहेत. ‘आमच्या देशात असलेल्या सर्व भाषा नाहीशा करून त्याच्या जागी इंग्रजी स्थापणे म्हणजे हिंदुस्थानीला समुद्रात बुडवून त्याच्या ठिकाणी ब्रिटिश बेटे आणून ठेवण्यासारखे आहे. हिंदी भाषेचे व्याकरणही फार सोपे आहे. असली अमोलिक सुरेख भाषा आपणास लभ्य असता आणि ती राष्ट्रीय भाषा करण्याचे इतके सुलभ असता, आमचे विद्वान बंधू हिंदुस्थानातील सार्वजनिक गोष्टींची वाटाघाट करण्यासाठी ती सातासमुद्राकडून आलेल्या प्राचीन मिसरी चित्रलिपीप्रमाणे साधारण लोकांस न कळणाऱ्या इंग्रजी भाषेत काय म्हणून करतात.’

पंडिता रमाबाईंना अनेक भाषा अवगत होत्या. अनेक व्याकरणासाह, शास्त्रशुद्ध रीतीने त्या भाषा शिकल्या होत्या. त्यामुळेच मातृभाषेचे व भारतीय भाषेचे महत्त्व त्यांना पटलेले होते. शिवाय भारतीय समाजातील तळागाळातील लोकांसाठी काम करायचे; तर त्यांच्या भाषेत करता यावे यावर रमाबाईंचा कटाक्ष होता. त्यांना अवगत असलेल्या इंग्रजी भाषेचा उपयोग त्यांनी लेखन, संभाषण-भाषण यासाठी केला. परंतु ज्या स्त्रियांसाठी त्या काम करीत होत्या त्यासाठी त्यांनी मराठी व हिंदी भाषेचाच अवलंब केला आणि इंग्रजीवर प्रभुत्व होते, म्हणून इंग्लंड अमेरिकेतच कायमचे वास्तव्य केले नाही; तर ब्रिटिश सरकारवर प्रहार करण्यासाठीसुद्धा त्यांनी मातृभाषेचा उपयोग केला.

स्वदेशीबद्दलचे रमाबाईंचे विचार गांधीजीपूर्व काळातील आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांचे महत्त्व अधिक आहे. शिवाय मातृभाषेच्या अभिमानाचे विचार एका शतकापूर्वीच त्यांनी सांगून ठेवल्याने त्या

विचारांना आजही महत्त्व प्राप्त होते. रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व सतत गतिमान प्रवाही राहिलेले आहे. त्यांच्या ग्रंथांतून, अन्य लेखनातून, वक्तव्यातून, त्यांच्या उत्तरोत्तर विकसित होत जाणाऱ्या जीवनदृष्टीचे दर्शन घडते. त्यांचा वैचारिक आवाका विस्तृत होत गेला. भारतातल्या मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाच्या चौकटीतील स्त्रीपासून जागतिक पातळीवरील स्त्रीजीवनचिंतनापर्यंत त्या गेल्या. त्यात समग्र राष्ट्रजीवनाचा विचारही त्या करीत गेल्या व संस्कृत-मराठी-इंग्रजी अशी भाषेची विविध वळणे या प्रवासाशी सुसंगतपणे प्रगटत राहिली.

रमाबाई अमेरिकेतून जपानमार्गे भारतात आल्या. जपानमध्येही त्यांनी काही व्याख्याने दिली. फेब्रुवारी १८८९ मध्ये मुंबईत आल्यावर त्यांची मनोरमेशी भेट झाली. मनोरमा इंग्लंडमधील सिस्टरांबरोबर मुंबईत आली होती.

# बालविधवांना प्रेमाची ऊब

भारतातून इंग्लंडला जाताना रमाबाई विद्यार्थिनीच्या अवस्थेत होत्या. परंतु अमेरिकेतून मुंबईकडे येताना त्या ज्ञानसमृद्ध होऊन व कामाची निश्चित योजना आखून एक समर्थ स्त्री बनून आल्या होत्या. आल्याबरोबर लगेचच ११ मार्च रोजी १८८९ रोजी मुंबईत चौपाटी विभागात 'शारदासदन' या स्त्रियांचे वसतिगृह असलेल्या शाळेची स्थापना केली.

१८५६ मध्ये विधवा विवाहास अनुमती देणारा कायदा अस्तित्वात आला होता. प्रसिद्ध बंगाली सुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी 'मॅरेज ऑफ विडोज' हा ग्रंथ लिहिला होता व १८६५ मध्ये विष्णुशास्त्री पंडितांनी त्याचे मराठीत भाषांतर केले होते. विष्णुशास्त्री पंडिताच्याच पुढाकाराने आंग्रेवाडीत माधवराव विठ्ठल विंचुरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विवाहोत्तेजक मंडळ स्थापन झाले. त्यांच्या प्रयत्नाने नाना भिडे, मोरोबा कान्होबा, अशा सुधारकांनी विधवांशी विवाह केले होते. मात्र त्यानंतर २८ मार्च १८७० ते ५ एप्रिल १८७० या काळात पुणे येथे विधवा विवाहाच्या सशास्त्रतेसंबंधी कडाक्याचा वाद झाला. त्यात सनातनी विचाराच्या लोकाचा विजय होऊन त्रैवर्णिकात विधवाविवाह निषिद्ध ठरविण्यात आला. या पार्श्वभूमीवर पंडिता रमाबाईंना 'शारदा सदन' सुरू करावे लागले, याचे प्रयोजन लक्षात येते. विधवा विवाहविषयक पुरोगामीविचार सर्वदूर पोहोचले नव्हते. ग्रंथप्रामाण्याचा पगडा होताच. रमाबाईंचे सुदैव असे की, पुरोगामी विचारांच्या लोकात त्यांचे पांडित्य स्वीकारले गेले. कलकत्त्यात विवाह व सिलचरमध्ये वैधव्य आल्यावर आधीच मानसिक बैठक पक्की झाल्यामुळे स्वयंनिर्णय घेत त्या महाराष्ट्र भूमीवर येऊन थडकल्या होत्या. इंग्लंड-अमेरिकेतून परतल्यावरही त्या पुन्हा महाराष्ट्रातच आल्या आणि लगेचच 'शारदा सदन' स्थापण्याचा निर्णय घेतला. काशिबाई कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली या सदनाचा शुभारंभ झाला.

खरे तर इंग्लंडला जाताना ख्रिस्ती होणार नाही, असे म्हणणाऱ्या पंडिता रमाबाई ख्रिस्ती होऊन आलेल्या होत्या. त्यामुळे 'शारदासदन' ही ख्रिस्ती संस्था असेल; असा विचार करून काशीबाईंनी समारंभाला जाणे नाकारले होते. परंतु या संस्थेत येणाऱ्या स्त्रियांना ज्ञान दिले जाईल व आपापल्या इच्छेनुसार धर्माचरणही करता येईल, अशी हमी पंडिता रमाबाईंनी दिल्यावर काशीबाई 'शारदा सदन' च्या उद्घाटन समारंभाला गेल्या.

रमाबाईंच्या बालविधवांसाठी कार्य करण्याचा उत्साह, संघटनात्मक गुण आणि राष्ट्रीय बाणा यामुळे वातावरणात जणू प्रेरणा संचरली, त्यात त्यांचे धर्मांतर लोक क्षणभर विसरून गेले. बॉम्बे परगण्यातील नामवंत समाजसुधारकांनी रमाबाईंना पाठिंबा दिला. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, न्यायमूर्ति के.टी. तेलंग, श्री. भांडारकर हे तर सल्लागार मंडळावर होते. १२ फेब्रुवारी १८८९ च्या 'केसरी' तही प्रोत्साहनपर मजकूर छापून आला. भारतीय विधवांसाठी कार्य करण्यासाठी, त्यांना शिक्षण देण्यासाठी परकीय भूमीवरून पैसा गोळा करून आणणे याला त्यांनी प्रशंसनीय कार्य म्हटले. काही क्षण तिचे धर्मांतर आणि सामाजिक व भावनिक दुरावा बाजूला ठेवून, "जर तिचे वागणे स्पष्ट असेल, तर लोकांचा तिच्यावर विश्वास बसेल" असे भाकीतही केले.

शारदा गद्रे ही 'शारदा सदन' मधील पहिली विद्यार्थिनी. पहिली बालविधवा विद्यार्थिनी. तिच्यावरून रमाबाईंनी 'शारदा सदन' हे नाव सदनाला दिले. तिच्याबरोबर गोदूताई नामक बालविधवा होती. हीच पुढे महर्षि धोंडो कर्वे यांची पत्नी बाया कर्वे झाली व एक सेवाभावी स्त्री म्हणून प्रसिद्धीस आली. पंडिता रमाबाई अथवा अण्णा कर्वे भेटायच्या आधी गोदूताईंनी दोन वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्या चार वर्षे सदनात राहिल्या. पंडिता रमाबाईंच्या चोख वर्तणुकीचा प्रभाव व शारदा सदनमधील प्रसन्न वातावरण यामुळे त्यांना नवी जीवनदृष्टी मिळाली. महर्षि धोंडो केशव कर्वे किरकोळ शरीरयष्टीचे होते. ते जास्त आयुष्य

जगतील की नाही; याविषयी रमाबाईंना चिंता होती. त्यामुळे विवाहावेळी गोदूताईंची 'आयुर्विम्याची योजना' काढून त्यांनी सदनात मोठी जेवणावळ घातली. (याच महर्षि कर्वेंना दीर्घायुष्य लाभले. १९५८ साली पंडिता रमाबाईंच्या जन्मशताब्दीत ते हजर होते. त्यावेळी त्यांनी रमाबाईंविषयी कृतज्ञता व्यक्त केली होती.)

गोदूताईंनी, कर्वेबरोबरच्या लग्नावेळी उखाणा घेतला होता-

सदनाचे उपकार । मजवर झाले फार

आनंदीने फेडायला । असावे तयार

आपली पत्नी या सदनाचे फळ आहे. याविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना अण्णासाहेब कर्वे म्हणतात की, "या शाळेतून ती आपल्याबरोबर तीव्र ज्ञानलालसा घेऊन बाहेर पडली. येथेच तिचे मन सुसंस्कृत व अंतःकरण विशाल बनले. आमच्या पुष्कळशा हलक्या दर्जाच्या वेडगळ समजूतीपासून तिची मुक्तता झाली. एक अत्युत्तम गृहिणी व जीविताची जोडीदार मला सदनाच्या कृपेने लाभली आहे."

'शारदा सदन' मध्ये रमाबाईंनी बालविधवांना एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली. रमाबाईंना स्वतःला अनौपचारिक शिक्षण मिळाले होते. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी आवश्यक असेच शिक्षण त्यांनी येथे या मुलींना दिले. रमाबाईंचे स्वच्छ चारित्र्य व व्यवहार यामुळे या मुलींनाही ख्रिस्ती धर्माविषयी कधी वावगे वाटले नाही. अशा धर्म स्वीकारामुळेच तर रमाबाईंना नवी जीवनदृष्टी मिळाली होती.

गोदूताई चार वर्षे सदनात राहिल्या. त्या काही ख्रिस्ती झाल्या नव्हत्या. गोदूताईंच्या आगमनानंतर आणखी पंचवीस स्त्रियांचा भरणा सदनात झाला होता. 'शारदा सदन' वर धर्मांतराबाबत टीका होऊनही लोकांना त्याचे आकर्षण वाटतच राहिले. बायाबाई उर्फ आनंदीबाई कर्वे यांची धाकटी बहीण कृष्णाबाई गद्रे यांनी 'शारदा सदन' चे वर्णन केले आहे, 'अमेरिकेतील लोकांच्या उदार साह्यामुळे पुण्यातील अगदी चांगल्या वस्तीमध्ये एक बंगला खरेदी करण्यात आला. काय त्या

बंगल्याची शोभा व काय तो सुदंर फुलांनी शृंगारलेला बगीचा! जिकडे पाहिजे तिकडे मोकाट फिरण्याची आम्हाला मुभा. दिवाणखानादेखील आमची बैठकीची जागा, सुंदर कोच, खुर्च्यांवर बसून गप्पा माराव्यात. बागेत जाऊन जाई-जुई, मोगरा, चमेली, बकुळी, मधुमालतीच्या वेण्या गुंफून केसांवर लादाव्यात, रमाबाईंनी आम्हाला, फुलांची, पक्षांची व झाडांची माहिती देऊन दुर्बिणीतून त्यांचे निरीक्षण करण्यास शिकवावे, काय ते लाड! चित्रे पुस्तके यांचा हवा तेवढा संचय. कधी कधी रमाबाई स्वतः पहाटेस उठून आम्हास आगाशीवर नेऊन नक्षत्रे, तारे दाखवीत व त्यांची नावे वगैरे आम्हाला मोठ्या आवडीने शिकवीत. ’

रमाबाई आपल्या मुलींना दुधा-तुपात लोळवते यावरून ‘केसरी’ व ‘सुधारक’ पत्रात तेव्हा वाद झाला होता. हे वर्णन पुण्यातील ‘शारदासदना’ चे आहे. नोव्हेंबर, १८९० मध्ये रमाबाईंना मुंबईतील ‘सदन’ पुण्यात हलवावे लागले. ‘शारदा सदना’ त मुलींना खिस्ती प्रार्थनेत सहभागी केले जाते, असे प्रसृत होऊन रमाबाईंवर टीकेची राळ उठली होती. एक विधायक स्वरूपाचे कार्य रमाबाई करीत आहेत. असे समजून संस्थेच्या समितीवर न्या. रानडे, भांडारकर प्रभृतींनी त्यांना सहकार्य दिले होते. मात्र लोकमान्य टिळकांनी केसरीतून त्यांच्यावर तोफ डागली.

नेमके याचवेळी मुंबईतील गर्दी, महागाई याला कंटाळून अठरा बालविधवांना घेऊन रमाबाई पुण्यात आल्या व तेथे एक बंगला विकत घेऊन ‘शारदा सदन’ चे कार्य चालू ठेवले. प्रतिकूल टीका होत असतानाही आत्मविश्वासाच्या भक्कम पायावर त्यांचे कार्य तसेच स्थिर उभे होते.

मुलींनी खिस्ती व्हावे, असे वातावरण निर्माण होत असल्याच्या नावाखाली सदनातील मुलींकडून माहिती काढण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रवाल्यांनी केला. न्यायमूर्ति रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर व

इतर सल्लागार मंडळींनी ‘रमाबाई असोसिएशन’ संस्थेचा राजीनामा दिला. काही पालकांनी आपल्या मुलींना सदनातून काढून घेतले.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ‘केसरी’ चे संपादक झाल्यावर केसरीने सतत पंडिता रमाबाईविरोधी – ‘शारदा सदन’ विरोधी भूमिका घेतली. त्याआधी १८८३ मध्ये ‘केसरी’ नेच रमाबाईंबद्दल एक स्फुट लिहिले होते, ते स्फुट ११ सप्टेंबर, १८९३ च्या ‘सुधारकात’ पुनर्मुद्रित केले होते. गो.ग. आगरकर हे ‘सुधारक’ चे संपादक होते व १८८३ साली ते ‘केसरी’ चे संपादक होते. त्यामुळे ते स्फुट आगरकरांनी लिहिलेले असावे. त्यात म्हटले आहे, ‘पंडिता रमाबाईंनी धर्मांतर केले; हे आमचे दुर्दैव होय. तथापि तेवढ्याच कारणासाठी आम्ही त्यास टाकून द्यावे; हे उचित होणार नाही. तेव्हा त्यांच्याविषयी मनात किंतु धरून त्यांच्यापासून विलग राहणे व त्यांनी हाती घेतलेल्या कार्यास साहाय्य न करणे हे आत्मघाताचे होईल,’ गो.ग. आगरकरांना स्त्रियांविषयी; त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्याविषयी असलेली आस्था यातून दिसून येते.

‘शारदा सदन’ एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने डॉ. भांडारकर, रमाबाई रानडे यांची पंडिता रमाबाईंच्या गौरवपर भाषणे झाली . त्याला ‘सुधारक’ वृत्तपत्राने प्रसिद्धीही दिली होती. लोकांनी अल्पस्वल्प मदत करावी म्हणून गो.ग. आगरकर आवाहनही करीत होते. ८ ऑगस्ट १८९२ च्या ‘सुधारक’ मध्ये ३१ रु. तर २२ ऑगस्टला ४ रु. वर्गणी जमल्याचे उल्लेख आहेत.

अमेरिकेतून पैसे आणण्याचे महद्दनभूत कार्य एखाद्या पुरुषाकडून का झाले नाही. पंडिता रमाबाईंकडूनच का झाले ? याचे कारण भारतीयांची सेवाकार्याबाबत असलेली अनास्था. म्हणूनच ‘सुधारका’त आगरकरांनी स्त्रियांनाच मदतीचे आवाहन केले. “ही संस्था खिस्त्यांवर किंवा परकियांवर सर्वकाळ अवलंबून असता कामा नये; आपल्या देशबांधवांना या कामाचे महत्त्व पटून त्यांनीच हे काम आपल्या शिराव घ्यावे.” असे

रमाबाईंना वाटे. परंतु तेथे धर्मांतर चालते या नावाने रमाबाईंवर टिका होऊ लागली होती.

गोमतीबाईंच्या बाप्तीजमा प्रकरणी पंडिता रमाबाईंची बाजू काय आहे हे पाहण्यासाठी गोपाळ गणेश आगरकरांनी २१ ऑगस्ट, १८९३ च्या 'सुधारक' मध्ये रमाबाईंची प्रदीर्घ मुलाखत घेतली. त्यात रमाबाई म्हणतात, "मी आपणहून मुलींना ख्रिस्ती होण्यास उद्युक्त करीत नाही. पण कोणी माझ्या प्रार्थनेच्या वेळेस येऊन बसल्या, 'बायबल' समजून घेण्यास उत्सुक असल्यास मी नाही म्हणत नाही. सदनात येताना मुलीचा धर्म हिंदू असला; तरी त्यातून ती बाहेर पडताना; तो धर्म हिंदू राहीलच असा जिम्मा माझ्याने घेववत नाही."

"तुम्ही ख्रिस्ती नसता; तर या तुमच्या सदनापासून महाराष्ट्रीय लोकांना पुष्कळच फायदा झाला नसता काय?" या आगरकरांच्या प्रश्नावर रमाबाई म्हणतात, "मी ख्रिस्ती नसते; तर मुळी शारदा सदनचं अस्तित्वात आले नसते. जे मी करीत आहे, ते मी चांगले समजून करीत असल्यामुळे त्याचा परिणाम कसाही झाला तरी त्याबद्दल मला पश्चाताप होणार नाही." रमाबाईंचे हे परखड उत्तर आगरकरांना आवडले.

याच अंकात रमाबाईंनी 'सुधारक' कार्यास पत्र पाठविले आहे. त्यात त्या लिहितात, "सदनातील मुलींना जाती-धर्माप्रमाणे जेवण-खाण, सोवळे-ओवळे, व्रतेवैकल्ये याबाबत पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणतेही विशेष धर्ममत शिकविले जात नाही. तरीही कुणी मुली किंवा त्यांचे पालक आपणहून प्रार्थनेला येणे, 'बैबल' समजून घेण्यास तयार असल्यास त्यांना नकार देत नाही."

'शारदा सदन' व 'ख्रिस्ती धर्मप्रसार' या लेखात गो.ग. आगरकर म्हणतात, "डॉ. भांडारकर, रा.ब. रानडे, रा.ब. भट यांनी ज्याअर्थी सदनाच्या साहाय्य कारिणीमंडळीतून आपली नावे काढून घेतली. त्या अर्थी सध्या त्या संस्थेची असावी तशी स्थिती नसली पाहिजे. 'शारदा सदन' केव्हाही निव्वळ मिशनरी संस्था होईल असे आमच्याने म्हणवत

नाही. हिंदू धर्माप्रमाणे आचरण करू इच्छिणाऱ्या मुलीस तसे करण्याला रमाबाईंकडून यत्किंचितही प्रतिबंध होत नाही असे आम्हास पक्के ठाऊक आहे. 'शारदासदना' त आपल्या मुलींनी स्वधर्म त्याग करण्याची बुद्धी न होऊ देण्यास्तव रमाबाई जितकी खबरदारी घेण्यास राजी आहेत, असे आम्हास आजपर्यंत वाटत होते; तितकी त्या घेत नाहीत; अशी थोड्या दिवसात आमच्या नजरेस आलेल्या गोष्टींवरून आमची खात्री झाली आहे. आणि म्हणून आजपर्यंत या सदनाचा जितका अभिमान आम्ही वाहिला; तितका तो यापुढे वाहणे अशक्य आहे. असे आम्ही मोठ्या कष्टाने कबूल करतो."

'शारदा सदन' ला आजपर्यंत दिलेला पाठिंबा काढून घ्यावा लागला, याचे आगरकरांना मनस्वी दुःख झाले. ११ सप्टेंबर १८९३ च्या 'सुधारका' त हिंदू शारदा सदन शक्य नाही का ? असा प्रश्न त्यांनी विचारला. अमेरिकेतील लोक हजारो रुपये पाठवून हिंदू विधवांना मदत करतात आणि आपल्या देशातील लोकांच्या हातून काहीच मदत होऊ नये, याची त्यांना खंत वाटते. आपल्याकडे फक्त बोलके सुधारक आहेत; कर्ते सुधारक नाहीत, असा आक्षेप होता. "अल्पहित साधण्याकरिता मोठे हित गमवावे लागते. हे रमाबाईंस दिसू नये. किंबहुना दिसत असूनही, त्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष करावे. हे आमच्या स्त्रीवर्गाचे दुर्दैव होय." असे म्हणत मोठ्या जड अंतःकरणाने त्यांनी शारदा सदनला असलेला पाठिंबा काढून घेतला होता.

१८९५ मध्ये पुण्यात कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. पंडिता रमाबाईंची कीर्ती ऐकून अनेक पुढाऱ्यांनी सदनाला भेट दिली. तोपर्यंत सदनात बारा मुलींचा बाप्तीज्मा झाला होता. त्या वर्षीच्या सामाजिक परिषदेमध्ये केशवपनाविरुद्ध आणि विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा जो ठराव झाला होता त्यावर बोलताना 'इंडियन सोशल रिफॉर्मर' चे संपादक व सुप्रसिद्ध समाजसुधारक श्री. के. नटराजन यांनी पंडिता रमाबाईंच्या कामाचे कौतुक केले आणि म्हटले , "जर आपण आपली सदने

काढण्याची फिकीर करीत नाही; तर पंडिता रमाबाईंवर टीका करताना, २१ जानेवारी, १८९६ च्या 'केसरी' त म्हटले आहे- "आपलेपणा सोडून देणारे असले हे गृहस्थ कितीही विद्वान असले; तरी एक प्रकारे ते आमचे व देशाचे शत्रूच होत."

या साऱ्या गदारोळात 'रमाबाई असोसिएशन ऑफ बोस्टन' यांनी या संदर्भात चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. मिसेस अॅन्ड्र्यूज यांना पाहणी करण्यासाठी पाठवले. असोसिएशनलाही आपल्यावर आरोप येणे प्रशस्त वाटत नव्हते. रमाबाईंची यातून निर्दोष मुक्तता झाली. परंतु रमाबाईंची व हिंदू समाजातील नात्यातील दुराव्याची जखम नंतर कधीच भरून आली नाही. एकतर विधवा आणि परित्यक्त स्त्रियांसाठी केले जाणारे कार्य, उच्चवर्णीय, ब्राह्मण समाजाच्या कक्षेच्या बाहेर होते. रमाबाईंनी केवळ आपल्या अंतःसामर्थ्याच्या बळावर या कार्याला सुरुवात केली होती व त्याला व्यापक स्वरूप दिले होते.

'शारदा सदन' मुंबईत सुरू झाल्यावर त्याच वर्षी म्हणजे १८८९ च्या डिसेंबर महिन्यातील २६, २७, २८ रोजी मुंबईत 'इंडियन नॅशनल काँग्रेस' भरले होते. एक स्त्री प्रतिनिधी म्हणून रमाबाईंनी यावेळी भाषण केले, "बालविवाह थाबवले पाहिजेत" याबाबत त्यांनी पुनश्च आवाज उठवला व बहुसंख्य लोकांनी त्यांना पाठिंबा दिला. १८९३ सालच्या काँग्रेसमध्ये 'विधवेचे केशवपन करू नये' असा निर्णय घेतला गेला.

बालविधवा, परित्यक्ता यांच्यासाठी काम करण्याची प्रेरणा रमाबाईंना बालपणातच मिळाल्याने त्यांनी सांगितले आहे. रमाबाई तेव्हा नऊ वर्षाच्या होत्या. एकदा यमुनेच्या तीरावर एका सुकुमार बालिकेला तिचा नवरा व सासू मारीत होते. ती मुलगी किंकाळ्या फोडीत होती. रमाबाई लिहितात, "तिच्या किंकाळ्या माझ्या हृदयाला जाऊन भिडल्या. माझ्या भगिनींना यथाशक्ति साह्य करण्याचे जे पवित्र कर्तव्य मी अंगिकारले आहे, त्याची पहिली हाक ती होती असे मला वाटते." त्यांची हाक 'शारदा सदन' च्या रूपात मूर्तिमंत झाली. 'युनायटेड स्टेट्स' च्या प्रवासवर्णनात

रमाबाई लिहितात, “एकदा कुमठ्याहून नावेत बसून आई-वडलांबरोबर मुंबईस जात असताना, एका ठिकाणी ते उतरले असता; एका टप्प्यावर (थांब्यावर) त्यांनी तीन इंग्रजी बायका दिसल्या. त्यांचे फुगीव लेहेंगे पाहून रमाबाई घाबरल्या होत्या. त्या आपल्या फुगीव लेहेंग्यामध्ये लहान मुलांना लपवून नेतील; यांची त्यांना भीती वाटत होती.”

या स्त्रियांना घाबरणाऱ्या रमाबाईने त्यांच्याच भगिनी असलेल्या स्त्रियांच्या नैतिक प्रोत्साहनावर व आर्थिक आधारावर ‘शारदा सदन’ सुरू केले होते व बालविधवांना आपल्या प्रेमाची ऊब दिली होती.

१८९६ मध्ये गुजरातमध्ये पडलेल्या दुष्काळातून रमाबाईंनी आणलेल्या स्त्रिया व १८९७ मध्ये पुण्यात आलेली प्लेगची साथ यामुळे सरकारी आदेशानुसार रमाबाईंना ‘शारदा सदन’ रातोरात केडगावला हलवावे लागले.

## दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात

१८९६ मध्ये गुजरातमध्ये दुष्काळ पडला होता, रमाबाई तेथे गेल्या. तेथील लोकांची दुरवस्था पाहून त्यांचे हृदय द्रवले. मद्रासमधील १८७६-७७ चा दुष्काळ त्यांना आठवला. तेव्हा त्या केवळ अठरा वर्षाच्या होत्या. त्याची फारशी झळ त्यांना पोहोचली नव्हती. परंतु त्या दुष्काळाच्या कथा त्यांनी ऐकल्या होत्या. त्यानंतर दारिद्र्य आणि भुकेपोटी आपल्या घरातील प्रिय व्यक्तींचा मृत्यू त्यांना पाहिला होता. केवळ धर्मग्रंथांचे ज्ञान त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवू शकले नव्हते, याचाही अनुभव गाठीस होताच. तसे झाले असते; तर आपल्या आईवडिलांचे प्राण आपण वाचवू शकलो असतो, याची मनस्वी खंत त्यांना होती.

आपल्या 'दुष्काळविषयक अनुभवा' त रमाबाई लिहितात, 'आम्ही आमचे सारे द्रव्य देवता प्रसन्न करणाऱ्या ब्राह्मणांना दान देण्यात खर्ची घातले. पण देव ब्राह्मण आम्हाला श्रीमंती देऊ शकले नाहीत. अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात, तीर्थक्षेत्री स्नान करण्यात आणि पाप-शापमुक्त होण्यात आयुष्याचा काळ घालवला, परंतु त्यामुळे आम्हाला दारिद्र्यच प्राप्त झाले. एकवीस वर्षाचा माझा तरुण व उत्साही भाऊ महिनोन्मयहिने उपवास करण्यात घालवल्यामुळे शरीराचे आरोग्य गमावून बसला. परंतु दगडाच्या देवमूर्ति तशाच कठीण राहिल्या आणि आमच्या प्रार्थनेला उत्तर मिळाले नाही.'

दारिद्र्य आणि उपासमार यांनी माणूस किती हतबल होतो याची जाणीव रमाबाईंना होती, स्वतःला अनेकदा उपवास घडल्याचे प्रसंग ती अजूनही विसरली नव्हती. इंग्लंडच्या प्रवासात बोटीतून जाताना, सत्तावीस दिवस उपवास घडल्याचे त्यांनी आपल्या इंग्लंडच्या प्रवासात लिहिले आहे. 'हिंदुस्थानातील प्रवासात नुसत्या पाण्यावरसुद्धा भूक-तहान भागविण्याची सवय होती, त्यामुळे फारसे कठीण गेले नाही. परंतु माझी मैत्रीण यापूर्वी कधी घराबाहेर निघालेली नव्हती. तिला पराकाष्ठेचे

कष्ट सोसावे लागले.' आपल्या सोबत असलेल्या आनंदीबाई भगत यांची त्या काळजी घेताना दिसतात.

सततच दुसऱ्याचा विचार करण्याची रमाबाईंची प्रवृत्ती होती. त्यामुळेच गुजरातमधील दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी त्या धावत गेल्या. तेथे गेल्यावर त्यांना दिसले की, सरकारने दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी तंबू उभारलेले होते. आपण तेथे जाऊन काय काम करायचे? हा प्रश्न रमाबाईंना भेडसावत होता. परंतु त्यांचा आतला आवाज त्यांना साद घालीत होता. 'तुझे ते जुने दिवस आठव'. इजिप्तमध्ये बंदिवासात पडलेल्यांची देवाने सुटका केल्याचे त्यांना आठवले. या बळावरच त्या गुजरातेत पोचल्या.

राजपुतांना येथील मिसेस ड्रायडन यांच्याबरोबर रमाबाई गुजरातेत गेल्या. पुण्यातील आपल्या अनाथाश्रमात तेथील काही मुलांना आणता येईल का? असा त्यांचा विचार होता. त्यासाठी सोहागपूरला जाऊन सरकारी अधिकाऱ्यांची परवानगी मिळविणे भाग होते. त्याआधी हॉस्पिटलचे डॉक्टर व गरीबांसाठी उभारलेल्या घराचे प्रमुख असलेले तहसीलदार यांना भेटणेही आवश्यक होते.

एके दिवशी सकाळीसकाळीच त्या डॉक्टरांना भेटायला गेल्या. डॉक्टर नसल्यामुळे त्यांना बाहेरच थांबावे लागले. तेव्हा दवाखान्याच्या समोरच त्यांना तीन मुले चालत येताना दिसली. जणू हाडांचे सापळेच चालत आहेत, असे त्यांना वाटले. ती मुले चांभार जातीतील होती. त्यांची विचारपूस करता त्यांना कळले; की, त्यांचे वडील मरण पावले होते.आई तर एक दिवसापूर्वीच मरण पावली होती. ती सात वर्षांची मुलगी अंगावरच्या चिंध्या सावरीत, थंडीपासून कसेबसे आपले रक्षण करू पाहात होती. पण तिच्याबरोबरच्या दोन मुलांच्या अंगावर तर काहीच वस्त्र नव्हते. त्यांचे कोमेजलेले चेहरे व दयनीय हावभाव दारुण परिस्थितीची साक्ष देत होते.त्या मुलांना तशा परिस्थितीत उचलून आणणे नियमबाह्य होते. त्यामुळे रमाबाई काहीच करू शकल्या नाहीत. नेमके त्याचवेळी

त्यांना ‘गरीबांसाठी घर’ केलेल्या ठिकाणी जावे लागले. त्या वेळात ती मुले कुठेतरी निघून गेली. तेथून आल्यावर रमाबाईंनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण ती मुले त्यांना सापडली नाहीत. ते दृश्य मात्र त्यांच्या हृदयात कायमचे कोरले गेले.

‘गरीबांसाठी केलेले घर’ अगदी गावाच्या बाहेर होते. तो केवळ एक आसरा होता. घाणीने भरलेल्या जमिनीवर लोक इतस्ततः बसलेले होते. काहींच्या अंगावर चिंध्या होत्या. काही उघडेच बसलेले होते. सारेजण अशक्त-रोगी व निस्तेज दिसत होते. त्यात काही कुष्ठरोगी व अन्य आजाराने पिडलेले असेही होते. ते लोक उघड्या माळावर वा झाडाखाली झोपत. सरकारकडून त्यांना पीठ-मीठ वा हलके अन्न मिळत असे. काही लहान मुलांना तर शिजवून देण्यास कोणीच नव्हते. त्यांचा शिधा कोणीतरी हडप करीत असत. त्यामुळे काहींना उपासमार घडत असे.

काही पालक एक रुपया वा काही आण्यासाठी, दाण्यासाठी, आपली मुलं विशेषतः मुली विकत होते. सरकार कधीकधी त्यांच्या हातावर दोन पैसे ठेवत. लहान मुले त्या पैशाचं काय करणार? मोठी माणसे त्यांचे पैसे चोरून नेत असत. काही ठिकाणी लोकांना डाळ-रोटी दिली जात असे. हजारो लोकांचा अशा हजारो रुपयांना काय काठ वळणार ? शिवाय त्यांचे मुकादम हलक्या प्रतीचे धान्य लोकांना देऊन मलईवर हात मारीत होते. लोकांच्या पुढ्यात असलेली डाळ-रोटी, शेणाच्या पोळ्यासारखी दिसत असे.

एके दिवशी रमाबाईंची एक कार्यकर्ती रस्त्यावरून जात असताना रस्त्याच्या कडेला एक बारा वर्षाची मुलगी भुकेल्या अवस्थेत असलेली तिला दिसली. थोड्या वेळाने तिची बहीणही तेथे आली. ‘मदत-छावणी’ त जाण्यासाठी त्या तेथे बसलेल्या होत्या. त्यांना कुणीसं सांगितलं होतं की, एक बाई लहान मुलांना अनाथाश्रमात ठेवण्यासाठी त्यांच्या शोधात आहेत. म्हणजे त्या मुली रमाबाईंचीच वाट बघत तेथे बसलेल्या होत्या. परंतु आधीच रमाबाईंनी ती सराई सोडली होती. आपल्याला कुणातरी

चांगल्या माणसांबरोबर, चांगल्या ठिकाणी राहायला मिळावे अशी त्यांची इच्छा होती. हे बोलणे, त्या कार्यकर्तीबरोबर चालले असताना काही माणसं त्यांच्याभोवती गोळा झाली. ती त्या मुलींना घेऊन जाण्याच्या बेतात होती. परंतु रमाबाईंच्या कार्यकर्तीने त्या मुलींना रमाबाईंकडे सुखरूप पोहोचविले.

रमाबाईंना नेहमीचा आपला भूतकाळ आठवला. 'आपली पंचवीस वर्षांची मोठी बहीण व सोळा वर्षांचे आपण स्वतः जर असे 'मदत-छावणी'त गेलो असतो वा दुष्कर्मांच्या हातात पडलो असतो. तर काय झाले असते? म्हणूनच अशा लोकांना, विशेषतः स्त्रियांना-बालिकांना चांगलं व सुरक्षित जीवन जगता यावं म्हणून अतिशय आत्मीयतेने रमाबाईंनी त्यांना आश्रय दिला.

'मदत-छावणी'त अनेक लोक वेगवेगळ्या कामासाठी लावले होते. म्हातारी माणसं- मध्यमवयीन पुरुषमंडळी, नाजुक प्रकृतीच्या स्त्रिया, दगड फोडण्याचे व त्या टोपल्या वाहून नेण्याचे काम करीत होत्या. आपले सोललेले तळहात उघडून त्यांनी रमाबाईंना दाखवले. त्यांचा आक्रोश कानाचे पडदे फाडून टाकणारा होता. त्यांचे अश्रुपूर्ण डोळे दयेची याचना करीत होते. या साऱ्या घटना, 'याचि देही याचि डोळा' पाहून रमाबाईंचे हृदय विदीर्ण झाले.

रमाबाईंचा ओढा तरुण मुली, विधवा यांच्याकडे अधिक होता. त्यांना वाममार्गाला लावले जाऊ नये म्हणून त्यांना तेथून बाहेर काढावे, असे त्यांना फार वाटत होते. लहानग्या अनाथांसाठी त्यांचे हृदय आक्रोशत होते. या साऱ्यांना आपल्या पंखाखाली घेता यावे, यासाठी रमाबाई तेथे गेल्या होत्या.

दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतून रमाबाईंकडे तीनशे मुली आणलेल्या होत्या. या आधी काही जणींना आणले; तेव्हा रमाबाईंना ८५० रुपये प्रवासखर्च झाला. काही आर्थिक मदत त्यांना मित्र-मैत्रिणींकडून झालेली होती. त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था तर आणखी जटील समस्या होती.

त्यांच्यावर सुसंस्कार घडविणे हे तर त्यापेक्षाही कठीण काम होते. ‘मदत छावणी’ त विविध ठिकाणाचे लोक एकत्र राहात होते. त्यामुळे त्यांना आणखी वाईट सवयी लागलेल्या होत्या.

रमाबाईंनी साठ विधवांची नीट व्यवस्था लावली. सत्तेचाळीस जणींना शाळेत पाठवले. इतरांच्या हातांना काही काम दिले? अमेरिकेतून त्यांना मिळणाऱ्या मदतीवर पन्नासेक मुलींचा उदरनिर्वाह चालत असे. लोक रमाबाईंना विचारीत; की तू इतरांचं कसं करणार? आणि रमाबाई तर पूर्णपणे परमेश्वरावर विसंबून होत्या. रमाबाई आणि तिच्या मुली सर्व ऐषआरामाचा त्याग करून साधेपणाने जीवन जगण्यास तयार होत्या. त्या फक्त एकवेळचे जेवण घेत व उरलेल्या अन्नाचे/दाण्यांचे भुकेल्यांना वाटप करीत. आपले बांधव भुकेने तडफडत असताना, निराधार असताना; आपण चांगलं खाणं, चांगले कपडे वापरणं, चांगल्या घरात राहाणं, हे पाप आहे, असे त्यांना वाटत असे. ज्या ज्या वेळेला सर्वांना पुरेल इतके अन्न मिळावे, अशी प्रार्थना रमाबाई करीत त्या त्या वेळेला, कुणी ना कुणी दानशूर व्यक्ती त्यांना त्या त्या वस्तू पाठवून देत असत. अशा गोष्टींमुळे त्यांचा परमेश्वरावरील व आपल्या सत्कृत्यांवरील विश्वास दृढ होत गेला.

## ‘मुक्तिसदन’ मधील दिवस

‘शारदासदन’ हे रमाबाईंनी अमेरिकेतील सेवाभावी परिचित व इतर मैत्रिणींच्या आर्थिक सहकार्यावर उभारलेले होते. परंतु ‘मुक्तिसदन’ हे रमाबाईंच्या ख्रिस्तावरील विश्वासाचे व त्यावर विसंबून असण्याचे प्रतीक होते.

पुण्यापासून चौतीस मैलावर असलेल्या केडगाव येथे रमाबाईंनी साधारणपणे शंभर एकर जमीन विकत घेतलेली होती. ही पडीक जमीन त्यांना स्वस्तात मिळालेली होती. रमाबाईंनी ‘रमाबाई असोसिएशन’ ला त्याबद्दल विचारले. परंतु घटनेत तशी तरतूद नसल्याने तिकडून नकार मिळाला. परमेश्वरावर अढळ श्रद्धा असल्यामुळे, त्यांनी प्रभूची प्रार्थना आरंभिली आणि त्यांच्या प्रार्थनेला उत्तर मिळाले. अमेरिकेतील रमाबाईंच्या मैत्रिणींनी देणग्या गोळा करून रमाबाईंना ती रक्कम पाठवली व त्यांनी ती जमीन विकत घेतली. पुण्यात ‘शारदासदन’ चे काम चाललेले असल्यामुळे त्या विकत घेतलेल्या जमिनीविषयी त्या विसरूनही गेल्या होत्या.

१८९६-९७ मध्ये दुष्काळग्रस्त भागातून रमाबाईंनी तीनशे मुली/स्त्रिया आणल्या होत्या. त्यांनी ‘शारदा सदन’ जवळ त्यांच्यासाठी झोपड्या बांधल्या होत्या. त्याच काळाता पुण्यात प्लेग सुरू झाला. ‘अठ्ठेचाळीस तासाच्या आत मुली पुण्याच्या बाहेर नेण्याची’, नोटीस सिटी मॅजिस्ट्रेटकडून आली. तेव्हा रमाबाईंनी स्थलांतर केले. दुष्काळात जर्जर झालेल्या त्या साऱ्या स्त्रियांना घेऊन रमाबाई केडगावला आल्या. त्यानंतरही मध्यप्रदेश, गुजरात येथील दुष्काळात सापडलेल्या अनेक मुलींना रमाबाईंनी ‘मुक्तिसदन’मध्ये आसरा दिला होता. त्या पडीक जमिनीवर फुलणाऱ्या मुलींना पाहून आपले श्रम आणि परिचितांनी दिलेला पैसा फुकट गेला नाही याबद्दल रमाबाईंना समाधान वाटत असे.

‘मुक्तिसदन’ मध्ये ५८० मुली होत्या व इंग्लंडमधील ‘सिस्टर्स ऑफ मर्सी’ च्या धर्तीवर बांधलेल्या ‘कृपासदन’ मध्ये पाऊल वाकडे पडलेल्या स्त्रियांची व्यवस्था केलेली होती. त्यात ६० मुली होत्या. पंडिता रमाबाईंच्या ‘शारदा सदन’ व ‘मुक्तिसदन’ या घरांची रचना व तेथील व्यवस्था इंग्लंड-अमेरिकेतील घरांसारखी होती. रमाबाई स्वतः तेथे वास्तव्य करून आलेल्या होत्या. तेथील मठवासिनींचे शिस्तबद्ध व सेवाभावी जीवन त्यांनी पाहिले होते. रमाबाईंच्या तेथील ‘सदना’ वर त्याचा प्रभाव होता.

एवढ्या मोठ्या संख्यने असलेल्या सदनातील मुलींवर लक्ष ठेवणे कठीण कर्म होते. वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्या या स्त्रियांवर संस्कार घडविणे म्हणजे एक दिव्य होते. अनौपचारिक व मूल्यशिक्षणावर रमाबाईंचा विशेष भर होता. त्यांना स्वतःलाही अशाच प्रकारचे शिक्षण मिळाले होते. अनौपचारिक शिक्षण चारित्र्यबांधणीसाठी व नंतर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करील यावर त्यांची भिस्त होती. रमाबाईंकडे फक्त सोळा पगारी शिक्षिका होत्या आणि इतर ८५ लोक केवळ मदत करण्यासाठी येत. ३३ शिक्षिका, १० मेट्रन, ४२ कार्यकर्ते स्वतःच्या व आपल्या भगिनींच्या भल्यासाठी रमाबाईंच्या बरोबर झटत होते. यापैकी काहीजण पगार न घेताही काम करणारे होते. ‘शारदा सदन’ मधून ७० शिक्षिका प्रशिक्षित झालेल्या होत्या आणि ‘मुक्तिसदन’ मधून नंतर ८० मुली, तीन वर्षात प्रशिक्षित झाल्या.

२४ सप्टेंबर, १८९८ रोजी मुक्तिसदनचे ‘मुक्तिमिशन’ झाले. वेगवेगळ्या इमारतींत वेगवेगळी कार्ये सुरू झाली होती. रमाबाईंनी इमारतींना व त्या परिसरात खणलेल्या विहिरींनाही नावं दिलेली होती. भारतातील अंधासाठी चालविलेली पहिली शाळा म्हणजे ‘मुक्तिमिशन’ मधील ‘बार्तमीसदन’ होय. बार्तमी ही ‘बायबल’ मधील एक अंध व्यक्ति आहे. त्यावरून हे नाव त्या सदनाला दिले. दुष्काळातून आलेल्या या सदनातील स्त्रिया स्वेटर विणणे, वेताच्या खुर्च्या विणणे, केळीच्या

सोपटीच्या टोपल्या तयार करणे, वाकाच्या दोऱ्या तयार करणे इ. कामे करीत असत.

मनोरमा परदेशातून ब्रेललिपी शिकून आलेली होती. 'बार्तमीसदन' मध्ये तिने अंधांना शिकविलेच. पण त्याचबरोबर त्यांना शिकविण्यासाठी शिक्षकही तयार केले.

मुलांसाठी 'सदानंद' नावाचे सदन होते. 'मुक्तिमिशन' मध्ये अनेक प्रकारचे काम मुलींना शिकविले जाई. तेल तयार करणे, दुग्धालयात काम करणे, धुणी, स्वयंपाक, याचबरोबर शतेकी, विणकाम, शिवणकाम अशा कामात त्यांना तरबेज केले जात असे.

'मुक्तिमिशन' मधील दिवस पहाटे चारला सुरू होई व रात्री आठ वाजता, 'मुक्तिमिशन' सामसूम होई. दिवसभरात अभ्यास-शाळा-खेळ-गाणी यांचा समावेश असे. जेवण-खाणं-विश्रांती याच्या नियमित वेळा असत. त्यांच्या वेळापत्रकात, ऋतुमानानुसार थंड पाण्याने अंघोळ व शाळा यांच्या वेळात बदल होत असे. थंडीच्या दिवसात सकाळी शाळा व दुपारी अंघोळ; तर उकाड्याच्या दिवसात सकाळी अंघोळ व दुपारी शाळा असे.

३० ते ३५ मुली पहाटे दोन वाजता उठून स्वयंपाकाला लागत. गटागटाने त्यांना स्वयंपाकाचे काम दिले जाई. या मुलींना दुपारची विश्रांती असे व त्यांना लवकर झोपायला जाण्याची मुभा असे.

रमाबाई स्वतः कोणत्याही प्रकारचे औषध घेत नसत. त्या पूर्णपणे प्रभू ख्रिस्तावर विसंबून असत. परंतु मुलींच्या आजारासाठी वा ज्या कोणाला वैद्यकीय मदत हवी असेल; त्यांच्यासाठी एक प्रशिक्षित परिचारिका नेमलेली होती, गरज पडल्यास त्यांना पुण्यातील झनाना मिशन हॉस्पिटलमध्ये नेले जात असे किंवा ससून हॉस्पिटलमध्येही दाखल केले जात असे.

केडगावसारख्या रुक्ष व खडकाळ प्रदेशात वाढणाऱ्या या दुष्काळग्रस्त मुली धष्टपुष्ट व उत्साही दिसू लागल्या होत्या. त्यांना तसं फुलताना

बघणं, हा रमाबाईंचा आनंद होता. दुष्काळग्रस्त गुजरात आणि राजपुताना येथे रमाबाईंनी बघितलं होतं, की, मैलोनमैल पसरलेली जमीन कोरडीठाक होती. पिकंच काय; पण चाराही तेथे उगवत नव्हता. छोट-छोटे झरे जमिनीच्या उदरात गडप झाले होते आणि भरभरून वाहणाऱ्या नद्या धाग्यासारख्या बारीक झाल्या होत्या. विहिरीच्या तळाशी किंचितसे पाणी असे. जंगलातील झाडं वाळली होती. झाडांची खोडे, फांद्या निष्पर्ण व सुकून कोळ झालेली होती. दुष्काळातील उपाशी व सांगाडा झालेल्या माणसासारखी ती दिसत होती. त्या सुकलेल्या भागात विषारी झुडुपेच काय ती हिरवीगार दिसत होती. भुकेने-तहानेने गाईगुरांचे कळप भुताच्या सैन्यासारखे फिरत होते. स्टेशनच्या आसपास मरण पावलेल्या गाईगुरांच्या व माणसांच्या हाडांच्या सापळ्याच्या राशी पडलेल्या होत्या. अशा परिस्थितीतून आणलेल्या मुलींना केवळ प्रेमाचा ओलावा मिळताच फुलताना पाहून रमाबाई कृतकृत्य होत असत.

याचबरोबर वर्तमानपत्रांनी उठवलेल्या वादळाला रमाबाई समर्थपणे तोंडही देत होत्या. 'मुक्तिमिशन' मध्ये धर्मांतर केले जाते अशा प्रकारची टीका होतच होती. 'शारदासदन' मधील धर्मांतर प्रकारानंतर मान्यवर समाजसुधारकांनी पाठिंबा काढून घेतला होता याचे रमाबाईंना दुःख होतेच. परंतु 'मुक्तिमिशन' मध्ये रमाबाई उघड-उघड प्रार्थना करीत असत व कोणाला स्वच्छेने धर्मांतर करावयाचे असल्यास बिनघोरपणे बाप्तीज्मा देत असत. 'शारदासदन' मधील ब्राह्मण विधवांपेक्षा 'मुक्तिमिशन' मधील वातावरण वेगळे होते. 'मुक्तिमिशन' मधील वातावरण वेगळे होते. 'मुक्तिमिशन' मध्ये दोन हजार लोक होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास, आध्यात्मिक शिक्षण, संस्कार घडवणे अशी रमाबाईंची जबाबदारी वाढत गेली होती. मूल्यशिक्षण व सुसंस्कारात त्यांना ख्रिस्ती धर्मातील मूल्ये, तत्त्वे देणे ही काळाची गरज वाटली. 'माझी साक्ष' या आध्यात्मिक विकास दाखविणाऱ्या आपल्या ग्रंथात रमाबाई म्हणतात- 'वाडवडिलांच्या पुरातन धर्माविषयीचा अभिमान माझ्या देशबांधवांना

ख्रिस्ताकडे येण्याच्या मार्गापासून परावृत्त करतो, ख्रिस्ताविषयी त्यांना तो आनंद मिळणार नाही.' रमाबाईंची भूमिका अशी ठाम होती. त्यामुळे धर्मांतराबाबतच्या आरोपांना रमाबाईंची भूमिका अशी ठाम होती. त्यामुळे धर्मांतराबाबतच्या आरोपांना रमाबाईंनी धूप घातला नाही. व समाजाची पर्वाही केली नाही खरं म्हणजे रमाबाईंनी पुणे सोडले. तेव्हा त्या साऱ्या गजबजाटापासून त्या दूर आल्या होत्या येथपासून त्यांचा गजबजलेला सामाजिक प्रवास संपून आध्यात्मकि स्वरुपाच्या कार्याला सुरूवात झाली होती. केडगावातील 'मुक्तिमिशन' मधील कार्य म्हणजे फार मोठे सामाजिकच केवळ नव्हे; तर राष्ट्रीय कार्य होते. परंतु या कार्याला आता आध्यात्मिक व धार्मिक स्वरूपाचीही जोड मिळाली होती. ख्रिस्ती धर्माचे महत्त्व त्यांना पटलेले होते व तो धर्म लोकांपर्यत पोहोचविण्याची गरज त्यांना वाटत होती. आता भारतीय ख्रिस्ती समाजाबरोबरच परदेशातील ख्रिस्ती संस्थाशी थेट संबंध जोडल्याने कोणी पाठिंबा काढून घेण्याची भीतीही राहिली नव्हती.

२८ जानेवारी, १९०२ च्या 'केसरी' त 'मुक्ती' म्हणजे २५०० बायकांचा तुरूंग असा लेख आला होता. मुलींचे धर्मांतर केले जात आहे व त्यांना नीट खायला दिले जात नाही, असा रमाबाईंवर आरोप होता आणि शेवटी गव्हर्नरला विनंती केली होती की, प्रत्यक्ष जाऊन 'मुक्ति' चा तपास करावा. आणि त्याप्रमाणे गव्हर्नरांनी खरोखरच 'मुक्तिमिशन' ला मार्च महिन्यात अनपेक्षित भेट दिली, या भेटीचे वर्णन करताना रमाबाई लिहितात, 'एके दिवशी मी माझ्या दुपारच्या कामासाठी तयारीत असताना एक कार्यकर्ती ऑफिसच्या दाराजवळ आली. तिच्याबरोबर पुण्याचे कलेक्टर होते. त्या दोघांनी मला सांगितले की, 'मुक्ती'' त मुंबईचे गव्हर्नर आलेले आहेत. मी तर थक्क झाले. कारण गव्हर्नर अशा आडमार्गावर असलेल्या ठिकाणी येतील आणि फारशा प्रसिद्ध नसलेल्या संस्थेला भेट देतील अशी अपेक्षाच केली नव्हती. गव्हर्नरांचा साधेपणा व अकृत्रिमपणे वागण्याची पद्धत पाहून माझ्या आश्चर्याची जागा आनंदाने घेतली . त्यांच्या

मार्गात येणाऱ्या प्रत्येकाची ते विचारपूस करीत होते. त्यावेळी 'मुक्ती' त जे जे काही ते बघत होते हे पाहून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. नंतर त्यांनी साऱ्यांचा निरोप घेतला. त्यांच्या आगमनाची आम्ही कोणीही तयारी केली नव्हती. त्यामुळे आम्ही होतो तशाच स्थितीत त्यांनी आम्हाला पाहिले. काहीजणी इथे तिथे चालत होत्या. काहीजणी आहेत तेथेच बसून होत्या. काहीजणी त्याचं काम नीटपणे करीत होत्या, काहीजणी अंगणात झाडू मारीत होत्या आणि इतर घरातली काम करीत होत्या, काहीजणी ठाकठीक पोशाखात होत्या, काहीजणी अभ्यास करीत होत्या, आणि काहीजणी नुसत्याच हवेत बघत होत्या व काहीच करीच नव्हत्या.' या वर्णनावरून रमाबाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते. जसे घडले तसे नेमक्या शब्दात त्या वर्णन करतात.

या प्रसंगावरून मात्र रमाबाईंच्या मनात असा एक विचार चमकून गेला की, एखाद दिवशी ख्रिस्तही असाच अचानक भेट देईल आणि असाच प्रसन्नतेचा शिडकावा मारून जाईल. येथे कोणाबद्दल भीती नाही; की, येथे कोणी कोणाचं शत्रू नाही. आपण करीत असलेले कार्य सचोटीचे आहे यावर त्यांचा भरवंसा होता. त्यामुळे रमाबाईंच्या मनात कोणाविषयी कटुता नव्हती.

पुण्याच्या कलेक्टरनी मुलींना विचारले की, 'तुम्हाला तुमच्या घरी जावेसे वाटते का?' त्यावेळी तेथे हजर असलेल्या एकाही मुलीने हात वर केला नाही, असे रमाबाईंनीच लिहिले आहे.

'मुक्तिमिशन' च्या भिंती खूप उंच होत्या. कारण आत साऱ्या स्त्रिया राहात होत्या. बाहेरून कोणी गुंडाने स्त्रियांना त्रास देऊ नये; आत प्रवेश करू नये. यासाठी ती व्यवस्था होती. आणि लोकमान्य टिळकांनी त्याला 'तुरुंग' संबोधले होते.

'केसरी' ने उपस्थित केलेल्या काही प्रश्नांना 'सुबोधपत्रिके' ने समर्पक उत्तरे दिलेली आहेत. येथील स्त्रियांच्या 'व्यक्तिमत्त्वविकासा' वर रमाबाईंनी अधिक भर दिलेला होता. रमाबाईंवर जे आरोप केले जात;

त्याला रमाबाई आपल्या सत्कृत्यांतून उत्तर देत असे. ‘सुबोधपत्रिका’ कारांनी एकदा म्हटले, ‘१८९७’ नंतर पुष्कळ दुष्काळ महाराष्ट्रात पडले. त्यातल्या एकात तरी, या टीकाकारांपैकी कोणी पुढे होऊन रमाबाईंसारखा स्वतःच्या जिवाचा आटापिटा केला आहे का ? कोणी पुढाकार घेऊन ह्या खालच्या जातीच्या दुःखिताना साह्याचा हात पुढे करून रमाबाईंप्रमाणे उराशी धरले आहे का ? अशा वेळी मात्र रमाबाईंवर टीका करणाऱ्या वृत्तपत्रांनी मौन पाळलेले दिसते.

विपरीत परिस्थितीत सापडलेल्या अनेक स्त्रियांना काही दुष्प्रवृत्तीची माणसे वाममार्गाला लावीत होती; तेव्हा रमाबाईंनी त्या मुलींना-महिलांना ‘मुक्तिमिशन’ चा आधार दिला. त्यांच्यावर सुसंस्कार घडवून त्यांना चांगल्या मार्गाला लावले. त्यामुळे ख्रिस्ती धर्म व लोक याविषयी मुलींना आकर्षण वाटले; तर त्यात काहीच वावगे नव्हते. एक म्हणजे रमाबाईंनी त्या मुलींना दुष्काळी प्रांतातून आणल्याआणल्या लगेचच बाप्तीज्मा देऊन ख्रिस्ती केलेले नव्हते. रमाबाईंच्या वर्तनाचा, त्यांच्या विचारांचा प्रभाव, त्यांच्या प्रेमाचा अनुभव यामुळे अनेकींनी नंतर ख्रिस्ती होण्याची इच्छा प्रकट केलेली आहे. ‘शारदासदन’ चे पुण्यातून केडगावला स्थलांतर झाल्यावर सहासात वर्षांनी रमाबाईंच्या एक चरित्र लेखिका, मिस क्लेमेंटिना बटलर यांनी केडगावला भेट दिली, तेव्हा त्यांना आपल्या सनातनी रिवाजाप्रमाणे आपले नियमधर्म पाळणाऱ्या काही उच्चवर्णीय हिंदू विधवा तेथे आढळल्या.

हिंदू, पारशी आणि मुसलमान लोकांना वाटायचे की, रमाबाई मुलींना फसवतात. त्यांना ख्रिस्ती करतात. त्यांना वाटत असे की, या बाई, हिंदू, इंग्लीश आणि अमेरिकनांनाही फसवतात, आणि पैसे मिळवितात. रमाबाई म्हणतात ‘ते आमच्याकडे तुच्छता दर्शक दृष्टिक्षेप टाकून म्हणत की, रमाबाई या साऱ्या प्राण्यांना आपल्या घरी नेऊन काय करणार आहे? मग ते स्वतःच त्या प्रश्नाचं उत्तर देत की, ‘हो! त्या त्यांना ख्रिस्ती करण्यासाठी नेत आहेत. आणि त्यावर पैसे मिळवीत आहेत.’

रमाबाई म्हणतात की, ‘या दुष्काळग्रस्त मुली, इतक्या अस्वच्छ असत व त्यांच्या अंगाला इतकी दुर्गंधी येत असे की, गाडीत प्रवास करणारे लोक त्यांच्यापासून दूर जात. त्यांना जवळ उभं करण्यासाठी कोणी तयार नसे. परंतु केवळ प्रभूने त्यांना मदत करण्याची जी प्रेरणा आपल्या मनात निर्माण केली.’ त्याचा आदर ठेवून त्यांनी या दुर्गंधीयुक्त स्त्रियांना आपल्या वेंगेत घेतले, या कामासाठी केवळ रमाबाईंच पुढे झाल्या असे नव्हे; तर त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे हात बळकट केले. रमाबाई त्यांना या कार्याचे श्रेय देतात. ‘शारदासदन’ मध्ये तयार झालेल्या, काही कार्यकर्त्या स्त्रियांनी त्यांना जी मदत केली; त्यांच्या नावाचा उल्लेख कुठे नसला; तरी प्रभू आपल्या कृपेचा मुकूट त्यांच्या डोक्यावर ठेवून त्यांचा सत्कार करील, असा रमाबाईंना विश्वास होता.

‘मुक्तिसदन’ बांधण्यापासून तर ते पूर्ण होऊन त्यात कार्य सुरू होईपर्यंत आणि त्यानंतरही रमाबाई पूर्णपणे खिस्तावर विसंबून होत्या. त्यामुळेच ‘मुक्तिसदन’ अथवा ‘मुक्तिमिशन’ हे रमाबाईंच्या प्रभूवरील प्रगाढ श्रद्धेचे प्रतीक होते. दुष्काळी भागात जाऊन लोकांना आणले आणि त्यांच्यासाठी कार्य सुरू करणे, इथपासून रमाबाईंनी प्रभूची करुणा भाकली, कारण कार्य सुरू करण्यासाठी त्यांच्या हातात पैसे नव्हते. सर्वदूर पसरलेला दुष्काळ आणि तरुण स्त्रियांना वाममार्गाला लावण्याचे प्रकार अशा स्वरूपाच्या बातम्या त्यांच्या कानावर येऊन थडकत होत्या. त्या अस्वस्थ होत होत्या. इतक्यात २७२ रुपये दोन आण्यांचा एक चेक आला. रमाबाईंना हुरुप आला व त्या आपल्या कार्यासाठी बाहेर पडल्या. या स्त्रियांसाठी अंथरुण-पांघरुण नव्हते. अंगावर घालण्यासाठी वस्त्रं, साड्या नव्हत्या. कापडाच्या व्यापाऱ्याकडून अशा अटीवर साड्या मिळत की; विशिष्ट दिवसाच्या आत पैसे दिले नाहीत; तर साड्या पुन्हा घेऊन जायचे. परंतु तशी वेळ रमाबाईंवर कधीच आली नाही. त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर मिळाले आणि परमेश्वर आपले गार्हाणे ऐकतो; यावर त्यांचा अधिक विश्वास बसला.

रमाबाईंनी अन्य मिशनकेंद्रांनाही मदत दिली. या केंद्राना मदत पाठविण्याचा निर्णय जेव्हा त्यांनी घेतला, तेव्हा 'मुक्ति' मधील सर्वांनीच रविवारचे एक वेळचे जेवण न घेण्याचा निश्चय केला होता.

केडगावात पाण्याचे दुर्भिक्ष होते. त्यामुळे त्यांनी काही विहिरीही खणल्या. स्त्रियांना डोक्यावरून पाणी वाहून आणावे लागत असे. रमाबाईंनी विहिरीवर इंजिन बसवून इमारतीत नळ घेतले. 'मुक्तिसदन' मध्येही वीज खेळू लागली. विहिरी खणताना जमिनीच्या पोटातून जे दगड निघाले त्यावर रमाबाईंनी 'मुक्तिमिशन' परिसरात अनेक इमारती उभ्या केल्या. एक अतिशय भव्य; पण साधे चर्च बांधले. ज्याचा आकार पूर्णपणे क्रुसासारखा होता. मध्यभागी वेदी होती व तीनही बाजूनी बसण्याची व्यवस्था होती.

या सर्वांमधून रमाबाईंचे व्यावाहारिक ज्ञान, प्रत्येक गोष्टीचा वस्तूचा तोलून मापून वापर करण्याची पद्धत दिसून येते. हे सर्व करण्यामागे त्यांच्या हृदयात असलेली माणूस घडविण्याची कळकळ महत्त्वाची. रानावनातून, निर्जन प्रदेशातून, अनवाणी, उपाशी-तापाशी वणवणवताना माणसाच्या जीवनाचे मोल त्यांना कळले होते. कोणीतरी आपली काळजी वाहणारा आहे याचे स्मरण त्यांनी जागवले होते. आणि आपल्या वडिलांनी, आपल्या भावाने त्यांच्या मृत्युसमयी 'परमेश्वर तुझी काळजी वाहण्यास समर्थ आहे', याचेही स्मरण दिलेले होते, त्याचे विस्मरण रमाबाईंना झाले नाही. म्हणूनच आपल्या आवाक्यात येणाऱ्या साऱ्यां मध्ये त्यांना प्रभू परमेश्वर दिसला. त्याच प्रेरणेने त्यांनी आपली सेवा आरंभिली होती.

# एक मनोरम वारस

मनोरमा ही रमाबाईंची एकलुती एक मुलगी. मनोरमा आठ महिन्यांची असताना तिचे वडील; म्हणजे बिपीन बिहारी मेधावी मरण पावले. आपल्या वडिलांची एक आठवण मनोरमेने आयुष्यभर जपून ठेवली होती. ती म्हणजे, 'मनोरमेचा जन्म झाला' असे त्या दिवशी लिहिलेले एका वाक्याचे हस्ताक्षर. बिपीन बिहारी मेधावी यांनी असे लिहून ठेवले होते.

'Saturday April 16th, Easter Eve Child born at 10 minutes to 8.00 P.M.'

आपल्या जन्माची ही आठवण मनोरमेने आयुष्यभर जपून ठेवलेली होती. वडिलांचा सहवास काही तिला लाभला नाही.

रमाबाई सहा महिन्याची होती; तेव्हा त्यांच्या आईने त्यांना टोपलीत घालून व ती डोक्यावर घेऊन प्रवासास प्रारंभ केला होतो. नंतर साऱ्या जगाने कर्तृत्ववान रमाबाईंना डोक्यावर घेईपर्यंत रमाबाईंचा प्रवास खाचखळग्यांचा, वळणावाकणाचा, टक्क्या टोणप्यांचा होता. मनोरमेचा प्रवास; ती एक वर्षाची असताना सुरू झाला. कलकत्ता ते मुंबई असा तो प्रवास. नंतर लगेचच समुद्रमार्गे इंग्लंड, अमेरिका असा प्रवास. मग तारुण्यात स्वतः केलेला ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड असा प्रवास. भारतात तर अनेक ठिकाणी तिचा प्रवास चालूच होता.

कौटुंबिक जीवन नसलेल्या व सामूहिक जीवन असलेल्या वॉण्टेज कॉन्व्हेंटमध्ये मनोरमेचे बालपण गेले. रमाबाईंनी सामाजिक, आध्यात्मिक वाङ्म्यीन कार्य करायला मोकळीक मिळावी, म्हणून सिस्टर जिराल्डीनने मनोरमेला आपल्याकडे ठेवून घेतले. १८८६ मध्ये पं. रमाबाई अमेरिकेला गेल्या, तेव्हा आपल्याबरोबर त्यांनी मनोरमेला नेले होते. परंतु तेथेच राहून सामाजिक शैक्षणिक कार्याचे शिक्षण घ्यायचे असे ठरविल्यावर त्यांनी मनोरमेला इंग्लंडला पाठवून दिले. सिस्टर जिराल्डीनच्या रूपाने मनोरमेला एक जगावेगळी 'आजी' मिळाली.

रमाबाईंनी वयाच्या पंचविसाव्या वर्षी धर्मांतर केले. तेव्हा मनोरमा अडीच वर्षाची होती. त्यामुळे मनोरमेचा मानसिक, आध्यात्मिक, व ख्रिस्ती धर्मविषयक प्रवास रमाबाईंपेक्षा आधी म्हणजे मनोरमेच्या बालपणीच सुरू झाला होता. मनोरमा बालपणापासून ख्रिस्ती समाजात व विशेषतः मठवासिंनीबरोबर राहिलेली आहे. रमाबाईंना ख्रिस्ती धर्मस्वीकार करून त्या समाजात वावरण्यासाठी खूप मोठा शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक प्रवास करावा लागलेला होता.

मनोरमा जरी अत्यंत सुशिक्षित व सुसंस्कारित वातावरणात राहात असली; तरी तिची फार मोठी मानसिक ओढाताण झालेली आहे. एका बाजूला अतिशय प्रिय अशी आपली आई व दुसऱ्या बाजूला पूर्णपणे आध्यात्मिक असलेले मठवासियांचे जीवन असलेल्या स्त्रिया. वडील मरण पावलेले व आई आपल्या कार्यात गुंतलेली असल्याने सोबत नाही, असे अनाथांचे जिणे असे जीवन तिला बालपणापासूनच कंठावे लागले. रमाबाईंची भूमिका अशी होती की, 'भुईवर ठेवले; तर मुंगी चावेल; अधांतरी ठेवले तर कावळा नेईल. इतक्या नाजुपकपणे तिला वागवले नाही.' रमाबाईंच्या धर्मांतराआधीही रमाबाईंनी आपले कार्य करण्यासाठी मोकळीक मिळावी म्हणून एक वर्षीय मनोरमेला पंचहौद मिशनमधील सिस्टरांजवळ ठेवायचे ठरवले होते. केवळ संसारात न रमता सामाजिक वा शैक्षणिक क्षेत्रात वावरायचे असल्यास भावनिक बंध कसे दूर सारावे लागतात, याचा वस्तुपाठ रमाबाईंनी तेव्हापासूनच घालून दिलेला आहे. धर्मातराच्या वा अन्य कुठल्या भीतीपोटी असेल; रमाबाईंनी पंचहौदमधील सिस्टरांजवळ तिला फार दिवस ठेवले नव्हते हे खरे; परंतु अनेक जगावेगळे निर्णय रमाबाई घेत होत्या त्यातला हाही एक निर्णय होता.

मनोरमेला एक ध्येयवादी आई लाभली होती. त्यामुळे ती आईच्या प्रेमळ सहवासास बालपणापासूनच मुकली होती आणि रमाबाईही आपल्या लहानग्या मुलीचे कोडकौतुक करण्याच्या क्षणांस मुकली होती. कौटुंबिक भावबंधांना तिलांजली देण्याची रमाबाईंची पूर्वतयारी झालेली

होती. त्याची शिकवण त्यांच्या मुलीला अशी लहानपणापासूनच मिळत होती.

मनोरमाबाईंचे बालपण इंग्लंड; मग शिक्षणासाठी अमेरिका. पुन्हा डेक्कन कॉलेजात काही शिक्षण. त्यातच 'मुक्तिसदन' चे काम, नंतर आपल्या आईच्या कामाची माहिती देण्यासाठी व फंड गोळा करण्यासाठी ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथे, असा तिच्या प्रवासाचा आलेख सतत वाढत-चढत गेला. आध्यात्मिक संस्कारात ती वाढ असल्याने तेच तिच्या अंगी भिनत राहिले. आपल्या मनातील तारुण्यसुलभ भावनांना वाट मोकळी करण्याची संधी तिला मिळाली नाही.

पुण्यात मनोरमेला शिकविण्यासाठी मेरी सॅम्युएल नावाची एक ज्यू शिक्षिका होती. तिला रमाबाईंनी शाळेतून काढले होते. मेरी सॅम्युएल या शिक्षिकेच्या भावाबरोबर मनोरमेची मैत्री वाढत चालली आहे, हे लक्षात आल्यावर रमाबाईंनी त्या शिक्षिकेला शाळेतून काढण्याचा निर्णय घेतला होता.

रमाबाईंचा विवाह विपरीत परिस्थितीत, घरातील सर्वांच्या मृत्युनंतर कोणाचा आधार उरला नव्हता; अशा परिस्थितीत, वयाच्या विसाव्या वर्षी झाला होता. मनोरमेच्या बाबतीत तशी परिस्थिती नव्हती. शिवाय आपल्या पश्चात आपला कार्यसंभार आपल्या मुलीने सांभाळावा, असे रमाबाईंना वाटणे स्वाभाविक आहे. तथापि मनोरमेच्या लग्नाचा विचारही रमाबाईंनी बोलून दाखविलेला आहे.

'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' चे एक उपाध्यक्ष डॉ. डोनाल्ड यांनी 'शारदा सदन' संबंधी वाद सुरू झाला; तेव्हा रमाबाईंना काही प्रश्न विचारले होते. त्यात त्यांनी 'शारदासदन' वेगळे करून मनोरमेकडे सोपवावे, असे म्हटले होते. यावर पंडिता रमाबाईंनी म्हटले होते की, 'मनोरमा तसे करू शकणार नाही. कारण या बाबतीतील तिची मते, माझ्यासारखीच आहेत. ती फार लहान आहे. तरुण विधवांची जोखीम घेणे तिला जमायचे नाही. आणि उद्या तिचे लग्न झाले, तिला मुलेबाळे

झाली तर तिला ही जबाबदारी कशी पार पाडता येईल? या व्यतिरिक्त रमाबाईंनी मनोरमेच्या विवाहासंबंधी काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. त्याचबरोबर एका ज्यू मुलाबरोबर तिचा विवाह होऊ नये, असेही त्यांना वाटत असले पाहिजे. ख्रिस्ताच्या शिकवणुकीमुळे आपल्याला त्याचा मिळालेला आधार आपल्या सामाजिक कार्यामुळे आपल्या स्वतःच्याही भाव-भावनांना रमाबाईंनी दिलेली तिलांजली व त्याचबरोबर आपण एका विशिष्ट ध्येयाने सुरू केलेले कार्य यावरून असे दिसून येते की, आपल्या सारखीच आपली मुलगी असावी, असे स्वप्न रमाबाईंनी बाळगलेले असावे. त्यामुळे मनोरमेच्या लग्नात रमाबाईंनी फारसे लक्ष घातले नसावे. दोन हजार स्त्रियांची काळजी वाहात असताना केवळ आपल्या एका मुलीसाठी एवढा स्वार्थी विचार करणे रमाबाईंना प्रशस्त वाटले नसावे.

रमाबाईंच्या वडिलांनी- अनंतशास्त्रींनी, रमाबाईंचा विवाह बालपणात करण्याचे टाळले होते. त्याची कारणं आणि काळ वेगळा होता. तसा काळ मनोरमेच्या विवाहाबाबत नव्हता.रमाबाईंनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे व महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रिबाई, गोपाळ गणेश आगरकर इ. अनेक समाजसुधारकांनी निर्माण केलेल्या विधायक सामाजिक पार्श्वभूमीमुळे, सामाजिक परिस्थिती कितीतरी पालटली होती, परंतु रमाबाई ज्या प्रकारचे विरक्तीचे जीवन जगली तसे संस्कार मनोरमेवर बालपणापासूनच झालेले होते. सामाजिक, शैक्षणिक व आध्यात्मिक कार्यात मनोरमेनेही आपले जीवन समर्पित करावे अशा विचारांचा दबाव कळत-न-कळत मनोरमेवर झालेला असावा.

मनोरमेला आपल्या आई व्यतिरिक्त अधिक कोणी प्रिय नव्हते. त्यामुळे तिनेही सामाजिक आध्यात्मिक, शैक्षणिक कार्यात स्वतःला वाहून घेतले होते. गुलबर्गा येथे मुसलमानांच्या वस्तीत तिने मुलींची शाळा सुरू केली होती. (१९१३) 'मुक्तिसदन' मध्ये ती अंध विद्यार्थ्यांना ब्रेललिपीतून शिकवीत असे. देशा-परदेशात तिने प्रभावी व्याख्याने देऊन भारतातील कार्यासाठी फंड गोळा करून आपल्या आईला मदत केली होती. देश-

परदेशात प्रवास करूनही मनोरमेच्या विचारभावनांची मुळं भारतात घट्ट रूतलेली होती. तिला स्वतःला भारतातील लोकांची सेवा करायची होती. रमाबाईंनीही जगभरचा प्रवास केल्यानंतर महाराष्ट्र हीच आपली कर्मभूमी ठरवली होती.

मनोरमेने स्वतःला 'प्रभूच्या हातात' त सोपवून दिलेले होते. प्रार्थनेच्या बळावर व परमेश्वरांवर विसंबून तिने आपली कार्ये केली. तरीही लौकिकदृष्ट्या तिच्या शरीरावर, तिने घेतलेल्या कष्टांचा, मानसिक ताणाचा विपरीत परिणाम होत होता. श्वासोच्छवासाचा तिला त्रास होत असे. तिला हृदयविकाराचेही दुखणे होते. तिला मिरज येथील हॉस्पिटलमध्ये हालविण्यात आले होते. तेथेच तिचा मृत्यु झाला. २४ जुलै, १९२१ रोजी वयाच्या चाळिसाव्या वर्षी तिचा मृत्यु झाला. आपला शेवटच्या अंशाचा, मनोरमेचा मृत्यु रमाबाईंना 'याति देही' बघावा लागला. त्यावेळी रमाबाई केडगावात होत्या. आपला मृतदेह केडगावला नेऊ नये, तो पाहून आपल्या आईला दुःख होईल, असे मनोरमेला वाटत होते. मिरज येथील दफनभूमीत मनोरमेचा मृतदेह पुरण्यात आला. तिच्या मृत्युनंतर रमाबाई म्हणाल्या; 'देवाचे होते. देवाने नेले.'

## चित्शक्तीचा प्रत्यय

पंडिता रमाबाईंनी ‘शारदासदन’ मधून ‘मुक्तिसदन’ मध्ये स्थलांतर केले; त्यावेळी त्यांच्या सामाजिक कार्याचे आध्यात्मिक कार्यात रूपांतर झाले. खरे तर ‘मुक्तिसदन’ मधील दोन हजार स्त्रियांना सांभाळण्याची जबाबदारी हे फार मोठे आणि अवघड असे सामाजिक कार्य होते. त्यावर लक्ष केंद्रीत केल्यामुळे इतर सामाजिक घडामोडी, त्यांचे प्रबोधन कार्य, त्यासाठी चाललेला त्यांचा प्रवास, सभा-बैठकी, यातील त्यांच्या सहभागावर मर्यादा पडल्या. ‘मुक्ति’ मधील स्त्रियांच्या अनौपचारिक शिक्षणाचे व व्यक्तिमत्त्व विकासाचे तसेच त्यांच्या आध्यात्मिक विकासाचे कार्य करण्यात त्या इतक्या गुंतल्या की, अन्य सामाजिक हालचालींकडे लक्ष देण्यास त्यांना सवड मिळाली नाही. या दरम्यान ‘बायबल’ भाषांतराचे काम त्यांनी हाती घेतले होते. त्यामुळे या काळातील त्यांचे अन्य लेखनही धार्मिक स्वरूपाचेच होत राहिले. स्त्रीधर्मनीती, द हाय कास्ट हिंदू वुमन, इंग्लंडचा प्रवास, युनायटेड स्टेटसची लोकस्थिती अशासारखे सामाजिक-वैचारिक-प्रवासवर्णनात्मक स्वरूपाच्या लेखनाची जागा आता अत्यंत धार्मिक स्वरूपाच्या लेखनाने घेतली. यात ‘यीसूजीके गीत’ हिंदी गीतांचा संग्रह, देव प्रीती आहे, रोजचा उजेड, उद्या येणार आहे, इबरी व्याकरण अशा काही पुस्तकांचा समावेश करता येईल. आधीपासूनच भाविक असलेला त्यांचा पिंड अधिकच भाविक झाला. आता त्या ख्रिस्तावरील श्रद्धेतच जगू लागल्या. हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीत सभेत बोलणाऱ्या रमाबाई आता फक्त येशूशी, पवित्र आत्म्याशी, चित्शक्तीशी बोलत, संवाद साधीत आपले कार्य करू लागल्या.

रमाबाईंनी ‘मुक्तिसदन’ अथवा ‘मुक्तिमिशन’ मध्ये दवाखाना चालविला होता. तरी त्या स्वतः मात्र कधीच औषध घेत नव्हत्या. मनोरमेचे डोळे काहीसे अधू होते, परंतु रमाबाईंनी तिला औषध न घेता प्रार्थना करण्याचा उपाय सुचविला होता.

ख्रिस्तवचनांचा रमाबाईंवर असलेला प्रभाव व आपल्याकडे आलेल्या गरजवंत मुली यांच्यासाठी प्रार्थना, त्यांची सेवा यामुळे रमाबाई प्रार्थनेसाठी जास्त वेळ देत होत्या. त्यांच्यावर चांगुलपणाचे संस्कार करीत असताना, ख्रिस्ती धर्मातच त्यांचा उद्धार आहे, असे त्यांना वाटत होते. त्यांनी कळकळीने केलेली प्रार्थना तसेच रमाबाईंचे चोख वर्तन व पावित्र्याने परिपूर्ण अशा त्यांच्या वागण्याने परिसरातील वातावरणाने प्रभावीत होऊन 'मुक्तिसदन' मधील बऱ्याच मुलींनी कालांतराने बाप्तिज्मा घेतला होता. 'शारदासदन' मधील धर्मांतर प्रकरणाने जसे टीकेचे मोहोळ उठले. तितके 'मुक्तिसदन' मधील धर्मांतराने झाले नाही. आपण करीत असलेल्या कार्यावर रमाबाईंचा इतका विश्वास होता की, रमाबाई सर्वांच्या प्रश्नांना उत्तरेही देत बसल्या नाहीत.

रमाबाई ख्रिस्ती झाल्या होत्या खऱ्या; परंतु त्यांनी ख्रिस्ती धर्मातील कोणता एखादा पंथ स्वीकारला नव्हता. त्यामुळे कोणत्या पंथाची दीक्षाही त्यांनी मुलीला दिली नाही.

'मुक्तिमिशन' मध्ये धर्मसंजीवनाचे, अर्थात पवित्र आत्म्याची प्रार्थना करण्याचे काम जोरात चालत असे. 'मुक्ति' मधील मुलींनी खोटं बोलू नये. प्रामाणिकपणे व सत्याने वागावे, यावर रमाबाईंचा कटाक्ष होता. सततच्या प्रार्थनेने, तेथील मुली प्रार्थना चालू असताना आपल्या पापांची कबुली देऊन नीतीने वागण्याचा निर्णय घेऊ लागल्या. 'पवित्र आत्म्या' ला रमाबाईंनी 'चित्शक्ती' असे म्हटले आहे. बाप्तिज्मा, ख्रिस्ती धर्मप्रवेश वा नामकरण विधी दोन प्रकारचा असतो. एक पाण्याने दिला जाणारा बाप्तिज्मा, जो बालपणी दिला जातो व दुसरा अग्नीने मिळणारा बाप्तिज्मा यावेळी पवित्र आत्मा त्या विशिष्ट व्यक्तीवर उतरल्याचा अनुभव येतो, रमाबाईंना असा अनुभव आला होता. एकदा प्रार्थना करीत असताना, त्यांना आपले अंग पोळत असल्याचा अनुभव आला आणि एकदा तर त्यांनी हिब्रू भाषेत काही वाक्ये उच्चारली. परंतु ती आपण उच्चारलेली नाही; तर आपल्या तोंडून कोणीतरी बोलले; एवढे मात्र त्यांना जाणवले.

येथे एक लक्षात येते की, या काळात रमाबाईंनी 'बायबल' भाषांतराचे काम घेतले होते. 'बायबल' हे हिब्रू व ग्रीक भाषेत लिहिलेले असल्यामुळे व मूळ भाषेतील संदर्भ घेत 'बायबल' असावे, असे त्यांना वाटत असल्यामुळे रमाबाईंनी या दोन्ही भाषांचा अभ्यास सुरू केला होता. 'इबरी व्याकरण' नामक पुस्तक ही त्या लिहीत होत्या. त्यामुळे त्यांच्या तोंडून हिब्रू भाषा प्रगटली असावी, असे वाटते. रमाबाईंनी अतिशय समजुतदारपणाचे धोरण ठेवले होते. त्यामुळे अन्य भाषेतून प्रार्थना करण्यास त्यांनी कोणावरही दडपण आणले नाही.

चित्शक्तीच्या प्रभावाचा अविष्कार रमाबाईंना अनेकदा अनुभवायला मिळाला. त्या पूर्णपणे ईश्वरी योजनेवर विसंबून राहात. 'सदना' तील, 'मुक्ति' तील मुलींची संख्या वाढावी अशी त्यांची इच्छा होती. ती फलद्रुप झाली. गुजरात व मध्यप्रदेश येथे पडलेल्या दुष्काळात, रमाबाईंनी स्वतः तो प्रदेश पिंजून काढला व सरकारी नियमानुसार त्यांच्या परवानगीने शेकडो मुलींना 'मुक्ति' त आणले.

'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ने पाठविलेल्या मदतीतून रमाबाईंनी इमारती उभारल्या. एका बाजूला माणसं, व्यक्ती उभी करण्याचे त्यांचे काम चालले होते व त्यांच्या निवाऱ्यासाठी इमारती उभ्या केल्या जात होत्या. मुलींना जीवनविषयक व आर्थिक स्वावलंबनासाठी शिक्षण दिले जात होते.

केडगावच्या 'मुक्ति' परिसरात एकूण तेरा विहिरी खणल्या गेल्या. काही विहिरींना पाणी लागत नव्हते. पाणी लागण्यासाठी रमाबाई प्रार्थना करीत. दोन विहीरींचे तळ तर कोरडेठाक पडत. परंतु त्या विहिरी सकाळी भरून येत. हा केवळ प्रार्थनेचा प्रभाव असे रमाबाईंना वाटे. त्यांनी विहिरींना नावे दिलेली होती. 'धीर' नामक विहिरींला तर अजिबात पाणी लागत नव्हते. रमाबाईंनी व इतर मुलींनीही रात्रभर प्रार्थना केली आणि आश्चर्य म्हणजे ती विहीर दुसऱ्या दिवशी उपळून आली. विहिरी बांधण्यासाठी रमाबाईंना अनेक अनामिकांनी देणग्याही पाठवल्या. एका

गृहस्थाने तर १३८१४ रु. देणगी म्हणून पाठवून दिली. पंप, इंजिन, नळ अशी सामग्रीही देणगी म्हणून मिळाली. विजेची सोय व्हावी म्हणून रमाबाईंनी साऱ्या मुलींसह प्रार्थना आरंभिली; तर त्याचवेळी इंग्लंडमधील एका बाईंनी देणगी पाठवून दिली. त्यातून रमाबाईंनी एक मोठा जनरेटर विकत घेतला. 'शारदासदन' व 'मुक्तिसदन' मध्ये तयार होऊन बाहेर पडलेल्या अनेक मुलींनी थोड्याफार प्रमाणात आर्थिक मदत केली. त्यामुळे केडगावातील अनेक इमारतींत वीज पोहोचली. काळानुसार राहणीमानात बदल करण्यास प्रवृत्त होणाऱ्या रमाबाईंचे एक प्रागतिक रूप या उदाहरणावरून दिसून येते.

'मुक्ति' मधील हजारो स्त्रियांसाठी धान्य, अन्न पुरवणे ही रमाबाईंची फार मोठी जबाबदारी होती. प्रार्थनेच्या बळावर रमाबाईंनी असे दिवसही निभावून नेले. रमाबाई म्हणतात, 'शारदासदन' अमेरिकेतील मित्रमैत्रिणीच्या आधारावर चालत असे. परंतु 'मुक्तिमिशन' फक्त श्रद्धेच्या व विश्वासाच्या आधारावर चालते.

एकदा तर, रमाबाई जबलपूर गाडीतून प्रवास करताना त्यांच्या 'आंतल्या आवाजाने' त्यांना भुसावळला उतरण्याचा संदेश दिला. त्या संकेतानुसार त्या उतरल्या. स्टेशनवर बसून राहिल्या. इतक्यात दुसऱ्या एका गाडीतून त्यांची एक मैत्रीण उतरली. तिने रमाबाईंच्या हातात एक पुडके ठेवले व ती निघून गेली. त्यात 'मुक्ति' साठी दिलेली आर्थिक मदत देणगी होती.

'मुक्तिमिशन' च्या कार्यासाठी परदेशी वा इतर लोकांकडेही पदर पसरविण्याचा रमाबाईंना कंटाळा आला होता. कारण सर्वांना पत्रं लिहिण्यात त्यांचा फार वेळ जात असे. म्हणून रमाबाईंनी परमेश्वरावर भिस्त ठेवून कार्य करण्याचा निर्णय घेतला होता. रमाबाई आणि मनोरमा यांनी तर आपल्या कामाचा मोबदला म्हणून पुढे पगार घेणेही बंद केले. तसा ईश्वरी संकेत मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. मनोरमेच्या मृत्युने रमाबाई पार हादरल्या होत्या; तरीही त्या शांत राहू शकल्या त्या केवळ

चित्शक्तिच्या आधारावर. मनोरमेचा मृत्यू हा रमाबाईंचा त्याच्या नजरेसमोर झालेल्या आप्तजनांच्या मृत्युपैकी शेवटचा मृत्यु होता. ‘जे देवाने दिले ते देवाने नेले, असे म्हणून त्या प्रार्थनेत निमग्न झाल्या. आपल्या स्वतःचा मृत्युदेखील रमाबाईंना आधीच कळून आल्यासारखा होता. ‘बायबल’ भाषांतराचे काम पूर्ण झाल्यावरच आपल्याला मृत्यू यावा अशी त्यांची इच्छा होती आणि तसेच झाले. ज्या रात्री ‘बायबल’ भाषांतराचे प्रुफं तपासण्याचे काम पूर्ण झाले, त्याच रात्री वा मध्यरात्री त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

आधी फक्त उच्चवर्णीय हिंदू स्त्रिया, विधवा यांच्यासाठी कार्य करण्याचा पुढाकार घेणाऱ्या रमाबाई नंतर तळागाळातील उपेक्षित, अस्पृश्य अशा स्त्रियांसाठी कार्य करण्यास, त्यांची सेवा करण्यास प्रवृत्त झाल्या. रमाबाईंमधील हे परिवर्तन म्हणजे त्यांच्या धर्मांतराचा परिणाम होता. ख्रिस्तशिकवणुकीने प्रभावीत होऊन त्यांनी आपले लक्ष गोरगरीब लोकांकडे वळविले होते.

# एकखांबी जेरूसालेम नगरी

पंडिता रमाबाईंकडे त्यांची स्वतःची असलेली इंग्रजी ‘बायबल’ ची प्रत त्या कोणालाही देत नसत. त्यांचे मानसिक व आध्यात्मिक भरणपोषण त्यावर होत असल्याकारणाने त्या ‘बायबल’ ला आपले अन्न समजत असत. शिवाय व्यक्तिगत प्रार्थना करताना वा ‘बायबल’ मधील उतारे वाचताना त्यातील पानावर ‘मुक्ति’ मधील अनेकांची नावे त्या लिहीत व त्यांच्यासाठी प्रार्थनाही करीत असत. ‘बायबल’ मधील अमोल आत्मिक अन्न जसे आपल्याला प्राप्त झाले, तसे गरिबालाही मिळावे; म्हणून त्यांच्यासाठी ‘बायबल’ चे मराठी भाषांतर करावे असे त्यांनी ठरवले. हे भाषांतर मुळाबरहुकूम व्हावे अशी त्यांची मनस्वी इच्छा होती. मूळ‘बायबल’ हिब्रू आणि ग्रीक भाषेत असल्यामुळे त्या भाषाही रमाबाईंनी अवगत केल्या व भारतीय धर्मग्रथातील कोणतीही संकल्पना न वापरता मराठीत ‘बायबल’ आणले. ‘बायबल’ सोसायटीने ‘बायबल’ ची केलेली मराठी भाषांतरे, रमाबाईंना तितकीशी रूचली नाहीत. शिवाय ती भाषांतरे परदेशी मिशनऱ्यांनी केलेली होती. हे मिशनरीही मराठी भाषा नव्याने शिकलेले असल्याने त्यात बऱ्याच उणिवा असल्याचे रमाबाईंना आढळले होते.

केडगावमधील ‘मुक्तिमिशन’ म्हणजे ‘हे विश्वचि माझे घर’ ची प्रतिकृती होती. हे विश्व रमाबाई समर्थपणे सांभाळीत होत्या. आता तर ‘बायबल’ चे विश्वही मूर्तिमंत रूपात आणण्याचा प्रयत्न त्यांनी चालवला होता. एकेक शब्द पिंजून घेत, विशुद्ध व निर्भेळ स्वरूपात ‘बायबल’ चे मराठी भाषांतर करण्यास त्यांनी प्रारंभ केला. १९०५ पासून सुरू झालेले हे काम १९२२ पर्यंत म्हणजे १७ वर्षेपर्यंत चालले होते.

भारतीय धर्मग्रंथातील संकल्पनांमध्ये मूर्तिपूजेचा भाव दडलेला असल्याने रमाबाईंनी या संकल्पना नाकारल्या. मराठी भाषा म्हटल्यावर

भारतीय संस्कृतीचा संदर्भ घेऊनच ती भाषा येणार. तरीही रमाबाईंनी अत्यंत काटेकोरपणे शब्द वापर केलेला आहे.

'उत्पन्न' या शद्बाऐवजी 'निर्माण' हा शब्द रमाबाई वापरतात. महात्मा ज्योतिराव फुले यांनी परमेश्वराला 'निर्मिक' हा शब्द वापरलेला आहे; याचे येथे स्मरण होते. उत्पन्न म्हणजे आपल्या अंशाची! जर पृथ्वी उत्पन्न केली म्हणजे आपल्या अंशाची केली, म्हणजे कशाचीही पूजा केली तरी ती परमेश्वराची पूजा केल्यासारखे होईल. ही मूर्तिपूजेची संकल्पना पूर्णपणे हिंदू संकल्पना आहे व ख्रिस्ती तत्त्वज्ञानाशी ती विसंगत आहे म्हणूनच 'बायबल' मधील पहिल्या प्रकरणाला 'उत्पत्ति' असे न म्हणता 'प्रारंभ' असे म्हटले आहे.

'पुत्र' हा शब्दवापर रमाबाईंनी टाळलेला आहे. पुं. (पुम) वा पुत् म्हणजे नरक. त्र त्रायते म्हणजे तारण करणारा. नरकातून तारतो तो पुत्र. मनुवचनानुसार पुत्राला जन्म दिला; तर पित्याला मोक्ष मिळतो. स्त्रीवर अन्यायकारक असा शब्द न वापरता देवाचा पुत्र असे म्हणण्याऐवजी रमाबाई देवाचा मुलगा हा लोकव्यवहारातील शब्द किंवा संस्कृतमधील जनित, सुत, आत्मज असे शब्द त्या वापरतात.

परमेश्वर म्हणजे परम + ईश्वर, म्हणजे ईश्वरांमध्ये श्रेष्ठ, म्हणजे एकापेक्षा आणखी कोणीतरी ईश्वर असला पाहिजे. शिवाय परमेश्वर हे महादेव अथवा शंकराला वापरलेले अभिधान आहे; रमाबाईंची धाकटी मावशी व त्यांची मुलगी मथुताई, या केडगावात राहात असताना आपले सोवळे-ओवळे सांभाळून राहात होत्या. रमाबाई त्यांना सांगत, 'एकाच परमेश्वराची आराधना करावी', तेव्हा त्यांच्या मावशीला वाटले, शंकराचीच प्रार्थना करावी. हे रमाबाईंच्या लक्षात आल्यावर त्यांनी 'परमेश्वर' हा शब्द वापरणे सोडून दिले. त्याऐवजी 'यहोवा' हा शब्द वापरतात. 'पिता' हा शब्दही त्या वापरतात. संस्कृतमधील 'पितृ' शद्बापासून आलेला 'पिता' हा शब्द त्यांना योग्य वाटतो. 'बायबल' सोसायटीने वापरलेला 'पिता' शब्द रमाबाईंनी तसाच ठेवलेला आहे.

'स्वर्गीय पिता' या शद्बाऐवजी मात्र रमाबाई आकाशातील पिता वा यहोबा, देवा असे संबोधितात. रूढ अर्थाने स्वर्गीय म्हणजे स्वर्गात गेलेला, म्हणजे मरण पावलेला, शिवाय 'स्वर्ग' ही संकल्पना हिंदू धर्मातील 'सात स्वर्गा' कडे नेणारी आहे; त्यामुळे ही संकल्पना रमाबाई नाकारतात.

'मुक्ति' म्हणजे मोक्ष, याऐवजी रमाबाई 'तारण' हा शब्द वापरतात. मात्र आपल्या निवासस्थानाल वा आश्रमाला 'मुक्तिसदन' असे नाव देताना त्यांना ही हिंदू संकल्पना अभिप्रेत नसावी; तर दुःख दैन्य, दुष्काळ, दास्य यापासून मुक्तता करणारे सदन हा लौकिक अर्थ त्यांनी घेतला असावा.

'पश्चाताप' या शब्दाबाबतही असेच झालेले आहे. पश्चाताप केल्यानंतर माणूस शुद्ध होतो म्हणजे त्याचे पाप नाहीसे होते. परमेश्वराने आपला 'मुलगा' आपल्याला पापापासून मुक्त करण्यास, तारण करण्यास पाठविला. म्हणजे आपल्या पापावर त्याने पांघरूण घातले. म्हणजेच माणूस पापापासून मुक्त झालाच नाही; तर तो पापीच आहे; त्यामुळे पश्चाताप करा, हा शब्द न वापरता 'पालटा', 'परिताप करा' असा शब्द त्या वापरतात.

'प्रारंभी देवाने आकाशे अस्तित्वात आणली' या वाक्यप्रयोगात 'आकाशे' हा शब्द अनेकवचनी आहे. अंतराळाचे अनेक पापुद्रे परमेश्वराने निर्माण केले असे रमाबाईंना अभिप्रेत असावे. 'आकाश' हा शब्द त्यांनी स्वर्गाला उद्देशून वापरला आहे; हिंदू संकल्पनेप्रमाणे सातवा वा आठवा स्वर्ग वगैरे त्यांना सांगावयाचे नाही. Heaven ही ज्यू लोकांचीच संकल्पना आहे.

पंडिता रमाबाईंनी 'पवित्र शास्त्रा' चे केलेले भाषांतर म्हणजे एक मिशनकार्य आहे. आपल्या इतर मिशनकार्याप्रमाणेच अत्यंत आत्मीयतेने केलेले हे कार्य आहे. स्वतःच्या उद्योगशीलतेने, निष्ठापूर्ण जीवनाने, त्यांनी स्वतः . 'बायबल' चे अनन्यसाधारण महत्त्व त्यांच्या अनुवादकार्याने त्यांनी सहाय्य करणाऱ्यांवर बिंबविले. एकेक शब्द त्यांनी तोलूनमापून वापरलेला आहे. ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेच प्रतीक आहे. सामान्य

लोकांपर्यंत हे ज्ञान पोहोचवावे हा त्यांचा मनस्वीपणाच यातून दिसून येतो. शुद्धतेच्या आत्यंतिक आग्रहातून रमाबाईंची भाषा कृत्रिम वाटत असली तरी तत्कालीन भाषेचाच तो परिणाम होता. मार्टिन ल्युथर यांनीसुद्धी सामान्य लोकांच्या भाषेत, जर्मन भाषेत 'बायबल' चे भाषांतर केले होते. सोळाव्या शतकात फा. थॉमस स्टीफन (१५४९-१६१९) या जेज्वीट मिशनऱ्याने लिहिलेल्या 'ख्रिस्तपुराण' या ग्रंथाचीही येथे आठवण होते. परदेशी असूनही मराठी भाषेची महती व मराठी संतांच्या ओवीबद्ध रचनांचा प्रभाव यातून ख्रिस्ताची शिकवण व ख्रिस्तचरित्र त्यांनी मराठीत आणले. रोमन लिपीत लिहिलेले हे पहिले मराठी ख्रिस्तचरित्र आणि ग्रीक व हिब्रू या भाषेतून थेट मराठी 'बायबल' आणणारी पं. रमाबाई ही जगातील पहिली महिला. तोपर्यंत कुणाही स्त्रीने 'बायबल' चे अन्य कोणत्या भाषांत भाषांतर केलेले नव्हते.

फा. थॉमस स्टीफन परदेशी असूनही 'ख्रिस्तपुराण' या नावापासूनच त्यांनी अनेक हिंदू संकल्पनांचा स्वीकार केला. यमकोंड, स्वर्ग असे शब्द बिनदिक्कत वापरले; तर रमाबाई भारतीय असूनही ख्रिस्तांचे तत्त्वज्ञान मराठीत आणताना भाषेची आणि संकल्पनांची शुचिता पाळण्याचा आग्रह धरताना दिसतात. हा त्यांचा आग्रह भारतीय समाजसुधारकांच्या पिंडाला शोभण्यासारखाच आहे. रमाबाईंनी ओवी, अभंग, आरती या रचना प्रकारांचा अवलंब ख्रिस्तस्तवनासाठी अवश्य केलेला आहे. तथापि, कवयित्रि असूनही गीतांतून ख्रिस्ततत्त्वज्ञान अथवा 'बायबल' सांगण्याचा मोह टाळलेला आहे . 'बायबल' जसे आहे; तसेच व त्याच पद्धतीने सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

'बायबल' च्या भाषांतराच्या कामासाठी प्रा. म.दा. साठे, रेव्ह. नारायण वामन टिळक अशा संस्कृतज्ञांची मदत घेण्याचा प्रयत्न रमाबाईंनी केलेला आहे. कवी नारायण वामन टिळक तर लक्ष्मीबाई व आपल्या मुलासह सहा महिने केडगावला राहिले. या काळात रमाबाईंनी रेव्ह. ना. वा. टिळकांच्या भक्तिगीतांचा 'भजनसंग्रह' आपल्या प्रेसमध्ये

छापला. मात्र रमाबाईंनी उपासनेसाठी ज्या गीतांचा अवलंब केला होता ती गीते इंग्रजी चालीतील होती. 'मुक्ति' मधील मुलींना भारतीय संगीतावर बसविलेली ख्रिस्ती गाणी शिकवावी असा टिळकांचा आग्रह होता व त्यासाठीच त्यांनी 'भजनसंग्रह' केला होता. परंतु रमाबाई 'बायबल' वचनानुसार चालणाऱ्या होत्या. 'तुम्ही प्रार्थना करता; तेव्हा विदेशांसारखी व्यर्थ बडबड करू नका.'' (मत्तय ६:७) हे वचन त्यांच्या मनावर पक्के ठसले होते. 'बायबल' मधील दाविदाची स्तोत्रे अभंगांच्या चालीवर लिहून देतो' असे रेव्ह. ना.वा. टिळक म्हणाले होते. स्तोत्रांच्या वाक्यरचनेत काही फरक होईल अशी भिती रमाबाईंना वाटली. शेवटी धैर्यशील नावाच्या एका ख्रिस्ती गवयाने त्या स्तोत्रांना भारतीय संगीतातील चाली दिल्या व रमाबाईंनी त्यांना मान्यता दिली.

रेव्ह. नारायण वामन टिळक हे 'तुका निर्मित सेतुवरूनी मीही आलो ख्रिस्तचरणी' असे म्हणणारे होते; तर पंडिता रमाबाईंना मराठी संत साहित्याचे फारसे ज्ञान नव्हते. त्यांचे वडिल अनंतशास्त्री डोंगरे यांनी शिकविलेली 'देववाणी' त्यांना अवगत होती. हिंदू धर्माचा व धर्मशास्त्राचा त्याग केल्यावरही 'बायबल' चे भाषांतर करताना ख्रिस्ती 'देववाणी' त काही फरक पडू नये याची काळजी घेतलेली असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीचा पुरस्कार करणारे पक्के मिशनरी रेव्हरंड नारायण वामन टिळक व 'बायबल' वचनानुसार वागणाऱ्या पक्क्या मिशनरी पंडिता रमाबाई यांचे एकमत होणे अशक्यच होते. त्यामुळे टिळक फार काळ 'मुक्ती' त राहिले नाहीत.

'बायबल' भाषांतराच्या कामी रमाबाईंची वृत्ति आग्रही दिसली; तरी त्यांचा आहार-विहार-आचार मात्र पूर्णपणे भारतीयच राहिलेला आहे. शाकाहार, ताटवाट्यांचा वापर, सुती पोशाख, भारतीय पद्धतीची साडी नेसणे, हिंदी राष्ट्रभाषा असावी याबाबत आग्रह इ. त्यांचे पक्के भारतीयत्व सूचित करते. वैधव्य सूचित करणारी सफेद साडी ही मिशनरीवृत्तीचेही सूचन करते. 'मुक्ती' मधील अनेक मुलींना रमाबाईंनी मराठी नावे दिलेली

होती. परदेशी मिस्. मॅकग्रेगरचे नाव सोन मावशी ठेवले होते. स्वतःचे व मुलीचे नावही रमाबाईंनी बदलले नव्हते. धर्मांतरावेळी मात्र मेरी रमा असे नाव दिलेले होते. ते त्यांचे ख्रिस्तीत्व सूचित करण्यासाठी असावे. विशेषतः वॉण्टेज सिस्टर्सच्या मठात राहिल्याने प्रत्येक सिस्टरांच्या नावाआधी 'मेरी' हे ख्रिस्ताच्या आईचे नाव लावले जाई. तसेच रमाबाईंच्या नावाआधीही लावले गेले. 'वर्जिन मेरी', येशूची आई मारिया, हिला कुमारिका अवस्थेत असताना दैवी योजनेनुसार गर्भप्राप्ती झाली, असा ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्मात कौमार्याला व ब्रह्मचर्याला महत्त्व दिले जाते. मठवासिनी अविवाहित राहण्याचे व्रत घेतात त्यामुळे त्यांच्या नावाआधी 'मेरी' हे विशेषण लावले जाई. हे नाव कौमार्य सूचित करते. मठातील सिस्टर्स अविवाहित असतात. त्यामुळेही त्यांना हे विशेषण वापरले जाते. काही काळ रमाबाईंनी आपल्या नावाआधी 'मेरी' हे विशेषण वापरले . मनोरमाच्या नावाआधीही हेच विशेषण वापरले जाई. आई आणि मुलीचे नाव 'मेरी' कसे असा प्रश्न काही भारतीयांनी उपस्थित केला होता. मात्र त्यामागची पार्श्वभूमी त्यांना ज्ञात नसावी.

रमाबाईंचे धर्मांतर लहान वयात म्हणजे वयाच्या पंचविसाव्या वर्षी, १८८३ साली इंग्लंडमध्ये झाले. नारायण वामन टिळकांचे धर्मांतर वयाच्या चौतिसाव्या वर्षी, १८९५ साली महाराष्ट्रात झाले. लक्ष्मीबाई टिळकांचे धर्मांतर रेव्ह. ना. वा. टिळकांच्याही नंतर बऱ्याच वर्षांनी १९०० मध्ये झाले. रमाबाईंना लहान वयातच धर्मग्रंथातील ज्ञानाचा फोलपणा अनुभवावयास मिळाला होतो. अनेक हिंदू धर्मस्थळी त्यांनी जे पाहिले; त्या दांभिकतेचे ठसे त्यांच्या मनावरून सहजासहजी पुसून जाणारे नव्हते. नव्या धर्माच्या शोधात तर त्या होत्याच; परंतु आयुष्यातील काही महत्त्वाच्या टप्प्यांवर त्यांच्या पुढ्यात 'बायबल' उभे ठाकले. कलकत्त्यात कोणीतरी दिलेले संस्कृत भाषेतील 'बायबल' ची प्रत, इंग्लंडमध्ये गेल्यावर हाती आलेली 'बायबल' ची इंग्रजी प्रत, पुनश्च भारतात

आल्यावर ‘बायबल’ सोसायटीने केलेली मराठी भाषांतरित प्रत, त्यानंतर हिब्रू व ग्रीक भाषांचा अभ्यास करून मुळातून वाचलेले ‘बायबल’ या साऱ्या स्थित्यंतरातून आणि भाषांतरातून खिस्ताचा शब्द विशुद्ध स्वरूपात येण्याची अथवा आणण्याची त्यांना नितांत गरज वाटली. ‘बायबल’ च्या भाषेतील आणि स्वतःच्या विचारातील व अनुभवातील स्थित्यंतर त्यांना ‘बायबल’ भाषांतराच्या शुद्धतेच्या आग्रहापर्यंत घेऊन गेलेले आहे.

नारायण वामन टिळकांच्या बाबतीत असे झाले नाही. हिंदू धर्मग्रंथांचा अभ्यास, मराठी संतवाङ्‌मझयाचा अभ्यास, आणि त्यांच्या भारतीयत्वाला, खिस्ती धर्म स्वीकाराने बाधा पोचली नाही. खिस्त त्यांना भावला. पण तो भारतीय रूपात आणण्यासाठी, त्याच्या विचारांना भारतीय रूपात बसवण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. यातूनच खिस्तविषयक ओवी-अभंग व कवितांबरोबरच ‘खिस्तायन’ ही साकार झाले.

फादर थॉमस स्टीफन हे तर मुळातच खिस्ती होते. त्यांनी तर भारतीय लोकांना ‘बायबल’ त्यांचे वाटावे म्हणून भारतीय संकल्पनांचा स्वीकार करीत धर्मप्रसारासाठी ‘खिस्तपुराण’ लिहिले.

पंडिता रमाबाई ‘बायबल’ भाषांतराच्या कामी रात्रंदिवस राबत होत्या आणि त्यांची प्रभूकडे प्रार्थना होती की, बायबल भाषांतराचे काम पूर्ण झाल्याशिवाय आपल्याला मृत्यु येऊ नये आणि नेमके तसेच घडले. भाषांतराचे काम संपल्यावर रमाबाई फक्त दहा दिवस जगल्या. या दहा दिवसात त्यांनी ‘बायबल’ भाषांतराची प्रुफं तपासण्याचे काम केले.

रमाबाईंना हाडी ताप येत होता. त्यात मनोरमेचा हृदयविकाराने झालेला मृत्यू, स्वतःची वृद्धत्वाकडे चाललेली वाटचाल. बालपणापासून सोसलेले कष्ट. केडगावातील ‘मुक्ति’ तील दोन हजार माणसांचा संसार सांभाळण्याची जबाबदारी आणि त्यातच भाषांतराचा प्रचंड व्याप यांचा ताण त्यांच्यावर आलेला असावा. आत्मिक, आध्यात्मिक बळावर सर्व गोष्टी त्या निभावून नेत असल्या तरी मानवी देहाची, जीवनाची मर्यादा ओलांडणे त्यांना शक्य नव्हते. तरीही अंतर्ज्ञानाने त्यांना आपला मृत्यु

जवळ आल्याचे जाणवलेच होते. ४ एप्रिल रोजी संध्याकाळी रमाबाईंनी आपली खोली स्वच्छ करण्यासाठी मुलींना सांगितले. सर्व वस्तू जागच्या जागी लावायला सांगितल्या. अंघोळीसाठी घंगाळात पाणी भरून ठेवायला सांगितले. मग त्यांनी 'बायबल' भाषांतराचे शेवटचे प्रूफ तपासून छापखान्यात पाठवले. अंघोळ आटोपून प्रभूची प्रार्थना करून त्या अंथरुणावर पडल्या. त्यांची काहीच हालचाल दिसली नाही. रमाबाई शांतपणे झोपी गोल्या होत्या... कायमच्या! 'मुक्ती' तल्या त्यांच्या मुली पहाटे पहाटे हुंदके देत रडत होत्या.

यमुना नदीच्या तीरावर एका कोवळ्या मुलीला तिचा नवरा व सासू मारताना पाहून, तिचे हुंदके व किंकाळी ऐकून रमाबाईंच्या मनात बालविधवा, परित्यक्ता, पाऊल वाकडे पडलेल्या, उपेक्षित, गरीब स्त्रियांसाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. चाळीस वर्षेपर्यंत प्रत्यक्ष कार्य करून त्यांनी आपली प्रेरणा जागती ठेवली आणि 'मुक्ती' त राहणाऱ्या भारतभरातील अठराशे स्त्रिया रमाबाईंच्या जाण्याने एकाच वेळी हंबरडा फोडून एकसूरात रडत होत्या. आक्रोश करीत होत्या. रमाबाईंची शवपेटिका 'मुक्ति' तील मुलींनीच आपल्या खांद्यावर वाहून दफनभूमीत आणली. मुलींची इच्छा होती की, कुणा पुरुषाने शवपेटिका वाहून नेऊ नये!

ज्या एका खांबावर केडगावमधील 'मुक्तिनगरी' उभी होती. 'बायबल' च्या मराठी भाषांतराचा कॅल्व्हरी जिने एकटीने आपल्या हातावर तोलून धरला होता. जेरुसालेम नगरीतील नाट्य जिने आपल्या लेखणीतून मूर्तिमंत रूपात मराठी भाषेत साकारले होते. तो मानवी खांब जी धराशयी झाला होता. तरी मोडकळीस आलेले, कुजलेले कितीतरी 'खांब' नव्याने रुजून आले होते आणि त्याची, 'मुक्तिनगरीत' एक बाग फुलून आलेली होती.

## मातृभूमीची सेवा

सप्टेंबर १८८१ मध्ये बर्लिन येथे 'ओरिएन्टल कॉंग्रेस' भरली होती. या काळात पंडिता रमाबाईंचे वास्तव्य सिलचर येथे होते. कलकत्ता येथील सुधारकाग्रणी व्यक्ती आणि सुविद्य पतीचा सहवास यांच्या बळावर रमाबाईंनी त्या कॉंग्रेसला कळविण्याच्या निमित्ताने सव्वीस श्लोकांचे एक काव्य रचले व ते संदेश म्हणून बर्लिन येथे पाठविले. या लेखनाचे प्रयोजन जरी तात्कालिक असले; तरी त्यात उत्स्फूर्तता व मातृभाषा संस्कृतविषयी अत्यादराची भावना आहे. संस्कृत भाषेच्या उद्धाराचा कळकळीचा आविष्कार त्यात आहे.

पंडिता रमाबाईंचे अध्ययन संस्कृतमधून झालेले असल्याकारणाने ती त्यांची बोलीभाषाच होती. १८७८ मध्ये आपल्या बंधूसह त्या कलकत्त्यात आल्या, तेव्हा अनेक ठिकाणी त्या संस्कृतमधूनच सभेत बोलत असत; व नंतर त्याचे भाषांतर केले जाई. बर्लिन येथे पाठवलेल्या संदेशात, समृद्धतेने व सुंदरतेने विनटलेल्या संस्कृत भाषेची झालेली विकल अवस्था त्यांनी वर्णिलेली आहे. त्या म्हणतात, 'एखाद्या वृद्धेसारखी ती उपेक्षित ठरलेली आहे. परकियांनी संस्कृत भाषेला व संस्कृत जाणणाऱ्यांना महत्त्वाचे स्थान दिले; पण संस्कृत ही भारतीय भाषा असूनही तिची त्यांच्याकडूनच उपेक्षा होत आहे' असे पाहून त्यांचे अंतःकरण तुटते आहे.

जग झपाट्याने बदलत चाललेले आहे; याची चाहूल रमाबाईंना केव्हाच लागली होती. त्यात संस्कृत भाषा लुप्त होऊन जाण्यास वेळ लागणार नाही. याची त्यांना जाणीव झालेली होती. त्या लिहितात, 'सध्याचे जग परिवर्तनीय आहे. त्यात अपरिवर्तनीय असे कोण बरे राहू शकेल. रहाटगाडग्यातील पाण्याप्रमाणे सारे दैवाच्या फेऱ्यात अडकलेले आहेत.'

संस्कृत भाषेविषयीचे स्वगत व्यक्त करताना रमाबाई लिहितात, 'पूर्वी मी अनेक मुलगे प्रसवलेल्या आवडत्या पत्नीप्रमाणे होते ; भुवनसुंदरी म्हणून माझी ख्याती होती, अनेक कवींनी केलेल्या माझ्या वर्णनाने जगताला माझी भुरळ पडली होती. ' अशा काही वर्णनात दैवाचा फेरा, बहुपुत्रेष्ट समृद्धशालिनी असे सारे संदर्भ येतात. स्त्री-पुरुष भेदामुळे होणाऱ्या अन्यायाबद्दल बोलणाऱ्या पुढील काळातील रमाबाई काही वेगळ्याच आहेत. आरंभकाळातील पूर्वीच्या सर्व सामाजिक समजुती त्यांच्या लिखाणात सहजपणे येतात. ते त्यांच्या भारतीय संस्कृतीवरील प्रेमाचे दर्शक आहे.

'ही भारतभूमी वाल्मिकी, कृष्ण, राम, युधिष्ठीर, सीमा आणि इतर सती स्त्रिया यांच्यासारखी रत्ने प्रसवलेली आहे. परंतु तिला कलंकित करणारेही तिच्या भूमीत जन्माला आलेले आहेत. त्यांनी काय केले; तर 'आत्मद्रुमोच्छेद परश्वधीयितान' आपल्या स्वतःच्याच ज्ञानवृक्षाच्या मुळावर कुर्हाकड घातलेली आहे कारण ते परकीय भाषांच्या मागे लागलेले आहेत.' आपल्या संस्कृतग्रंथवचनाचे संदर्भ रमाबाई अशा श्लोकांतून देत जातात.

मधल्या काळात त्यांनी वेदांतसारही अनुवादित रूपात आणले होते. हा अनुवाद हिंदीत होता.

१८८१ नंतर रमाबाईंच्या जीवनात अनेक घडामोडी झाल्या. खूप स्थित्यंतर झाली. पण स्वदेशी विषयीचा त्यांचा आदर आणि अभिमान तसूभरही कमी झाला नाही. इंग्लंड आणि अमेरिकेत वास्तव्य करून आल्यानंतरही त्यांनी मातृभाषेचाच आग्रह धरला. हिंदी ही राष्ट्रभाषा असावी अशी त्यांची मागणी होती. महाराष्ट्र ही आपली कर्मभूमी म्हणून निवडली; त्यावेळी मराठी भाषिक व परप्रांतातील आलेल्या, आणलेल्या अन्यभाषिक महिलांबरोबर त्यांच्या त्यांच्या भाषेतूनच त्यांनी संभाषण केले. त्यांच्यासाठी विविध भारतीय भाषा त्यांनी अवगत केल्या. परंतु इंग्रजी भाषेचे दडपण त्यांच्यावर घातले नाही. 'बायबल' भाषांतरासंदर्भात

रमाबाईंची भूमिका आग्रही होती. त्यांनी हिंदूधर्मविषयक संकल्पना टाळल्या. नाकारताना तेथील हवामान बदलण्याचा प्रयोग करण्यासारखेच हे अस्वाभाविक कृत्य होते.' फक्त 'बायबल' भाषांतराबाबतच रमाबाईंना संस्कृती-संक्रमण नको होते. बाकी भाषा मात्र त्यांनी मराठीच वापरली आहे. संस्कृत भाषेच्या आदरभावनेतून व ख्रिस्तविषयक प्रेमापोटी त्यांनी ख्रिस्तावरील दोन श्लोक तर संस्कृतमध्येच लिहिलेले आहेत.

रमाबाईंनी आपल्या लेखनातून व आपल्या वर्तनातून देखील मातृभाषा व मातृभाषाविषयीची आपली आदरभावना व्यक्त केलेली आहे. परदेशात असताना, मनोरमेच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या कुणा परदेशी बाईला रमाबाईंनी उत्तर दिले होते; 'मला तुमच्याबद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दात सांगता येणारी नाही मनोरमेला इंग्लंडला शिक्षणासाठी ठेवावी, ही तुमची सूचना आणि त्यामागचे प्रेम मी समजते. पण मनोरमा आमच्यातीलच एक राहावी, तिने आमच्या हिंदुस्थानावर प्रेम करावे, तीही एक हिंदीच राहावी, आणि तिने स्वतःला कोणी एक परकी किंवा श्रेष्ठ, जास्त शहाणी समजू नये, असे मला वाटते. इंग्लंडमध्येच वाढली ; तर ती एक इंग्रज स्त्री होईल; आणि मला ते नको आहे; तिची राहणी साधी असावी, असे मला वाटते; नाही तर तिला हिंदुस्थान भूमी परकी वाटू लागेल. तिथले लोकही परके वाटतील आणि हिंदी लोकांनाही ती परकीय वाटेल. ते मला नको आहे. हिंदी म्हणवून घेण्याची तिला लाज वाटता कामा नये. नाही तर परदेशात घरे करून राहिलेल्या काही हिंदी लोकांना हिंदी म्हणवून घेण्याची लाज वाटते, असे माझ्या ध्यानात आले आहे. मनोरमा मोठी झाल्यावर म्हणजे सतरा वर्षाची झाल्यावर मी तिला पुढचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडमध्ये पाठवीन. माझ्या कल्पनेप्रमाणे स्त्रियांना योग्य असे शिक्षण मिळण्याची सोय हिंदुस्थानात नाही.' रमाबाईंना आपल्या आईवडिलांकडून अनौपचारिक शिक्षण मिळाले होते. परंतु बदलत्या काळानुसार इंग्रजी भाषा व वैद्यक विद्या प्राप्त करण्यासाठी

त्या इंग्लंडला गेल्या. वैद्यकीय ज्ञान प्राप्त करण्यास आपण समर्थ आहोत हे कळल्यावर इतर ज्ञानशाखांचा व सामाजिक कार्याचा परिचय व शिक्षण रमाबाईंनी घेतले व ते पुरेसे आहे हे कळल्यावर त्या भारतात परतल्या. आपल्या माताभगिनींची मातृभूमीची सेवा हे त्यांचे जीवितध्येय होते. म्हणूनच त्या इंग्लंडअमेरिकेतच फार काळ राहिल्या नाहीत. आर्थिक मदत, देणग्या मिळविण्यासाठी अमेरिकेतच फार काळ राहिल्या नाहीत. आर्थिक मदत, देणग्या मिळविण्यासाठी त्यांना व मनोरमेलाही परदेशात जावे लागले होते. परंतु त्यांनी त्या देणग्यांचा उपयोग सामाजिक-आर्थिक कार्यासाठीच केला. स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे. त्यांनी स्वतः अगदी साधेपणाची राहणी अवलंबिली होती. पाहुण्यांसाठी रमाबाईंना एक थाटाची इमारत सहज बांधता आली असती; पण हा मोह रमाबाईंनी टाळला. लोकांच्या मदतीवर आपला आश्रम चालतो, तेव्हा त्यांना आपली श्रीमंती दाखविणे हास्यापद होईल, याची जाणीव बाईंना होती.

रमाबाई आयुष्यभर शाकाहारीच राहिल्या. इंग्लंड-अमेरिकेतही त्यांनी शाकाहारच केला. धर्म बदलला असला; तरी आचरणाने त्या वैष्णव होत्या. कांदा आणि लसूणदेखील त्या खात नसत. 'मुक्तिसदन' मध्ये राहणाऱ्या मडमांना देखील वरण-भात, व अन्य शाकाहारच असे. इंग्लंडमधील एक लॉर्डसाहेब एकदा आश्रम पहाण्यासाठी आले होते. त्यांच्यापुढेही वरणभात ठेवला गेला आणि त्यांनीही तो मोठ्या आवडीने खाल्ला अशी आठवण, 'मुक्तिसदन' मध्ये काही वर्ष व्यतीत केलेल्या डॉ. विष्णु भास्कर गोवंडे यांनी दिली आहे; तर आनंद विठ्ठल श्रीखंडे यांनी, पाटावर बसून जेवण होत असे, समोरच्या पाटाजवळ, डाव्या बाजूला तांब्याचे ताम्हण असे. पाटाच्या एका कोपऱ्यावर घडी केलेली शुभ्र नॅपकिन असे, अशी आठवण सांगितली आहे. रमाबाई स्वच्छतेच्या परमभक्त होत्या. सदनात लॉंड्री असे. बाहेरून आलेल्या पाहुण्याचे कपडे धुवून, इस्त्री करून पाहुण्यांच्या खोलीत अंथरूणावर व्यवस्थितपणे ठेवले जात.

पहाटे उठून गार पाण्याचे स्नान, मग एकांतात प्रार्थना मग इतर दिनक्रम ठरलेल्या पद्धतीने होत असे. रमाबाईंची ही पद्धत आश्रमवासिनीला शोभणारी होती. 'मुक्तिमिशन' मधील जीवनपद्धतीच आश्रमाला शोभणारी होती. तेथील प्रार्थनापूर्ण पवित्र वातावरण, ज्ञानसाधना, कार्यपद्धती, सेवेचे अधिष्ठान आश्रमातल्यासारखेच होते. आपल्या आईवडिलांबरोबर रमाबाईंनी असेच जीवन कंठिलेले होते. परदेशातून आल्यानंतरही रमाबाईंनी जी 'सदने' उघडली. त्यात त्यांनी असेच वातावरण ठेवले. इमारतींची रचना रमाबाईंनी इंग्लंड-अमेरिकेतल्या इमारती व मठासारखी व कार्यपद्धती जरी संन्यासिनींसारखी उचलेली होती तरी एकूण वातावरणाबाबत पाश्चात्य आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम 'मुक्तिसदन' व 'शारदा सदन' मध्ये झालेला होता.

रमाबाई आश्रमातील प्रत्येक मुलीच्या गालाचा मुका घेत असत. फक्त आपल्या मुलीचा, मनोरमेचा मुका घेणं रमाबाईंना योग्य वाटत नसे. 'शारदासदन' मध्ये तेव्हा साऱ्या बालविधवाच होत्या. आईच्या प्रेमापासून आपण वंचित राहतो आहोत, असे त्यांना वाटू नये म्हणून रमाबाई त्यांच्या 'आईच' झाल्या होत्या. 'मुक्तिमिशन' मधील साऱ्याजणी त्यांना आईच म्हणत असत. इंग्लंडमध्ये राहिल्याने तेथील मायलेकरांची प्रेम-ममता व्यक्त करण्याची पद्धआत रमाबाईंना योग्य वाटल्याने त्यांनी ती आत्मसात केली होती. मनोरमा, आपल्या आईला इंग्लंडमधून पत्र पाठवताना शेवटी लिहीत असे, 'मी तुला साठ प्रेमे व चुंबने पाठवते.''

विष्णु भास्कर गोवंडे यांचे वडिल व आई 'मुक्तिसदन' मध्ये दवाखान्यात काम करीत असत. एकदा विष्णु गोवंडे आपले आई-वडील व इतरांबरोबर सकाळीच रमाबाईंना भेटायला गेले होते. लहानग्या विष्णूला, बाईंच्या गालाचा मुका घेताना ओशाळल्यासारखे झाले. तेव्हा रमाबाईंनी त्याला जवळ बोलावले व म्हणाल्या, 'अरे शंखा! माझा मुका घेताना तुला संकोच का वाटतो? मी तुझ्या आईसारखी आहे. तुला तुझ्या

आईने तिचा मुका घेण्यास शिकविले नाही का?' त्यावेळी ते एकदम गप्प राहिले होते. मुका घेण्याची ही इंग्रज पद्धीत रमाबाईंनी अंगवळणी पाडून घेतली होती. काही चांगल्या, परदेशी संस्कृतीचे अनुकरण रमाबाईंनी अवश्य केले होते. परंतु आपल्या भारतीय संस्कृतीचा त्यांना कधीच विसर पडला नाही. 'आई' पणाचे जैविक व शारीर नाते नसतानाही, अनाथांची आई होणे त्या, पदाला पात्र होणे, हे भारतीय तत्त्वज्ञांनी सांगितलेल्या कर्तव्य भावनेचेच उदाहरण, रमाबाईंनी घालून दिले होते. विशेष म्हणजे ही कर्तव्यभावना उत्स्फूर्त आहे. लादलेली नाही आणि तो या भारतीय भूमीचा गुण आहे.

'मुक्तिसदन' च्या आवारातील प्रार्थनामंदिराची रचना क्रुसाच्या आकाराची होती. दोन हजार माणसे बसू शकतील इतके ते प्रशस्त होते. प्रार्थनेसाठी सर्वजण भारतीय बैठक घालून जमिनीवर बसत असत.

धर्मांतरावेळी, म्हणजे बाप्तिज्मा देण्याचा विधी करताना बहुतेक ठिकाणी धर्मांतर करणाऱ्याच्यावर कपाळावर एखाद्या वाटीतील थोडे पाणी लावतात आणि काही पवित्र वचनांचा उच्चार केला जातो. परंतु अमेरिकेत गेल्यावर बॅप्टीस्ट (Baptist) लोकांचा धर्मांतर करण्याचा विधी पंडिता रमाबाईंनी पाहिला आणि तो त्यांना फार पसंत पडला. त्याप्रमाणे केडगावातही धर्मांतराचा विधी करण्यासाठी रमाबाईंनी एक लहान हौद बांधला. ज्यांना धर्मांतर करावयाचे असेल त्यांनी या पाण्याने भरलेल्या हौदात बुडी मारावयाची असे. येशू ख्रिस्ताचा मावसबंधू जॉन डी बॅप्टीस्ट याने येशूला जॉर्डन नदीत असा बाप्तिज्मा दिला होता. खरं म्हणजे जॉन डी बॅप्टीस्ट याने तो विधी केलेला असल्याने त्या विधीला बॅप्टीझम, वा बाप्तीज्मा असे म्हटले जाते. मराठीत त्याला 'स्नानसंस्कार' विधी म्हटले जाते. पाण्याच्या हौदात बुडी मारणे व भारतीय साधुसंतांनी तीर्थक्षेत्री स्नान करणे, शुचिर्भूत होणे, नवीन जीवन प्राप्त होणे यात रमाबाईंना साम्य वाटले असावे व ही पद्धती त्यांनी स्वीकारली असावी. शरीर व मनाने शुद्ध

होऊन परमेश्वराशी एकरूप होण्यास सिद्धा झाल्याचा अनुभव आपल्या माता-पित्यांबरोबर तीर्थक्षेत्री फिरत असताना रमाबाईंनी घेतलाच होता.

प्रभुभोजनविधीबाबतही पंडिता रमाबाईंनी अशीच भारतीय पद्धती अवलंबिलेली होती. या प्रसंगी धर्मगुरू वा मिशनरी पाव कापून त्याचे लहान लहान तुकडे करून देत व द्राक्षरस वा सौम्य अशी पोटवाईन वापरीत. ख्रिस्ताचे बलिदान, त्याचे शरीर व रक्त याचे त्यातून केले जाते. रमाबाईंनी यात बदल केला. त्यांनी पावाच्या तुकड्याच्या जागी पोळीचे तुकडे आणि द्राक्षारसाच्या ऐवजी मनुका भिजत घालून व कुस्करून तयार केलेले एक गोड पेय वापरण्यास सुरूवात केली. इंग्लंडमध्ये असताना रमाबाईंना सिस्टर जिराल्डीनने लॅटीन अक्षरे कोरलेला एक क्रॉस दिला असता, रमाबाईंनी सांगितले. त्यावर संस्कृत अक्षरे कोरलेला क्रॉस मी घालीन. मातृभाषेविषयीचा त्यांचा स्वाभिमान जाज्वल्य होता. भारतीय संस्कृतीचाच सतत पाठपुरावा त्यांनी केलेला आहे.

रमाबाई पुनर्विवाह न करता राहिल्या. त्यांची केशभूषा व वेषभूषा भारतीय विधवेचीच राहिलेली आहे. विधवांची, बालविधवांची दुःखे त्यांनी पाहिली. परंतु या दुःखातून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे पुनर्विवाह असे रमाबाईंना कधीच वाटले नाही. त्यांनी पुनर्विवाहाची इच्छा प्रदर्शित केली असती; तर ती पूर्णत्वासही गेली असती. बंगालमध्ये व महाराष्ट्रातही सुधारकी लोकांत रमाबाईंची ऊठबस होती. धर्मांतरानंतरही त्यांना इग्लंड-अमेरिका वा भारतातही एखाद्या भारतीय वा पाश्चात्य ख्रिस्ती पुरुषाशी विवाह करता आला असता. परंतु पुनर्विवाहाचा विचार रमाबाईंनी कधी केला नाही. बालविधवांसाठी कार्य हे आपले जीवित ध्येय, तसेच बिपीन बिहारींवर असलेली त्यांची निष्ठा व प्रेम, यामुळेही पुनर्विवाहाचा विचार बाईंनी केलेला दिसत नाही. तथापि आपल्या ‘सदना’ तील बालविधवांना, ज्यांना ज्यांना पुनर्विवाहाची संधी प्राप्त झाली त्यांना त्यांचा मार्ग त्यांनी खुला ठेवला. अण्णासाहेब कर्वे यांनी

‘शारदासदन’ मधील गोदूताई या बालविधवेशी पुनर्विवाह केल्याचे उदाहरण आहेच.

भूतदया हाही रमाबाईंच्या जीवनाचा मंत्र होता. पशुपक्ष्यांविषयी रमाबाईंना अपार कणव होती. फुलाफळांची झाड-रोपं लावून रमाबाईंनी ‘शारदासदन’ मुंबई, पुणे येथे व ‘मुक्तिसदन’ केडगाव येथे निसर्गरम्य वातावरण निर्माण केले होते. ‘मुक्तिसदन’ मध्ये ससे, कुत्रे, पोपट, कबुतरे असे अनेक प्राणी, पक्षी बाळगले होते. आपल्या लेखनकार्यातून वा अन्य कामातून मोकळीक मिळताच रमाबाई त्यांच्या अंगावरून आपला वत्सल हात फिरवीत असत.

‘युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त’ यात अमेरिकेतील व भारतातील भूतदयेच्या विलक्षण पद्धरतीचे मार्मिक वर्णन केलेले आहे. अमेरिकेत असताना, एकदा त्यांनी एक मुलगा कोंबडीचे पाय उलटे धरून घेऊन चाललेला पाहिला. रमाबाईंनी त्याला प्रश्न केला. “तुला जर कोणी उलटे करून घेऊ गेला तर ते तुला चालेल का ?”

अमेरिकेत उन्हाळ्याच्या दिवसात गुरांचे हाल पाहून त्या तळमळत असत. माणसाच्या पोटाचा, भुकेचा जाळ शमविण्यासाठी, त्यांना चरायला बाहेर काढलं जातंय् याचा त्यांना विलक्षण राग होता. ही ‘जिवंत भाजी’ आगगाडीच्या डब्यातून, भरून हजार कोसांवर पाठवली जातेय. नंतर ती कसायाच्या हाती सापडते, हे बघून त्यांचा जीव तुटत असे.

भारतातील भूतदयेचा प्रकार वेगळा होता. अमेरिकेचे लोक मनुष्येतर प्राण्यांना यातना देतात आणि आम्ही अशा प्राण्यांसाठी ‘पांजरपोळ’ घालतो. गोशाळा स्थापन करतो. ढेकूण, ऊवा, चिलटे, मुंग्या यांस मोठ्या दयेने मनुष्याचे रक्त देऊन त्यांचे पोषण करतो. सापाला दूध पाजून त्यांची पूजा करतो. पण मनुष्याच्या जीवांचे आम्हाला काही वाटत नाही. शेजारच्या घरी कोणी मेले तर आम्ही घराची दारे लावून बसतो. आमच्या बायका, नाना प्रकारचे रोग होऊन मरतात, पण इंग्रजांनी तंबी दिल्यावाचून आम्ही बायकांकरिता दवाखाने काढीत नाहीत.’ रमाबाईंनी

असा भारतीय मनोवृत्तीला फाटा देऊन सेवाकृत्ये करणाऱ्या इंग्रज व अमेरिकन लोकांचा आदर्श समोर ठेवला आहे. परंतु सेवा मात्र भारतीय लोकांचीच केलेली आहे.

पंडिता रमाबाईंना भारतीय बालविधवा व वाममार्गाला लागलेल्या स्त्रियांना सुरक्षित व सुसंस्कृत जीवन जगता यावे म्हणून कार्य करावयाचे होते. विधवांची स्थिती पाहून त्या तळमळत असत. मथुरेच्या जवळ वृंदावन गावी रमाबाई व त्यांच्या सोबत असलेल्या बाईंने वेषांतर करून काही दिवस वास्तव्य केले. तेथील एका बडव्याने त्यांना राहण्यासाठी एक गलिच्छ खोली दिली. या ठिकाणी तरुण विधवा वेश्या होऊन राहातात हे त्यांनी पाहिले. सात विधवांची मने वळवून त्यांना आपल्याबरोबर आणण्याचा प्रयत्नही रमाबाईंनी केला होता. परंतु या सात बाया पळून जाण्याच्या बेतात आहेत, असे समजताच त्यांना कोंडून ठेवण्यात आले. पंडिता रमाबाई तीर्थयात्रेसाठी आलेल्या नसाव्यात अशी त्या बडव्याला शंका आली, आणि त्याने ती खोली त्यांना खाली करायला लावली. तीर्थक्षेत्रीदेखील तरुण मुलींचा गैरवापर केला जातो व त्यांना वाममार्गाला लावले जाते हे त्यांच्या लक्षात आले होते. अशा राक्षसीवृत्तीच्या पुरुषांच्या कचाट्यातून मुलींचे संरक्षण करण्याचा प्रयत्न रमाबाईंनी गुजरात व मध्यप्रदेशातील दुष्काळग्रस्त भागातही केला होता. भारतीय स्त्रीला सन्मानाने जगता यावे यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज रमाबाईंनी प्रतिपादन केलेली होती. अशा मनोवृत्तीतून, दडपणातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना ख्रिस्तशिकवणुकीत सापडला होता.

आपल्या धर्मांतराबाबतसुद्धा रमाबाईंनी प्रथमतः आपल्या देशबांधवाशीच सल्ला मसलत केली. रेव्ह नीलकंठशास्त्री गोरे यांच्याकडून त्यांच्या अनेक शंकांचे निरसन झाले. सप्टेंबर १८८३ मध्ये रमाबाईंनी धर्मांतर केले, तेव्हा नीलकंठशास्त्री (नेहेम्या) गोरे पुण्यात होते. रमाबाईंनी आपण धर्मांतर केल्याचे त्यांना पत्राने कळवले. सदाशिव पांडुरंग केळकर या सुहृदाला पत्र लिहिताना रमाबाई म्हणतात, ‘जुलाई

महिन्यात फादर गोरे यांनी ख्रिश्चन धर्माविषयी, मला ज्या शंका होत्या, त्यांचे पत्रद्वारे संयुक्तिक (माझ्या मते) निरसन केले. त्यावरून माझा त्या धर्मात पूर्ण विश्वास झाला आणि गेल्या ता. २९ सप्टेंबर रोजी मी त्या धर्माचे ग्रहण केले. हे ऐकून तुम्हास बरेच वाईट वाटेल. पण मी या देशात आले म्हणूनच मी धर्मांतर केले आणि एरवी केले नसते असे (तुम्ही तरी निदान) म्हणू नका. मी ख्रिश्चन धर्माच्या विरुद्ध होते (झांकून नव्हे; पण उघड, याचा अनुभव पुष्कळ मिशनरी लोकांस असेल) हे तुम्हांस माहीतच आहे. असे धर्मांतर केले म्हणून माझे देशांतर होत नाही आणि माझ्या देशावरची माझी प्रीतीही कमी होणार नाही. अशी आशा आहे आणि तसे होणे खुद्द ख्रिश्चन धर्माच्याच विरुद्ध आहे.' १० ऑक्टोबर १८८३ रोजी रमाबाईंनी लिहिलेले हे पत्र १५ नोव्हेंबर १८८३ च्या 'ज्ञानोदय' अंकात प्रसिद्ध झालेले आहे. धर्मांतर म्हणजे फक्त मतांतर असते आणि देशांतर नसते हेच रमाबाईंनी ठासून सांगितले.

आसेतुहिमाचल असा जो रमाबाईंचा अनवाणी, पायी-पायी प्रवास झालेला होता त्यामुळेच त्यांची या मातीशी, मातृभूमीशी घट्ट नाळ जुळलेली होती. ती परदेशप्रवासाने कणभरही तुटली नाही. ज्या मातीतून आपण जन्मास आलो त्या मातीची सेवा करण्याचे कर्तव्यकर्म त्यांनी यशस्वीपणे पार पाडले.

रमाबाई इंग्लंडच्या प्रवासास निघाल्या; त्यावेळी आपल्याला निरोप देण्यास आलेल्या लोकांच्या डोळ्यातील अश्रू पाहूनच त्यांनी आपल्या स्वदेशजनांसाठी कार्य करण्यासाठी मातृभूमीत परत येण्याचा चंग बांधला होता व ती गोष्ट निरंतर आपल्या स्मरणात ठेवली होती. म्हणूनच इंग्लंडमधील वैभवाने त्यांचे डोळे दिपले नाहीत व त्या मातृभूमीला विसरल्या नाहीत. त्यासंबंधीच्या प्रश्नाला उत्तर देताना रमाबाईंनी म्हटले आहे, 'आपली आई गरीब असून म्हातारी आहे, म्हणून तिला टाकून दुसऱ्या श्रीमंत, तरुण आणि सुस्वरुप बाईला आईप्रमाणे सन्मान देणारे

मनुष्य, मनुष्यरूपी राक्षस असे म्हटले पाहिजे.' (इंग्लंडचा प्रवास, पृ. १५)

इंग्लंडच्या हवामानानुसार त्यांना आपला पोशाख करावा लागला. परंतु त्याबाबतीतही रमाबाई लिहितात, 'या थंड प्रदेशात आल्यावर आमच्याने स्वदेशी पोशाख ठेववत नाही, तरी आमच्या हृदयात स्वाभिमान सतत जागृत आहे.' (पृ. ३६) हा स्वाभिमान आपल्या मातृभूमीत परत येऊन इकडच्या संस्कृतीनुसार आहार-विहार ठेवून, येथील लोकांची मनोभावे सेवा करून त्यांनी भारतीयांच्या आणि पाश्चात्यांच्याही नजरेस आणून दिला.

## निसर्गप्रेम

पंडिता रमाबाईंची भूमिका समाजशिक्षकाची होती. सामाजिक प्रबोधन करताना, स्त्रीला एक व्यक्ती म्हणून स्थान व शिक्षण मिळावे असा त्यांचा प्रयत्न राहिला. स्त्री आणि तिचे मानसिक, कौटुंबिक व सामाजिक पर्यावरण विशुद्ध असण्याचा विचार, स्त्रीला गौण लेखण्याच्या काळातही रमाबाईंनी बोलून दाखविला होता. हा विचार आजच्या स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या चळवळींचा, त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा व अग्रक्रम असलेला भाग आहे. आज पर्यावरण रक्षणाच्या काळात पृथ्वी आणि स्त्रीमधील साम्य दाखविताना, तिच्या निर्मितीक्षमतेला व पर्यायाने तिच्या संरक्षणाला महत्त्व दिले जात आहे. पृथ्वी वाचवायची असेल; तर पृथ्वीवरील जल, जंगल, जमीन वाचवली पाहिजे. जर माणूस वाचवायचा असेल तर नवीन जीव जन्माला घालणारी स्त्री वाचवली पाहिजे. त्यासाठी तिचे मानसिक-शारीरिक-कौटुंबिक-सामाजिक पर्यावरणही सुयोग्य राखले पाहिजे. तरच जन्मास येणारा घटक निरोगी निपजेल. पंडिता रमाबाईंनी आपली लेखणी-वाणी आणि कृति यातून नेमका हाच विचार समाजाला दिला. निसर्गाविषयी आत्मीयता, भूतदया यातूनही त्यांनी हे विचार दाखवून दिले. जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोणाचाही व्यक्तिमत्त्व विकासाच्या कामी कसा उपयोग होतो, हेही त्यांनी सांगितले.

'स्त्री-धर्मनीती' या आपल्या प्रथम व मराठी ग्रंथात स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या गोष्टी सांगताना, रमाबाई लिहितात, 'पाया चांगला दृढ बांधल्यावाचून घर उभारले; तर ते फार दिवस टिकत नाही. ज्याप्रमाणे पाणी दुधात मिसळले असता, पाण्याच्या अंगी दुधाचे गुण येतात व तेच पाणी चिखलात मिसळले; तर चिखलाचा गुण संपादिते. विशेषकरून बालक व स्त्रिया यांची मने पांढऱ्या व वस्त्रासारखी स्वच्छ व कोवळ्या वेळूच्या दांड्यासारखी मृदू असतात. अशा स्थितीत त्यावर पहिल्याने जो

रंग बसवावा, तो पक्का वठतो आणि त्यांस जशी वळवावी तशी ती वळतात.'स्त्रीची संवेदनशीलता आणि संस्कारक्षम मनाचा आविष्कार घडविताना निसर्गातील, झाडा-पाना-फुलांची उदाहरणे त्या देतात. पुढे त्या म्हणतात, 'मनुष्याचा स्वभाव असा आहे, की, चांगले गुण त्यास लागणे फार कठीण पडते. पण दुसऱ्याचे वाईट गुण मात्र अगदी थोड्याशा वेळात जडतात. बाभळीच्या वनात एखादा चंदनवृक्ष असला आणि तेथे वणवा लागला; तर चंदनवृक्ष हा फार चांगला आहे; म्हणून काही वणव्याच्या हातून सुटका होणार नाही. काटेरी झाडांबरोबर त्यासही जळून जावे लागेल. स्वच्छ पाण्यात घाणेरडे पाणी मिसळले; तर ते तेव्हाच घाणेरडे होते. पण घाणेरड्याचे चांगले करण्यास फारच खटपट पडते.' मर्यादशील जीवनाचे महत्त्व रमाबाई अशारीतीने पटवून देतात.

तारूण्यात माणूस हुरळून जातो. तारुण्य चिरकाल राहाणारे आहे, अशा भ्रमात तो असतो. पंडिती वळणाच्या भाषेत परंतु उपदेशकाच्या भूमिकेत स्त्रियांना मार्गदर्शन करताना रमाबाई म्हणतात, 'तुमच्या शरीररूपी ओघांस येणारे यौवन मदरुपी पाणी भराभर येऊन, धर्मसेतूस वाहवून नेण्यास समर्थ होणार नाही. अशी तजवीज ठेवा. तुम्ही आपल्या आयुष्यसरोवरात अक्षयसच्चरित्ररूपी पाणी साठविण्याकरिता, त्या सरोवराच्या सभोवती मिताचरणरूपी बांध घाला, म्हणजे सद्गु,णीरूपी सुंदरसुंदर कमळे त्या सरोवरात फुलतील व त्यांस एक अनिर्वचनीय शोभा येईल.' बाह्यरूपापेक्षा गुणाला असलेले महत्त्व व चारित्र्य हा आपल्या विकासाचा पाया आहे हे रमाबाई वारंवार सांगतात.

गर्भवती स्त्रीची काळजी घेण्यासंदर्भात तिचे कौटुंबिक, मानसिक, सामाजिक व आजुबाजूचे पर्यावरण प्रदूषणविरहीत ठेवण्यावर रमाबाई भर देतात, तेव्हा त्यांचे हे विचार त्या काळी नवेच वाटले असणार. हेच उद्दिष्ट समोर ठेवून भारतीय स्त्रियांसाठी स्त्रीवैद्यांची आवश्यकता रमाबाईंनी प्रतिपादन केलेली होती. भारतीय स्त्री आपली शालीनता व संकोची वृत्तीमुळे पुरुष वैद्यांकडे जाण्याचे टाळत असे. यामुळे अनेक गर्भवती

स्त्रियांचा मृत्यू झालेला होता. रमाबाई लिहितात, ‘मग या देशातील आयांची प्रकृति जर निस्तेज असली; तर त्यांची संताने कशी तेजस्वी होतील? वैद्यकशास्त्रात असे सांगितले आहे की, गर्भोत्पत्तीचे वेळेस स्त्री-पुरुषांची आकृति-प्रकृति मनोभाव वगैरे जसे असतील; तसेच त्यापासून झालेल्या संतानास प्राप्त होतात.’ (पृ. १११) ‘आमच्या देशातील स्त्रीपुरुषांना नवीन, सुदृढ व निकोप मनाची पिढी निर्माण करायची असेल; तर कसे वागायला हवे, व विशेषतः स्त्रियांना दास्यवृत्तीने वागविले; तर त्यांचे मन मलिन निरुत्साही, तेजोहीन आणि असत्यपरायण राहिले; तर मुलांवर परिणाम होईल.’ म्हणून पुरुषांनी स्त्रियांना प्रेमाने व आदराने वागवायला हवे, हे रमाबाई स्पष्टपणे व निःसंकोचपणे सांगतात. हा आधुनिक विचार त्यांनी त्याकाळी निर्भीडपणे मांडला. कारण बालविवाहितांच्या किंकाळ्या बालविधवांचे आक्रोश व सांसारिक स्त्रियांना होणारी मारझोड त्यांनी पाहिलेली आहे. ‘युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त’ या पुस्तकात त्या लिहितात, ‘आम्ही गाईला मातेसमान समजून तिच्या पाया पडतो पण आमच्या बायकांना, आमच्या मुलांच्या आयांना आम्ही मरेमरेपर्यंत मारतो. (पृ. १६१) या आगळ्या स्वरूपाच्या भूतदयेबद्दल रमाबाईंच्या मनात शंका आहे.’

घरात स्वच्छता व आजुबाजूचा परिसर स्वच्छ व सुगंधित असण्यावरही रमाबाईंचा भर आहे. त्या म्हणतात, ‘घरासमोर किंवा अंगणात, परसात सुंगधित पुष्पांची गुलाब, मोगरा, जाई, जुई, बकुळी, पारिजातक, तगर आणि तुळशी, दवणा, मरवा इ. झाडे जागा असल्यास पेल्यांतून अगर भुईवरून चांगली दिसतील अशी लावावी. एका झाडाखाली एक अशी लावू नयेत व त्याच्या खाली मळकट पदार्थ टाकणे वगैरे अगदी होऊ नये. फुलांच्या सुगंधाने वायुतील दुर्गंधाचा नाश होतो आणि वनस्पतीच्या योगाने वारा थंड व निरोगी असतो. तो नाकावाटे आपल्या शरीरात गेला म्हणजे मन प्रसन्न होऊन अंगात हुषारी येते. (स्त्रीधर्मनीती पृ. ९२).

रमाबाईंची सौंदर्यकल्पना केवळ निसर्गवर्णनापुरतीच मर्यादित नव्हती; तर तिचा समग्र जीवनसौंदर्याशीच संबंध होता. मानसिक स्वास्थाशी त्याचा संबंध होता, हे रमाबाईंनी दाखवून दिले. मुंबई व पुण्यातील 'शारदासदन' तसेच केडगावातील 'मुक्तिसदन' यांची एकूण बांधणी व भोवतालचा परिसर प्रसन्न ठेवण्यात, निसर्गाच्या सहवासात ठेवण्यात रमाबाईंचा हाच उद्देश होता.

मुंबईच्या हवेपेक्षा पुण्याची हवा अधिक चांगली; म्हणून पुण्यात विरोधक असतानाही रमाबाईंनी मुंबईतील 'शारदासदन' दीड वर्षांनी म्हणजे नोव्हेंबर १८९० मध्ये पुण्यात हलविले. मुंबईत गर्दी व महागाई वाढू लागली होती. प्रदूषण वाढू लागले होते. पुण्यातील हवा आपल्या मुलींना अधिक मानवेल असे रमाबाईंना वाटले. शिवाय घराच्या आसपास बाग असावी असेही रमाबाईंना वाटत होते. कृष्णाबाई गद्रे यांनी 'स्तुतिसुमने' या आपल्या आत्मकथनात पुण्यातील 'शारदासदन' चे वर्णन करताना म्हटले आहे- 'अमेरिकेतील लोकांच्या उदार साह्यामुळे पुण्यातील अगदी वस्तीमध्ये एक बंगला खरेदी करण्यात आला. काय त्या बंगल्याची शोभा व काय तो सुंदर फुलांनी श्रृंगारलेला बगीचा. जिकडे पाहिजे तिकडे मोकाट फिरण्याची आम्हाला मुभा. दिवाणखानादेखील आमची बैठकीची जागा. सुंदर कोचा-खुर्च्यांवर बसून गप्पा माराव्यात. बागेत जाऊन जाई, जुई, मोगरा, चमेली, बकुळी व मधुमालतीच्या वेण्या गुंफून केसांवर लादाव्यात. रमाबाईंनी आम्हाला फुलांची, पक्ष्यांची व झाडांची माहिती देऊन दुर्बिणीतून त्यांचे निरीक्षण करण्यास शिकवावे, काय ते लाड! अशा सुंदर वातावरणात आपले दिवस घालवायाला कोण बालविधवा येणार नाही? चित्रे व पुस्तके ह्यांचा हवा तेवढा संचय. कधी कधी रमाबाई स्वतः पहाटेस उठून आम्हाला आगाशीवर नेऊन नक्षत्रे व तारे दाखवीत व त्यांची नावे वगैरे आम्हाला मोठ्या आवडीने शिकवीत.' असे निरोगी व मोकळे वातावरण ठेवण्यामागे कौटुंबिक व सामाजिक छळवादाने ज्यांचे जिणे नरकतुल्य झाले आहे, त्यांना माणुसकीचा

जिव्हाळा पटवून देण्याचा त्यांचा मानस होता. मुलींना जगाची, देवाच्या अद्भूत करणीची माहिती करून द्यायची होती व विशेष म्हणजे प्रसन्न मनाने जीवन जगण्यास सिद्ध होता यावे हा उद्देश होता.

लंडनमधील उद्योगी लोकांनी फुलवलेल्या बागा सुंदर, अर्ध्या फुललेल्या गुलाबासारख्या लहानलहान मुली बागेत झाडांना पाणी घालताना त्यांनी पाहिल्या होत्या. हे पाहताना 'महाभारता' तील पवित्र ऋषींचे आश्रम व वनशोभा वाढविण्यात गुंतलेल्या ऋषिपत्नी आणि ऋषिकन्यांची आठवण ही त्या सांभाळीत होत्या. रमाबाईंनी आपल्या बालपणाचा बराचसा काळ निसर्गाच्या सहवासात, रानावनातील वास्तव्यात व्यतीत केला होता. संस्कृत साहित्य व धर्मग्रंथातील निसर्गसूक्ते यांचे श्रवण व वाचन व निसर्गाच्या सहवासातील वास्तव्यस्थळे यातूनच त्यांची जीवनाकडे बघण्याची सौंदर्यशील, स्वागतशील व सकारात्मक दृष्टि निर्माण झालेली असावी. हे भान त्यांनी आपल्या परिवर्तनशील आयुष्यात कायम ठेवले.

१८९७-९८ च्या दरम्यान केडगावच्या 'मुक्तिसदन' मध्ये जेव्हा रमाबाईंनी स्थलांतर केले; तेव्हा तेथेही असेच प्रसन्न वातावरण निर्माण केले. 'मुक्तिमिशन' परिसरातील माळरानावर रमाबाईंनी प्रसन्नतेचा व उद्यमशीलतेचा हिरवा मळा फुलवला. पुण्यात प्लेगचा कहर झाला असताना त्यांना 'शारदासदना' तील मुलींना रातोरात केडगावला हलवावे लागले खरे; परंतु 'मुक्तिसदन' व त्या आवारातील, तसेच मुलींची वैयक्तिक स्वच्छता, प्रसन्नता यामुळे तेथे प्लेगचा प्रादुर्भाव व प्रसार झाला नाही. किंबहुना याच त्यांच्या वृत्तीमुळे रमाबाईंनाही कधी विकार-आजार यांनी ग्रासले नाही. यालाच रमाबाई चित्शक्तीचा आविष्कार म्हणत असाव्यात. हिरव्या झाडांच्या व प्रदुषणविरहीत वातावरणात राहाण्याचा तो परिणाम होता. रमाबाईंनी 'मुक्तिमिशन' मधील सर्वांनाच निसर्गाचा परिचय करून घेणे व त्याच्या सहवासात राहाणे हा मंत्र दिला होता. आनंद विठ्ठल गोवंडे यांनी 'मुक्तिमिशन' मधील मुलांना एक काम

दिले. त्यांना एका फडक्याची झोळी करायला सांगितली व म्हटले, 'तुम्ही जा. आणि आवारातील वनस्पती गोळा करून आणा.' मुले आल्यावर रमाबाईंनी काही 'कॉपीबुके' मागवली. त्यात ती एकेक वनस्पती एकेका पानावर लावली व एका अरूंद पट्टीने चिकटवून एक वही पूर्ण करून दिली व अशा रीतीने वह्या पूर्ण करायला त्या मुलांना सांगितले. त्या प्रत्येक वनस्पतीचे नाव लिहून व ती वनस्पती परमेश्वराने आपल्या अगाध लीलेने कशी उत्पन्न केली हेही त्यांनी त्या मुलांना समजावून सांगितले.

'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' असे रमाबाईंचे जीवन होते. 'स्त्रीधर्मनीती' त त्या म्हणतात, 'गुणसंपादन करण्यात आपले लक्ष असले पाहिजे 'तुम्ही दागिने घातले आणि गावभर मिरवत फिरला; तरी तुमच्यात गुण नसला; तर कोणी तुमच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहावयाचे नाही. जर तुमच्यात गुण असला; तर तुम्ही कोपऱ्यांत का बसून राहाना, पण सर्व लोकांस तुम्ही आवडाल. शेवरीची फुले दिसण्यात फार छानदार आहेत, पण त्यास कधी कोणी सुगंधी फुलांच्या तुऱ्यात घातलेले तुम्ही पाहिले आहे काय? बकुळीची फुले अगदी लहान व दिसण्यात फारशी सुंदरही नसतात पण त्यांच्या अंगी सुगंध हा गुण आहे. म्हणून ती वाळून अगदी कोळ झाली तरी लोकांचे त्यावर प्रेम असते.' गुणांचे महत्त्व रमाबाई जाणतात. कारण तेच नेमके इतरांत संक्रमित होत असतात. रूपापेक्षा गुणांचा प्रभाव अधिक आहे याची त्यांना जाणीव आहे. विशेष म्हणजे त्याचे वर्णन करण्यासाठी निसर्गातील फुलझाडांचा, फुलांचा दृष्टांत त्या देत जातात.

बालकांवर संस्कार घडविण्याच्या व शिक्षण देण्याच्या बाबतीत स्त्रियांची गरज व महत्त्व पंडिता रमाबाई जाणत होत्या. स्त्रीशिक्षणाबाबत समाजाचा असा एक आरोप होता, की, स्त्रिया, विविध क्षेत्रात शिक्षण घेऊ लागल्या; विशेषतः वैद्यक व वकिली शिक्षण घेऊ लागल्या; तर मुलांवर व कुटुंबावर दुर्लक्ष होईल. यावर रमाबाई लिहितात, 'वैद्यक विद्येने स्त्रियांमधील नाजुकता जाईल, ही भीती होती. परंतु रोग्यांची शुश्रुषा

करण्यात स्त्रिया जितक्या कुशल आहेत; तितके पुरुष नाहीत. असा लोकांस पक्का अनुभव आला आहे. (युनायटेड स्टेटसची लोकस्थिती पृ २४७) स्त्रिया डॉक्टर, व वकिल झाल्या; तर त्यांना स्वजातीच्या स्त्रियांचे दुःख व प्रश्न अधिक तीव्रतेने कळतील, असे रमाबाईंचे मत होते. शिवाय स्त्रिया, सामाजिक, राजकीय क्षेत्रात आल्या; तर तेथील पर्यावरण वातावरण विशुद्ध बनत जाते याविषयी त्या म्हणतात; 'स्त्री वकील जेथे आहेत; अशा न्यायसभांतून सर्व पुरुषमंडळी त्यांचा मान योग्य रीतीने राखतात. इतकेच नव्हे; तर न्यायगृहात तंबाकू ओढणे, अश्लील भाषण करणे वगैरे अयोग्य वर्तन कोणी करू नये, असे जे सर्वसाधारण नियम आहेत ते, स्त्रिया न्यायगृहात गेल्यापासून अधिक उत्तम रीतीने पाळले जात आहेत.' स्त्रियांच्या उपस्थितीमुळे सामाजिक जीवनात पुरुष सभ्यतेने वागतात, असा रमाबाईंचा अमेरिकेतील अनुभव होता.

बायकांच्या क्रुसेडांचा (धर्मयुद्धांचा) संदर्भ देत रमाबाई म्हणतात , 'पुरुषांच्या क्रुसेडांचा उद्देश लोकांचे गळे कापून, मनुष्य रक्ताचा सडा सर्व पृथ्वीवर पाडून धर्माच्या नावाला कलंक लावण्याचा होता. पंधराव्या शतकातील बायकांच्या क्रुसेडांचा उद्देश लोकांचे प्राण वाचवून, त्यांना नरकातून ओढून काढून शांती आणि आनंद यांची स्थापना करणे हा होता. (युनायटेड स्टेटसची लोकस्थिती पृ. २९१) स्त्रियांची ही विधायक व जीवन वाचविण्याची प्रवृत्ती रमाबाईंना मोलाची वाटते.

इंग्लंड-अमेरिकेतील कौटुंबिक वातावरण व भारतीय समाजातील कौटुंबिक वातावरण यातील तफावत रमाबाईंना ठळकपणे जाणवत होती. त्या म्हणतात, (अमेरिकेतील) आई, ती आपल्या लहानग्या मुलास धर्मग्रंथातील किंवा इतिहासातील आणि इतर पुस्तकांतील गोष्टी वाचून दाखवून त्यांचे मनोरंजन करते. उत्तम व प्रसिद्ध स्त्रियांची चरित्रे ऐकून आपल्याला कधी ना कधी त्यांच्यासारखे होता येईल अशी आशा धरितात. त्यांस आमच्या तिकडच्याप्रमाणे सामाजिक बालविवाह रीतीच्या जुलूमामुळे होणारा मातृवियोग आणि सासुरवास भोगावा लागत नाही.

निराशेची आणि दुःखाची ज्वाला अमेरिकन मुलीच्या हृदयातील आशांकुराला जाळून टाकीत नाही.' भारतातील कुटंबजीवन अमेरिकेतील प्रेमळ कुटुंब-जीवनासारखे झाले; तर भारतीय समाजाच्या मानसिकतेत कितीतरी विधायक बदल होतील. एक व्यक्ती म्हणून जगण्याची संधी मिळेल, असे रमाबाईंचे स्वप्न होते.

अमेरिकेतील निसर्ग-सौंदर्यानेही रमाबाईंच्या चित्तवृत्ती पल्लवीत केल्या होत्या. तेथील हेमंत ऋतूचे वर्णन करताना रमाबाई लिहितात, 'जिकडे पाहावे तिकडे उंच उंच पर्वतशिखरे आकाशाला डोकी भिडवून उभी आहेत. त्यावरील नाना जातीचे देवदार वृक्ष इंद्रनील मण्यासारख्या आपल्या पालवीच्या रंगाने पर्वताला जसे काय नीलमेघांचे आवरण घालून झाकीत आहेत, त्यांच्यामध्ये जिकडे-तिकडे विखुरलेल्या नाना रत्नांसारखे चूर्ण, मेपल, ओक आणि दुसरी पुष्कळ झाडे, नाना प्रकारच्या वेली, लहान झुडुपे आपल्या पानांच्या तांबड्या, पिवळ्या, हिरव्या रंगांनी त्या वनभूमीला चित्रविचित्र करीत आहेत. बाजूने पर्वतश्रेणीतून, डोंगराच्या पायथ्याजवळून स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याची नदी खळखळ वाहत आहे. तीत सूर्यप्रकाश प्रतिबिंबून त्या पाण्याला कोठेकोठे वितळलेल्या रूप्याचे सादृश येत आहे. (युनायटेड स्टेटसची लोकस्थिती पृ १३९) रमाबाईंची जीवनाकडे बघण्याची सकारात्मक दृष्टि निसर्गातील वास्तवातीलाही सौंदर्य टिपताना दिसते.'

न्यूयॉर्कमधील एका गृहस्थाने रमाबाईंना विचारले, "आमच्या देशात अतिनिंद्य असे तुमच्या पाहाण्यात काय आले?" तेव्हा रमाबाई म्हणाल्या, "मित्रा, तुमच्या देशातील दोष पाहायला मी आले नाही. तुमच्या गुणांच्या शोधात मी आहे." बालपणी त्यांना अनभिज्ञ असलेली ही गुणग्राहक दृष्टि. त्यामुळेच आपल्या कुटुंबातील आप्तजनांचा चिरवियोग त्या निभावून नेऊ शकल्या असाव्यात. आपल्या पतिनिधनानंतर लिहिलेल्या 'स्त्री-धर्मनीती' या ग्रंथात पतिनिधनाचा सूचक उल्लेख व त्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिसतो. त्या लिहितात, 'कोणाचे अत्यंत प्रिय असे एखादे मनुष्य

गेले तर त्याबद्दल शोक न करून संतोषच मानावा. कारण पूर्वी आपले प्रिय मनुष्य असता, आपले सर्व प्रेम त्याचेच ठायी एकवट होऊन राहिले होते. म्हणून निर्मल अंतःकरणाने त्या प्रेमाचा प्रसार इतरांवर करण्यास सवड राहिली नसती.' आपल्या आयुष्यातील अशा प्रकारचे दुःख रमाबाईंनी सामाजिक कार्याच्या प्रेरणेत परिवर्तित केले. 'इंग्लंडचा प्रवास' या ग्रंथांत तर त्या म्हणतात, 'माझ्यासारखे सुखी मनुष्यही ह्या जगात फार कमी असेल. कारण मला जितके सुखाचे स्वरूप समजते, तितके दुसऱ्याला समजत नाही असे मला वाटते. (त्यावरून मला तुम्ही अभिमानी समजू नका.) कारण ज्या मनुष्याने पुष्कळ दुःखे पाहिलेली असतात, त्यालाच सुखाची किंमत काय ती समजत असते. कोणीही आपल्यास दुःख किंवा विपत्ती असावी, असे इच्छित नाही हे खरे, पण माझी गोष्ट तशी नाही. पांडवांच्या मातुःश्रीने म्हटले होते तसे मी ईश्वराला म्हणते; 'विपदः सन्तु न शाश्वत तत्रतत्र जगकत्पते' म्हणजे 'हे जगत्पते! तू मला सर्वदा व सर्वस्थळी विपत्तीतच ठेव. कारण मला त्यातच सुख आहे.' (पृ.१-२) अशा प्रवृत्तीमुळेच जगातील व आपल्या जीवनातील सौंदर्याचा उत्कटपणे अनुभव त्या घेऊ शकल्या.

पंडिता रमाबाईंच्या प्रसन्नवृत्तीचा आणखी एक आविष्कार म्हणजे त्यांच्या गंभीर व्यक्तिमत्त्वाला असलेली विनोदी वृत्तीची झालर. रमाबाई इंग्लंडला जाण्यास निघाल्या; तेव्हा त्यांच्यावर अनेक प्रकारचे आक्षेप होते. त्यांच्या आक्षेपांना उत्तर देताना रमाबाई म्हणतात, 'वयोवृद्ध झाल्यावर मनुष्यात वजन वाढते, हे अचलमिचल बाईंना पाहिल्यावर कोणासही खरे वाटण्याजोगे आहे. एक दिवस सदरहू बाई आणि मी गाडीत बसून फिरावयास गेलो होतो; तेव्हा त्या गाडीत बसताक्षणीच गाडी मोडते की काय, असे मला भय पडले होते. पण वजन वाढण्यास ज्ञान जितके कारणीभूत आहे तितके वयोवार्धक्य आहे, असे म्हणणे सर्वथा खरे ठरत नाही. पुण्यांत रस्त्यांतून पायी फिरणाऱ्या वामनरावांचे वय ६५ वर्षांपेक्षाही जास्त आहे. परंतु त्यांची प्रकृती पाहून त्रेता युगातील

रामानुचर हनुमान मरून, हे कलियुगात वामनराव झाले आहेत, असे वाटल्यावाचून राहात नाही. (इंग्लंडचा प्रवास पृ. १७) पंचविशीच्या आतल्या एका तरूणीची ही समज आणि तिने समाजाला दिलेली ही नर्मविनोदी उत्तरे रमाबाईंच्या निधडेपाणाची आणि नकारात्मकता सकारात्मकतेत बदलून घेण्याच्या वृत्तीची दर्शक आहेत.

रमाबाई जेव्हा माल्टा शहर बघायला गेल्या तेव्हा रस्त्यावरील अनेक लोक काळ्या पोशाखात होते. त्यांच्या नजरेतून स्वतःचा ‘अवतार’ वर्णन करताना त्या म्हणतात, ‘आम्ही त्या शहरात गेलो, तेव्हा सगळी माणसे आमच्याकडे टक लावून पाहू लागली. त्यांना वाटले असेल, हे पांढऱ्या कापडाने वेष्टिलेले नवीन पदार्थ कोणत्या प्रदर्शनाकरिता कोणी येथे पाठविले आहेत, कोणास ठाऊक (पृ. ३७) ही त्यांची विनोदीवृत्ती त्यांचे दुःख हलके करण्यास कारण झाली आहे.

रमाबाईंचे निसर्गविषयक प्रेम आणि भूतदयावादी दृष्टि हातात हात घालून जाताना दिसते. आपला ‘नखरा’सजविण्यासठी अमेरिकेतील लोक पाखरे-पक्षी यांचा बळी घेतात, ही गोष्ट रमाबाईंना अजिबात रूचत नाही. प्राण्या-पाखरांचे पंख किंवा मारलेली सगळीच पाखरे, त्यांच्या शरीरात पेंढा भरून, ती टोप्यांवर लावण्याची चाल आहे. ह्या दुष्ट चालीच्या पायी, लक्षावधी कोट्यवधी पाखरांचे प्राण बळी पडून दुष्ट पारधी व्यापाराने आपली पोटे भरतात आणि शिष्ट बायका ह्या व्यापाराला उत्तेजन देतात. आईबाप खुराक आणावयास गेली, तोच कोणी दुष्टाने त्यांचे प्राण घेतले, इकडे घरकुलात दोन-चार पिल्ले भुकेमुळे चोची वासून चिंवचिंव करून करूण स्वराने आईला हाका मारीत आहेत. पण त्यास उत्तर देण्यास आई जिवंत नाही. ती ओरडत ओरडत एकदोन दिवसांनी भुकेने मरून जातात!अरेरे! त्यांची ती स्थिती आठवून ज्याच्या डोळ्याला पाणी येणार नाही, असा पाषाण जगात असेल; तर तो मनुष्यजातीचा कलंक आहे असे म्हणण्यावाचून राहवत नाही. (युनायटेड स्टेटसची लोकस्थिती पृ १११-११३).

अमेरिकेतील गायरानांना रमाबाईंनी ‘भाजीपाल्याचे मळे’ व ‘जिवंत भाजी’ असे म्हटले आहे. ‘तेथील कसाईखाने वा वधस्थाने मी कधी पाहिली नाहीत’ असे त्या म्हणतात. प्राणी-पक्ष्यांची हत्या पाहून त्यांचे मन द्रवते.

आपल्या 'बालगीता'त तर रमाबाईंनी कितीतरी प्राणी-पक्ष्यांना गुंतवून घेतले आहे आणि यातही त्यांना संरक्षण देण्याचीच वृत्ती दाखविलेला आहे. 'मनी' या कवितेत रमाबाई लिहितात,

खर् खर् खर् कर् कर् कर् कर्

पंजाने ती करि दारावर म्यांऊ म्यांऊ म्यांऊ उपाशी घ्या हो मजला मी वनवाशी म्यांऊ म्यांऊ द्या खायाशी (मूळज्ञान)

ती मांजरीही जणू रमाबाईंकडे आश्रय मागायला आली आहे. ‘चिमणी’ विषयक कवितेतून त्या स्वतःसाठी काही संदेश घेत आहेत. आणि इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करीत आहेत.

चिमणी चिमणी, भली शहाणी । ऐक लाडक्या तिची कहाणी
लौकर उठती, चटकन् उडती । फांदीवरती उडान बसती
काड्या, दोरे गोळा करिती । झाडावरती घर बांधीती
कधी चोंचिने भोक पाडिती । भिंतीमध्ये ती घरटे करिती
त्यात नेऊनी गवतपिसे ती । मऊसी गादी अंथरिती
अंडी घालुनि त्यावर बसती । उब आणिती मग ती फुटती
पिले लानशी त्यातुनि निघती । नाजुक सुंदर ती हो दिसती.

उद्योगप्रवण ‘चिमणीची कहाणी ’ यात सांगितली आहे; तर चिमणीविषयक दुसऱ्या कवितेत चिमणीच्या कुटुंबाची, एकत्र कुटुंबाची, सुखी कुटुंबाची कहाणी सांगितली आहे. बेटकुळीला त्या पाठकुळीला बसायला सांगतात तेव्हा प्राणी-पक्षी कीटकांचे संरक्षण म्हणजेच निसर्गाचे, पर्यावरणाचे रक्षण व माणसाचे रक्षण. त्याला या जीवसृष्टीतून मिळणारा आनंद म्हणजे तोही निसर्गाचाच घटक असल्याची त्याला मिळणारी जाणीव असा संदेश रमाबाई देत जातात.

रमाबाईंचा जीवनाकडे बघण्याचा एकूणच दृष्टिकोन सांकेतिक दृष्टिकोनाहून वेगळा व निरोगी आहे. त्यामुळे त्यांची सौंदर्यकल्पना जीवनसौंदर्याशी निगडित आहे यांचे प्रत्यंतर येत जाते.

# स्त्री-स्वातंत्र्याचा आविष्कार

पंडिता रमाबाईंचे समग्र आयुष्य म्हणजे स्त्री-स्वातंत्र्याचा व स्त्री-सन्मानाचा समर्थ हुंकार होता. या विचारांचा पूर्वसूर त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे यांच्या विचारात व वागण्यात सापडतो. अनंतशास्त्री यांनी आपली पत्नी लक्ष्मीबाई हिला संस्कृत भाषा व काही धर्मग्रंथांतील विचार, तत्त्वे शिकविली होती. अनंतशास्त्री कामानिमित्त बाहेर जात; तेव्हा लक्ष्मीबाई त्यांच्या शिष्यांना शिकवीत असे.

अनंतशास्त्री आपल्या बायकोला संस्कृत शिकवितात, ही बातमी उडुपी येथील धर्मगुरूंपर्यंत जाऊन पोहोचली. त्यानंतर मठाधिकाऱ्यांनी शास्त्रीबुवांना उडुपीला बोलावून त्यासंबंधी जाब विचारला. 'स्त्रियांना देववाणी संस्कृत शिकवू नये, अशी धर्माज्ञा असताना तुम्ही आपल्या पत्नीला संस्कृत शिकवीत आहात, हा तुमचा अपराध आहे' असा प्रश्न केला असता, अनंतशास्त्री म्हणाले, 'स्त्रीला संस्कृत शिकविण्यात धर्माज्ञेविरुद्ध काही नाही. तसे सिद्ध करून दाखविण्यास आपण तयार आहोत. स्त्री-शुद्रांना आपण वेद शिकवीत नाहीत, संस्कृत शिकवितो व त्यात पाप नाही.'अनंतशास्त्र्यांचे हे बाणेदार उत्तर ऐकून मठाधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे मान्य केले व आपले म्हणणे सिद्ध करण्यास त्यांना योग्य ती मुदत दिली. काही दिवसांनी शिरूर सोदे येथे पंडिताची एक मोठी सभा भरविण्यात आली. त्यात कर्नाटकमधील प्रसिद्ध विद्वान आचार्य, शास्त्री पुराणिक मिळून सुमारे चारशे मंडळी अनंतशास्त्रींशी वाद करायला उभी राहिली. वाद लेखी पद्धतीने चालला होता. लेखी प्रश्नांची लेखी उत्तरे देणे असा हा वाद होता. दोन महिने हा वाद चालला होता. या प्रश्नोत्तरांचा एक मोठा ग्रंथच तयार झाला. त्यावर दोन प्रमुख पंडितांनी सह्या केल्या.

चौदा वर्षीय रमाबाईंनी हा 'ग्रंथ' प्रत्यक्ष पाहिलेला होता. १८७२ मध्ये अनंतशास्त्री कर्नाटकातून पुण्यास गेले असता, त्यांनी हा 'ग्रंथ'

आपल्याबरोबर नेला व एका नातेवाईकांकडे ठेवला. रमाबाईंना मात्र तो नंतर मिळाला नाही. तो ग्रंथ प्रसिद्ध करायची त्यांची इच्छा होती. ती अपूर्ण राहिली. परंतु ग्रंथलेखन व प्रकाशन याचे बीज मात्र रमाबाईंच्या मनात येथेच रोवले गेले असावे. भविष्यात त्यांच्या कितीतरी ग्रंथांची निर्मिती झाली व त्यांच्या लेखनाचा समाजप्रबोधनासाठी उपयोग झाला.

रमाबाईंच्या वडिलांनी जसा चारशे पंडितांसमोर वाद घातला होता, तसाच प्रसंग रमाबाईंच्या जीवनातही उद्भवला. येथे त्यांच्या संस्कृत ज्ञानाची, त्यांच्या पांडित्याची परीक्षा होती. १८७८ साली रमा व श्रीनिवास ही भावंडे कलकत्त्यात आली. शिक्षित व सुधारकी प्रवृत्तीचा माणसांच्या कक्षेत ही भावंडे आल्याने त्यांनाही आपले पांडित्य दाखविणे क्रमप्राप्त होते. त्यांच्या दारिद्र्याने आणि दैवगतीने ते येथे आले होते. वीस वर्षीय रमेने एका देवळात, आपल्या संस्कृत ज्ञानाची व पांडित्याची चमक दाखविताच सुधारकांची म्हणून समजली जाणारी कलकत्ता-नगरी हादरूनच गेली. तेथील सुधारकांचे व पंडितांचे लक्ष रमेकडे गेले. पुराणग्रंथातील अठरा-हजार श्लोक तिने घडाघड म्हणून दाखविले. तेव्हा तेथील शास्त्री-पंडित थक्क झाले. व्याकरणातही तिने नैपुण्य प्राप्त केलेले होते. कलकत्त्याच्या सिनेट हॉलमध्ये तेथील पंडितांनी व अध्यापकांनी एक मोठी सभा भरवून त्यांचा सन्मान केला. येथेच त्यांना ‘पंडिता रमाबाई सरस्वती’ ही पदवी मिळाली.

यावेळी रमाबाईंना जागच्या जागी आणखी काही श्लोक रचण्याची सूचना केली. त्याप्रमाणे तेथल्या तेथे दिलेल्या विषयावर श्लोक रचून आपले शीघ्रकवित्व त्यांनी दाखवून दिले.

अनंतशास्त्र्यांनी पंडिताच्याच एका सभेत स्त्रियांना संस्कृत ज्ञान प्राप्त करण्याचा हक्क व त्याचे महत्त्व पटवून दिले होते. त्यांच्याच संस्कारात वाढलेल्या त्यांच्या धाकट्या मुलीने, रमेने त्यांच्या मृत्युनंतर कलकत्त्यातील पंडिताच्या सभेत, त्यांच्या प्रयत्नांचे प्रत्यंतर आणून दिले. सिलचर येथे झालेल्या सभेतही रमाबाईंच्या पांडित्याची तपासणी झाली

होती. १७ सप्टेंबर १८७९ साली ही दोन्ही भावंडे सिलचरला पोहोचली. येथे त्यांचे स्वागत करून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. मणिपुरी राजवाडीच्या नाट्यमंदिरात एक मोठी सभा झाली. त्यावेळी पंडिता रमाबाईंना संस्कृतमध्ये एक अभिनंदनपत्र देण्यात आले. त्या सभेत रमाबाईंना तीन समस्या पूर्ण करण्यासाठी दिल्या. त्यावर थोडासा विचार करून रमाबाईंनी त्याची पूर्तता केली. पहिली समस्या अशी होती; ‘गद्यमिंद विनाङ्मर’

त्यावर रमेचे उत्तर असे होते :

विद्यां समभ्यस्य सदानवद्यां
ग्राह्यो विवेको मनसेति सम्यक्
नरस्य सर्वेरप तत्त्वबुद्ध्या
नालोच्यते गद्यमिंद विनाङ्मय॥

(निर्मळ अशा विद्येचा नीट अभ्यास करून प्रत्येकाने आपल्या मनाशी योग्य तो विचार ठरवून ग्रहण करावा. मानवाचे (म्हणजे त्याने रचलेले) हे गद्य (गद्यात्मक धर्मग्रंथ) शास्त्राधर असल्यावाचून सर्वांकडून प्रमाण मानले जात नाहीत.)

दुसरी समस्या : ‘सा तत्र चित्रायते’

रमेचे उत्तर :

या जानाति परप्रज्ञामुरूमतिः स्त्री
सा समाजे सती
धर्मैक प्रतिपादकेऽ विदितद्धर्मेऽभिजानत्यापि
मुग्ध त्वादनवद्य नीतिविषय ज्ञाना व बोध क्षमा
बाला नातिविवेकवाद कुशला सा तत्र चित्रायते।

(अत्यंत विद्वा न, कुशाग्रबुद्धीची अशी ती स्त्री केवळ धर्मप्रतिपादन करणाऱ्यां (परंतु) वास्तविक धर्मस्वरुप न जाणणाऱ्या अशा समाजामध्ये गेली असता सर्वकाही जाणत असूनही तसेच निर्मळ नीतीतत्त्वांचे प्रतिपादन करण्याची योग्यता असूनही केवळ मुग्धपणामुळे, वितंडवाद

करण्याची सवय नसल्याने तेथे (त्या समाजात) चित्राप्रमाणे तटस्थ, स्तब्ध राहते.)

तिसरी समस्या : 'अहो दग्धोऽस्मि वृष्टिभिः'

रमेचे उत्तर :

विद्युत्पातभयग्रस्त तिज्ञजनःक्वचित

शीमकले वदत्यव अहो दग्धोऽस्मि वृष्टिभिः

(पावसाची वेळ असून, विजा कडाडत आहेत व हवेत पावसाने अगदी गारवा आणला आहे, अशा वेळी कोणी अडाणी मनुष्य वीज पडेल काय या भीतीने हतबुद्धळ होऊन शीतकाल असूनही म्हणतो, 'ह्या पावसाने मी जाळून निघालो आहे.)

वयाच्या एकविसाव्या वर्षी रमाबाईंनी पंडितांच्या समस्यापूर्तीची दिलेली ही उत्तरे त्यांच्या विद्वरत्तेची प्रचिती देतात. रमाबाईंना समाजमान्यता मिळण्याची शक्यता यातून सूचित झालेली आहे. ज्ञानसंपादन केलेल्या स्त्रीला जर समाजमान्यता मिळाली नाही; तिची अवस्था चित्रवत् होईल, असेही रमाबाईंनी आपल्या बोलण्यातून समोरच्या माणसांना दाखवून दिले. अनंतशास्त्री डोंगरे यांनी ज्या निर्भीडपणे व बेडरपणे ब्रह्मवृंदाला चकित केले होते, तसेच त्यांच्या कन्येनेही पुरोगामी विचारवंतांचा समुदाय स्तंभित करून सोडला होता.'

या प्रसंगानंतरही रमाबाई व श्रीनिवास यांनी सिलचरमधल्या शाळांना भेटी दिल्या होत्या. तेथेही रमाबाईंनी दिलेली संस्कृत भाषणे व समस्यापूर्ती करताना दिलेली उत्तरे यांनी तेथील सभा चित्रवत् झालेल्या आहेत. याच काळात महिलांच्या संस्थांना भेटी देऊन रमाबाईंनी भगिनी मंडळाची ओळख करून घेतलेली आहे. स्त्रियांच्या संघटना चालविण्याची प्रेरणा अशा सभांतून त्यांना मिळालेली असावी, रमाबाईंच्या अन्य एका सभेला डेप्युटी कमिशनर, पोलिस, अधिकारी, युरोपिअन स्त्रिया, सरकारी अधिकारी यांनी हजेरी लावली होती. तेथील गिरीश विद्यालयात रमाबाईंच्या स्वागतासाठी एका तोरणावर लिहिलेले होते,

‘रमे’ रमा समागच्छ कृपया छात्रमंदिरे,

(रमेच्या आगमनाने या छात्रमंदिरावर कृपा झालेली आहे)

स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी जाहीर भाषणे करण्याआधी रमाबाईंचे एक पत्र २० ऑगस्ट १८७९ च्या मुंबईतील ‘इंदुप्रकाश’ मध्ये प्रसिद्ध झाले आहे. रमाबाईंना फारसे मराठी येत नव्हते. त्या कोणाकडून तरी वर्तमानपत्र वाचून घेत असत. नाशिकमधील सौ. अनसूया बाई ऊर्फ अणु अक्का या संस्कृतज्ज्ञ विदुषी पुराणे सांगत असत. त्यांच्याविषयी रमाबाईंनी वाचले असावे, रमाबाई ‘इंदुप्रकाश’ मध्ये लिहितात, ‘केवळ पुराण-श्रवणाने बायकांस नीतीचा किंवा धर्माचा चांगला बोध होत नाही. त्या केवळ कथारसात निमग्न असतात. त्यांना बोध होण्यासाठी अनसूयाबाईंनी वक्तृत्व करून धर्मानुसार नीतीने, कोणता मार्ग धरल्यास उन्नति व सुख होईल, तो मार्ग रूचण्याचा उपदेश करावा म्हणजे स्त्रियांची ‘दशा’ सुधारेल.’ विचाराला सामाजिक कार्याची तसेच प्रबोधनाची जोड असावी हे रमाबाईंनी यावरून सूचित केले आहे.

ढाक्क्यामधील एका सभेत रमाबाई म्हणाल्या की, ‘माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या जातीचे (स्त्रीजातीचे) कल्याण करण्याच्या कामात मी पराङ्मुईख होणार नाही.’ असा निर्धार करणाऱ्या) रमाबाईंच्या स्त्री स्वातंत्र्यविषयक कार्याला येथूनच सुरूवात झाली असे म्हणता येईल.

ज्या काळात आठ-नऊ वर्षाच्या मुलींची लग्न होत, त्या काळात रमाबाई बावीसाव्या वर्षापर्यंत अविवाहित होत्या. अनंतशास्त्रींनी आपली मोठी मुलगी कृष्णाबाई, हिचे लग्न वीस वर्षाची होईपर्यंत करावयाचे नाही, असे ठरविले होते. परंतु त्यांनी आपल्या मातोश्रींच्या इच्छेनुसार कृष्णाबाईंचे लग्न अशा मुलाबरोबर लावून दिले की जो, घरजावई होऊन आपल्याबरोबर विद्याभ्यास करण्यासाठी तयार असेल. मात्र त्या मुलाचे अभ्यासात लक्ष नव्हते. एके दिवशी हा मुलगा पळून गेला. श्रीनिवासचेही अठराव्या वर्षी लग्न झालेले होते. परंतु त्याची बायको त्याच्याबरोबर

नांदण्यास तयार नव्हती. अनंतशास्त्र्यांचा, पहिल्या बायकोपासून झालेल्या मुलीचा नवरा त्यांच्याशी अतिशय उद्धटपणे वागत असे. पहिल्या बायकोपासून झालेल्या मुलांमध्ये वडिलोपार्जित संपत्तीवरून झालेल्या भांडणामुळे अनंतशास्त्रींनी आपल्या संपत्तीचे वाटप केले. या पार्श्वभूमीवर कृष्णाबाईंचे झालेले लग्न यशस्वी झाले नाही. परंतु लग्नानंतर तेरा वर्षांनी तिचा नवरा हजर झाला व कृष्णाबाईंने आपल्याबरोबर नांदण्यास यावे यासाठी तिला विनवू लागला. कोर्टानेही मुलीने नवऱ्याकडे जावे असा निर्णय दिलेला होता. परंतु कृष्णाबाई त्याच्याबरोबर राहाण्यास गेली नाही. १८७५ मध्ये ती मरण पावली. अशा अनेक प्रकारच्या आपत्तींमुळे रमेचे लग्न लहान वयात होण्याचे टळले होते.

अविवाहित मुलीबाबत अनेकदा जशा अफवा पसरविल्या जातात तशा रमाबाईंबाबतही पसरविल्या होत्या. वडिलांनी तिचे लग्न पंढरपूरच्या विठोबाईशी लावून दिले आहे. तिच्या नशीबात वैधव्य लिहिलेले असल्याने बापाने तिचे लग्न करून दिले नाही, इत्यादी. रमाबाईंनी या प्रश्नांची पुढे अतिशय तडफदार उत्तरे दिली. देवभोळेपणा, भुतेखेत, गृहयोग यावर आपल्या वडिलांचा विश्वासच नव्हता. आईच्या जन्मपत्रिकेत वैधव्ययोग असतानादेखील आपल्या वडिलांनी तिच्याशी लग्न केले होते असे त्यांनी म्हटले.

रमाबाईंना मुंबईतूनही ‘स्थळ’ चालून आलेले होते. परंतु श्रीनिवासच्या मृत्युनंतर त्यांनी बिपीन बिहारी मेधावी यांच्याशी प्रतिलोम पद्धतीने, नोंदणी पद्धतीने विवाह केला. श्रीनिवासच्या. मृत्युनंतर म्हणजे ८ मे १८८० नंतर लगेचच १३ जून १८८० या दिवशी त्यांचा विवाह झाला. आपल्या घरातील एकेकाच्या मृत्युनंतर श्रीनिवास व रमा यांना लगेचच आपल्या जीवनाचे निर्णय घेतलेले आहेत. कुणाच्या दुःखाबद्दल शोक करण्यात त्यांनी वेळ दवडलेला आहे असे दिसत नाही. श्रीनिवासच्या मृत्युनंतर बावीस वर्षीय रमेने विवाह करण्याचा निर्णय घेतला. आपल्या

भावाची सोबत आहे तोपर्यंत तिला भ्रमंतीची भीती वाटत नव्हती. मात्र यापुढे एकटं राहाणं धोक्याचं आहे असं रमाबाईंना वाटणं स्त्रीस्वभावसुलभच होते. त्यामुळे ज्याच्याविषयी मनापासून आकर्षण वाटलं होते, अशा बिपीन बाबूंबरोबर विवाह करण्याचा निर्णय त्यांनी घेतला व नोंदणीपद्धतीने त्वरित लग्नही केले. त्यांचा विवाह हा प्रेमविवाह, प्रौढविवाह, प्रतिलोमविवाह, आंतरजातीय व आंतरप्रांतीय असा विवाह होता. रमाबाई व बिपीनबाबू हे एक विचाराने जवळ आलेले होते. आधुनिक व पुरोगामी विचारांचे सूचन रमाबाईंच्या विवाहातून झालेले आहे. आपली मोठी बहीण कृष्णाबाई हिचा विफल झालेला विवाह, श्रीनिवासचा अयशस्वी विवाह, सावत्र बहिणीचा अल्पवयात झालेला विवाह, आपल्या वडिलांचा झालेला द्वितीय विवाह, शिवाय दारिद्र्य, कर्मठ समाज व धर्मव्यवस्था या पार्श्वभूमीवर रमाबाईंचा प्रौढविवाह व प्रेमविवाह महत्त्वाचा ठरतो.

लग्नानंतर रमाबाईंच्या जीवनव्यवहारात फारसा फरक पडला नाही. बिपीनबिहारी कामात व्यस्त असत, तेव्हा रमाबाई घरातल्या पुस्तक संग्रहातली पुस्तके वाचत असत. बंगाली भाषेतील संत लूककृत शुभवर्तमान रमाबाईंना असेच सापडले होते. तेथे येणाऱ्या ॲलन नामक मिशनऱ्याबरोबर रमाबाई चर्चाही करीत असत.

धर्मांतराबाबतही रमाबाईंनी आपल्या स्वतंत्र विचारांचा मूर्तिमंत आविष्कार दाखविला. पूर्ण विचारांती त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्याविषयी त्यांची दृष्टी स्वच्छ होती. त्या लिहितात, 'बाप्तीज्मा'१ घेतल्याने मजविषयीची पुज्य बुद्धि लोकांस सांगितली असती; तर काही वावगे नव्हते आणि त्या स्थितीत माझा उपयोग आतापेक्षा अधिक झाला असता. जे तुम्हांस खरेसें वाटते, ते तुम्ही आचरण करता ह्याची काहीतरी खूण तुमच्या कृतीत असावी. विधवांचे दुःख शमन करावे, ज्या विधवांची तसे करण्याची इच्छा असेल त्यांचा पुनर्विवाह व्हावा, मुलांची व मुलींची लग्न लहानपणी करू नयेत, मूर्तिपूजा करू नये इ. उत्तम गोष्टी तुम्हाला

खऱ्या वाटतात ना? मग त्या तोंडाने बोलूनच केवळ त्यांवर तुमचा विश्वास आहे, असे लोकांस नाही का चालणार? फक्त बोलणे व कृती करणे यात अंतर आहे हे रमाबाई दाखवून देतात. बोलल्याप्रमाणे करून दाखवायचे तर ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता, हे पंडिता रमाबाई स्पष्टपणे सांगतात. त्यासाठी धैर्य लागते. ते रमाबाईंकडे होते.

पंडिता रमाबाईंची सारी भिस्त त्यांच्या विचारस्वातंत्र्यावर आहे. त्या म्हणतात, 'विचारस्वातंत्र्य हे प्रत्येक मनुष्यास असलेच पाहिजे. एखाद्या विशेष मतात शिरले, म्हणजे त्याचे निर्बंध व त्याच्या प्रवर्तकांची विचारसरणी ह्यांचा अंगिकार करावा लागतो. म्हणजे धर्म हा पाण्यासारखा जीवनप्रद आहे. तो स्वतः अंतर्यामीच्या प्रेरणेस अनुसरून आचरावयाचा सोडून आपल्याच सारख्या इतर मनुष्यांनी घालून'

---

१: बाप्तिज्मा: ख्रिस्ती धर्मात प्रवेश करण्याचा धार्मिक विधी, बालक चाळीस दिवसाचे झाले की, चर्चमध्ये नेऊन हा विधी केला जातो. बालकाच्या आईवडिलांबरोबरच धर्म आईबाप (God mother/God father) ही चर्चमध्ये जातात. बालकाच्या डोक्यावरून पाणी शिंपडून त्याचे नामकरण केले जाते. या विधीला स्नानसंस्कार विधी असे म्हटले जाते. जाणती माणसे अन्य धर्मातून ख्रिस्ती धर्मात प्रवेश करतात त्यावेळी असा धार्मिक विधी केला जातो.

दिलेल्या नियमाने चालावयाचे म्हणजे लोकांच्या ओंजळीने पाणी प्याल्यासारखे आहे. म्हणून मी ख्रिस्ती धर्मानुयायांच्या एखाद्या विशेष मतात शिरत नाही. ख्रिस्ताच्या सद्ध र्मरूपी जिवंत पाण्याचा झरा त्याच्याच जवळून आपल्यास पाहिजे तितके अमृतजल मिळत असता, ते निरनिराळ्या मतांच्या गहन, दुर्बोध व दूषित वाक्य किवा मतरूपी नळांतून किंवा पन्हाळातून आल्यावरच घेतले पाहिजे अशी मुळीच आवश्यकता नाही.' ('ज्ञानोदय १८८९')

चर्चचा पुरुषप्रधान अधिकारशाही रमाबाईंनी नाकारली होती. त्या म्हणत, ' मी नुकतीच एका धर्माच्या जोखडातून मुक्त झाले आहे. आता परत दुसऱ्या धर्माच्या जोखडाखाली जाण्याची माझी इच्छा नाही, स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजू लागल्यापासून मी कधीही स्वैर वागलेले नाही, पण माझ्या व्यक्तिस्वातंत्र्यावर मी कुणालाही आक्रमण करू देणार नाही. तुमचे स्पष्टीकरण मला पटले तरच चर्चेने नियम मी स्वीकारेन, अन्यथा नाही.' प्रखर बुद्धिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा उद्‌घोष रमाबाईंनी केलेला आहे.

आपण कोणतेही पाप केलेले नाही. त्यामुळे कन्फेशन करणे,२ पापांची कबुली देणे हा प्रकार त्यांना मान्य नव्हता. प्रभुप्रसाद३ म्हणून टोस्ट (भाकरी) व मद्य (द्राक्षारस) घेण्याऐवजी त्या चपाती व मनुकाचे पाणी घेत. असे कुजवलेले बुद्धिभ्रष्ट

---

२: कन्फेशन (Confession) खिस्ती धर्मात 'पापनिवेदन' (Confession) करण्याचा एक विधी असतो. कॅथलिक पंथीय लोक चर्चमध्ये कन्फेशन ऐकण्यासाठी बसलेल्या धर्मगुरूकडे आपल्या पापांची कबुली देतात व पुन्हा पाप न करण्याचा निश्चय करावयास धर्मगुरू सांगतात आणि आशीर्वाद देतात. काही प्रोटेस्टंटपंथीय लोक चर्चमधील भिंतीकडे बघत, उभे राहून पापनिवेदन करतात. ज्यू लोक 'विलाप भिंत' (Wailing wall) या ठिकाणी जाऊन भिंतीकडे बघून आपल्या पापाबद्दल विलाप करतात व प्रार्थना करतात. एका कागदावर आपल्या मनातले विचार लिहून ते भिंतीला असलेल्या कोपऱ्यात घालतात.

३: प्रभुप्रसाद (Communion) क्रुसावर बळी जाण्याच्या आदल्या दिवशी येशूने आपल्या बारा प्रेषितांसह भोजन केले. त्याला शेवटचे भोजन (The last supper) म्हटले जाते. यावेळी त्याने हातात भाकर घेऊन प्रार्थना केली व ती भाकर आपल्या प्रेषितांना दिली. 'माझ्या आठवणीसाठी तुम्ही हे करा' असे त्याने सांगितले. यावेळी येशूने, समाजरीतीनुसार प्रेषितांना द्राक्षारसही प्यावयास दिला. भाकर म्हणजे येशूचे शरीर व द्राक्षारस

म्हणजे त्यांचे रक्त असा त्या प्रतिकात्मक अर्थ आहे. आजही असा प्रभुप्रसादविधी चर्चमध्ये होतो. कॅथलिक पंथीय, बालक बारा वर्षाचे झाले, की 'प्रभुप्रसादसेवन' नामक विधी केला जातो. मगच ख्रिस्ती बालक चर्चमध्ये 'प्रभुप्रसाद' स्वीकारू शकतो. त्यामुळेच चर्चमध्ये फक्त ख्रिस्ती माणसांनाच 'प्रभुप्रसाद' दिला जातो. करणारे पेय, देवाचा प्रसाद म्हणून घेणे हे येशूला कधीच मान्य होणार नाही, असे त्या म्हणत. पापांची कबुली न देण्यात त्यांचा अहंकार नव्हे; तर सदाचरणावर असलेला त्यांचा विश्वास व स्वतःच्या वर्तणुकीबद्दल असलेला त्यांचा आत्मविश्वासच दिसून येतो. प्रभुप्रसादासंबंधी रमाबाईंचे विचार त्यांची भारतीय संस्कृतीवरील निष्ठाच सूचित करतात. गळ्यात क्रॉस घालायला व घालायचाच असेल; तर त्यावर अपरिचित अशी लॅटिन अक्षरे कोरायला त्यांनी विरोध दर्शविला होता व संस्कृत अक्षरे कोरण्याचा त्यांचा आग्रह याच भारतीयपणाचे दर्शक आहे.

ख्रिस्ती झाल्यावर देखील बार्शी येथे हिंदू देवळात जाऊन पुराण सांगितल्याबद्दल २५ जुलै १८८९ च्या 'ज्ञानोदय' या ख्रिस्ती नियतकालिकानेही रमाबाईंवर टीकेची झोड उठविली होती. त्यांना उत्तर देताना रमाबाई म्हणतात, "माझे व्याख्यान आणि पुराण ही दोन्ही साधारण सामाजिक नीती कशी असावी ह्या विषयावर होती. मुंबईतील एखाद्या देवळात चातुर्मासात पुराण किंवा मुसलमानी मशिदीत कुराण सांगण्यास मी तयार आहे. मात्र हिंदूंनी आपली देवळे व मुसलमानांनी आपल्या मशिदी यांची दारे उघडली पाहिजेत. " सर्व धर्मात स्त्रीला असलेले गौण स्थान, धर्मग्रंथांतील ज्ञान देण्याबाबत स्त्रीवर असलेली सामाजिक व धार्मिक दडपणे, त्याचबरोबर एखादी स्त्री व्यासपीठावर आपली मते, विचार ठासून मांडते आहे, याबद्दल पुरुषी अहंकाराला बसणारा धक्का याचा स्पष्ट उच्चार रमाबाई येथे करते आहे. ही मानसिकता बदलण्यासाठी, जातीधर्माचा अडसर दूर करण्यासाठी व लिंगभेदाचे वर्चस्व नाहीसे करण्याचा रमाबाईंचा प्रयत्न होता. ऑगस्ट १८७९ साली

मुंबईतील ‘इंदुप्रकाश’ मध्ये रमाबाईंनी जे पत्र लिहिले होते, त्याचीही यावेळी आठवण होते. अनसूयाबाई या संस्कृतज्ज्ञ पुराणे सांगत असत. परंतु फक्त सांगण्यापेक्षा, नीतीज्ञानाला प्रबोधनाची जोड असावी असे रमाबाईंनी त्यांना सुचवले होते. रमाबाईंनी हिंदूंच्या देवळात जे पुराण सांगितले ते अशा प्रकारचे होते.त्यावेळच्या त्यांच्या विचारातील परिपक्वता त्यानंतर दहा वर्षांनीदेखील तशाच स्वरूपात प्रत्यक्षात येताना दिसते.

महात्मा जोतिराव फुले यांनी ऑगस्ट १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत, भिड्यांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू केलेली होती. तेथे महार-मांग-चांभार इत्यादी अतिशुद्रांच्या मुली शिकू लागल्या होत्या. १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेत दुसरी शाळा आणि १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत मुलींची तिसरी शाळा काढली होती. सावित्रिबाई फुले, जोतिराव फुलेंना या कामी मदत करीत होत्या. रमाबाईंच्या जन्माच्या आधीची मुलींच्या शिक्षणाबाबतची ही पार्श्वभूमी होती. रमाबाईंच्या वडिलांना, अनंतशास्त्रींना याची माहिती असली पाहिजे. त्यांचे काही नातेवाईक पुण्यात होते. १८७८ साली उडुपी ब्रह्मवृंदांबरोबर झालेल्या वादविवादाचे बाड त्यांनी पुण्यातील आपल्या नातेवाईकांकडे ठेवल्याचा संदर्भ मिळतो. ज्या काळात महात्मा जोतिराव फुले स्त्रीशिक्षणात कार्यरत होते, त्याच काळात अनंतशास्त्री कर्नाटकात आपली पत्नी लक्ष्मीबाई हिला संस्कृत शिकवीत होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

महाराष्ट्रातील तळागाळातील लोकांचे व उच्चवर्णीयांचे प्रश्न वेगळे होते. उच्चवर्णीय बालविधवा, परित्यक्ता यांच्यासाठी व व्यक्तिमत्त्व उभारणीसाठी लागणारे अनौपचारिक शिक्षण ही काळाची गरज होती. १८८९ मध्ये रमाबाईंनी मुंबईत सुरू केलेले ‘शारदासदन’ म्हणजे विधवांसाठी अनौपचारिक शिक्षण देणारी शाळा होती आणि १८९८ मध्ये सुरू केलेले ‘मुक्तिसदन’ उच्चवर्णीय , तसेच उपेक्षित व तळागाळातील स्त्रियांसाठी, एका भारतीय बाईने सुरू केलेली भारतातील पहिली

अनौपचारिक शिक्षण देणारी व आश्रय देणारी संस्था होती. पंडिता रमाबाईंचे शिक्षण त्यांच्या स्वतःच्याच घरात, अनौपचारिक पद्धतीने झालेले होते. शिवाय परदेशातील अनौपचारिक शिक्षणसंस्था त्यांनी डोळसपणे पाहिल्या होत्या. अनौपचारिक शिक्षणावरील विश्वासापोटीच त्यांनी आपली संस्था कोणत्याही सरकारी वा धार्मिक संस्थांच्या औपचारिकतेत गुंतवून ठेवली नाही. फक्त त्यांचे आर्थिक व्यवहार परदेशी संस्थांशी निगडीत होते.

स्त्रियांचे मानसिक, बौद्धिक उत्थापन हे रमाबाईंनी आपले जीवितध्येय मानले होते. बालविवाह, बालविधवा, परिव्यक्ता, विधवांचे केशवपन असे स्त्रियांचे गंभीर स्वरूपाचे सामाजिक प्रश्न होते. धर्मग्रंथांचा विलक्षण पगडा असल्याने कर्मठ ब्राह्मणवर्गात अशा प्रश्नांमुळे बजबजपुरी निर्माण झालेली होती. यातून समाजमन बाहेर काढणे, त्यासाठी जनजागृती करणं आणि त्याला कृतीची जोड असणं रमाबाईंना महत्त्वाच वाटलं. म्हणून रमाबाईंनी आपली लेखणी व वाणी सदैव कार्यरत ठेवली 'शारदासदन' व 'मुक्तिसदन' या रूपाने आपली कृति जिवंत ठेवली. स्त्री-पुरुष समानतेचा, समान हक्क आणि अधिकाराचा, विशेष म्हणजे 'माणूस' पणाचा पुरस्कार त्यांनी आपल्या व्याख्यानांतून सतत जागता ठेवला. आपल्या व्याख्यानांना यायचे असल्यास, पुरुषाने आपल्याबरोबर आपली बायको, मुलगी, सून, भावजय अशापैकी खुद्द घरची स्त्री आणल्याशिवाय त्यांना रांगेत बसता येणार नाही, असा दंडक रमाबाईंनी घातला होता. तत्कालीन नव्याने लिहू लागलेल्या स्त्रियांपैकी एक नावाजलेल्या लेखिका काशीबाई कानिटकर या आपल्या सासऱ्यांबरोबर अशा एका सभेला गेल्या होत्या. पंडिता रमाबाई आणि रमाबाई रानडे यांना पाहण्याचा योग त्यांना यानिमित्ते आला होता.

स्त्री ही कोणाची मालकी वस्तू नाही; तर ती व्यक्ती आहे. तिला मन आहे. तिची संवेदनशीलता समजून घ्यायला हवी. रमाबाई आपल्या व्याख्यानांतून समाजमनावर सतत हे विचार बिंबवित राहिल्या. संत

मीराबाईंचा संदर्भही त्यांच्या व्याख्यानात येत असे. रमाबाई बारा वर्षांची असताना आई-वडिलांबरोबर द्वारकेला गेल्या होत्या. कृष्ण-मीरेची आठवण तेथे जागवली जाणे स्वाभाविक होते. पण रमाबाईंना जाणवले ते मीरेचे वेगळेपण. मीराबाई पतिसहवास सोडून या ठिकाणी कृष्णभक्तीत तल्लीन होऊन राहिली होती. स्त्रीदास्यविमोचनासाठी झगडणारी पहिली शूर आर्य महिला म्हणून रमाबाई आपल्या व्याख्यानात मीराबाईंचा उल्लेख करीत असत.

रमाबाईंचे कलकत्त्यात वास्तव्य असताना देशभक्त आनंदमोहन बोस यांनी स्त्रियांसाठी खास सभा आयोजित केली होती. केवळ स्त्रियांसाठी आयोजित केलेली ही पहिली सभा समजली जाते. १८७८ साली झालेली ही सभा आहे, 'पंडिता रमाबाई सरस्वती' हा किताब मिळाल्यावर, रमाबाईंची काही व्याख्याने कलकत्त्यात झाली होती. त्या संस्कृतमध्ये बोलत व त्याचे बंगाली भाषांतर केले जाई. या व्याख्यानात रमाबाई स्त्रियांचे महत्त्व पटवून देणाऱ्या गोष्टी सांगत असत. त्या म्हणत, 'पूर्णपणे थाटलेल्या व गजबजलेल्या दरबारात द्रौपदी आपल्या पित्याबरोबर बसत असे. युधिष्ठिरालाही जुगार न खेळण्याविषयी ती बजवायची. उघड्या दरबारात श्रीकृष्ण आपल्या मातेसह बसायचा. यावरून असे दिसते की, त्या पुरातन काळी स्त्रियांना आताप्रमाणे वाळीत टाकीत नसत. बालविवाहाने स्त्रियांच्या प्रगतीचे सर्व मार्ग रोखले गेले आहेत. आपण शास्त्राध्ययन केले म्हणजे आपल्याला दिसून येईल की, पूर्वीच्या भारताने बालविवाहाला मान्यता दिलेली नव्हती. लोक म्हणतात, बालविवाह जर थांबविले आणि स्त्रियांना शिक्षण दिले; तर त्या अनीतीमान होतील. पण हे असत्य आहे. सत्यभामा, सावित्री आणि त्यांच्यासारख्या इतर पुष्कळजणी सिद्ध करतात की, हे म्हणणे असत्य आहे.' वीस वर्षे वय असलेल्या रमाबाईंच्या विचारातील ही परिपक्वता वाखाणण्यासारखी आहे.

रमाबाईंच्या बहिणीचा विवाह वा रमाबाईंचाही विवाह त्यांच्या वडिलांनी अगदी बालवयात केला नव्हता, हा अनुभव रमाबाईंच्या गाठीस होताच. त्याचबरोबर आजुबाजूच्या घडामोडींवरदेखील त्यांचे बारीक लक्ष होते. पुराणग्रंथांचा अभ्यास असल्याने त्यांचा आणि वास्तव परिस्थितीचा अर्थ त्या लावीत असत. द्रौपदीने आपल्या पाचही नवऱ्यांना दिलेली प्रेरणा व उत्तेजना, सत्यभामा, सावित्री यांचा आदर्श पुरुषांबरोबर सभेत बसणाऱ्या स्त्रिया, या उदाहरणांतील सकारात्मक दृष्टिकोण त्या घेत होत्या. आपल्या वडिलांनी स्त्री-शिक्षणाचा केलेला पुरस्कार त्यांनी अनुभवला होता. त्यामुळे स्त्रीशिक्षणाचे महत्त्व बालविधवांची दयनीय स्थिती व त्यातून त्यांना बाहेर काढण्याची असलेली काळाची गरज यासंदर्भात रमाबाईंच्या मनाची बैठक तयार झालेली होती. ताराबाई शिंदे, यांनी १८८५ साली लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधाच्या आधीचे हे विचार आहेत, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे.

पंडिता रमाबाईंनी स्त्रीशिक्षणविषयक आपले ध्येय पूर्णत्वास नेले. पुराण, इतिहास, साहित्य, विविध भाषांतील विचार व वर्तमानकाळ वाचण्याची विशिष्ट दृष्टी यामुळे रमाबाई आपल्या समकालीन सुधारक व विरोधकांच्या घडामोडीतही स्त्रियांच्या बरोबर राहिल्या. त्यांच्या विचारांना पुरोगामी विचाराचे अधिष्ठान असलेल्या कलकत्ता शहरात व्यासपीठ मिळाले होते व येथूनच रमाबाईंचा हा प्रवास सुरू झाला होता. हा प्रवास ब्रिटिश सरकारला खडसावण्यापर्यंत चालूच होता. रखमाबाई सावे४ यांना जेव्हा ब्रिटिश जज्जने, 'नवऱ्याकडे राहण्यास गेले पाहिजे.' असे सुनावले, तेव्हा रमाबाईंनी ब्रिटिश नीतीचा धिक्कार करीत म्हटले, 'आमच्या हिंदी बांधवांपेक्षा हे सरकार जुलमी आहे. एकीकडे ते स्त्रियांना शिक्षण व स्वातंत्र्य द्यायला शिकवते आणि स्वतंत्र स्त्री नावडीच्या पतीची गुलामगिरी नाकारू लागली तर तिला बंधनात बांधायला साधन होते.' ब्रिटिश सरकार, भारतातील सारे पुरुष आणि स्वर्गातील तेहतीस कोटी देव यांच्याविरुद्ध आवाज उठवणाऱ्यात रखमाबाईंचे अभिनंदन रमाबाई

करतात.५ भारतातील पहिली महिला डॉक्टर म्हणून परिचित असलेल्या डॉ. आनंदीबाई जोशी यांना अमेरिकेतून भारतात परतताना आजारी असल्याने बोटीचे तिकीट नाकारले होते. तेव्हाही

---

४: रखमाबाई सावे: (१८६४-१९५५) यांचे लग्न बालपणीच केलेले होते. आपले लग्न आपल्या इच्छेप्रमाणे झालेले नाही. त्यामुळे त्या आपल्या पतीबरोबर राहाण्यास तयार नव्हत्या. शिवाय बालपणी लावलेले हे लग्न त्यांना मान्य नव्हते. त्या वयात आल्यावर आपल्या घरी घेऊन जाण्यासाठी म्हणून त्यांच्या पतीने मुंबईच्या न्यायालयात तिच्यावर खटला भरला होता. सनातनी लोकांनी रखमाबाईंच्या पतीला भडकविले होते, परंतु रखमाबाईंनी माघार घेतली नाही आणि आपल्या पतीबरोबर राहाण्यास त्या गेल्या नाहीत. पुढे त्या डॉक्टर झाल्या व लोकांची सेवा करीत कृतार्थ जीवन जगल्या.
५: 'द हाय कास्ट हिंदू वुमन' पंडिता रमाबाई (पृ.३५)

त्यांनी रागावून आपल्या ब्रिटिश मैत्रिणीला निषेधाचे पत्र पाठविले होते.

१८८९ साली मुंबईत भरलेल्या तिसऱ्या सामाजिक परिषदे'त पंडिता रमाबाईंनी, विधवांच्या सक्तीच्या केशवपनाविरुद्ध ठराव पास करून घेण्यासाठी मदत केली. २९ डिसेंबर रोजी हे अधिवेशन झाले होते. सभेसाठी चार हजार लोक उपस्थित होते. काँग्रेसचे अध्यक्ष सर डब्यू. वेडरबर्न, जस्टीस तेलंग, डॉक्टर भांडारकर, सुब्रह्मण्यम अय्यर असे मान्यवर होते. श्रीयुत सुब्रह्मण्यम अय्यर यांनी विधवा केशवपनासंबंधीचा ठराव मांडला. त्याला रमाबाईंनी दुजोरा दिला. या ठरावातील अठरा वर्षांची मर्यादा त्यांनी काढून टाकायला सांगितली. 'विधवा वयात आल्यावर आपण कसे राहायचे, ते ठरविण्याची तिला संपूर्ण मोकळीक असावी. आपले केस वाढवावे, असे जर तिला वाटत असेल; तर तसे करण्यास तिला पूर्ण स्वातंत्र्य असावे. तिला जर आपले केस काढावेसे वाटले; तर तसे करण्याचीही तिला पूर्ण मुभा असावी असे म्हणत

पुराणग्रंथ व पाश्चात्य ग्रंथ यांच्या वाचनातून निर्माण झालेली आपली निर्भय व निर्भर वृत्ती सादर करीत रमाबाई म्हणाल्या,' "त्यांना असे सांगण्यात येते की, जर तुम्ही आपले केस लांब वाढू दिलेत; तर त्याच केसांनी यमलोकी तुमच्या नवऱ्यांना अधिक आवळून बांधण्यात येईल ही एक अत्यंत वेडगळ समजूत आहे. सद्गृहस्थ हो ! असलाच अत्याचार आपल्या लेकी-सुनांवर होत असता त्यांच्या मदतीला तुम्ही नको का यायला ? ह्याच मंडपात एकसारखा टाहो फोडण्यात येत होता की सरकारने जनतेचे वाकस्वातंत्र्य हिरावून घेऊ नये. तोच न्याय सर्व स्त्रिया पुरुषांजवळ मागत आहेत. मला सांगायचे ते एवढेच की, ठराव समंत केला की, त्याचे पालन खात्रीपूर्वक झालेच पाहिजे. अशी खबरदारी घ्यायला हवी. आपल्या विधवांचे केशवपन करायचे नाही, असे तुम्ही ठरविले की कदाचित आपल्या घरातील बायका जुन्या स्पार्टन स्त्रियांनी, लढाईस निघालेल्या पुरुषांना धनुष्यबाणासाठी आपल्या केसांचे पेड कापून दिले, तसे आपण होऊन स्वतःचे केस त्या तुम्हाला अर्पण करतील." स्त्रीची प्रेमभावना व आत्मसन्मान जर जागृत झाला; तर स्वतः त्यागास तयार होते, हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले.

प्लेगच्या काळातही रमाबाईंनी सरकारची कानउघाडणी केली होती. १८९७ मध्ये पुण्यात प्लेग आलेला होता. त्या काळात रमाबाई तळेगावहून केडगावला चालल्या होत्या. त्यांच्याबरोबर दोन मुली होत्या. एक मुलगी दुष्काळातून आणलेली होती. तिला खरूज झालेली होती व तिला ताप येत होता. तेव्हा तपास पथकातील डॉक्टरांनी तिला प्लेग हॉस्पिटलमध्ये न्यायला सांगितले. त्याचबरोबर याच काळात मॅजिस्ट्रेटने रमाबाईंना पुण्यातील 'शारदासदन' मधून साऱ्या मुलींना हलवायला, तेथून स्थलांतर करायला सांगितले होते, कारण दुष्काळातून आणलेल्या मुलींची तेथे गर्दी झालेली होती. त्यामुळे रमाबाईंनी आपल्या मुलींसकट रातोरात केडगावला स्थलांतर केले होते. रमाबाई ज्या प्लेगच्या हॉस्पिटलमध्ये मुलींबरोबर होत्या, तिकडच्या व्यवस्थापनाचा कारभार

त्यांना स्वच्छ वाटत नव्हता. हॉस्पिटल बाहेरून स्वच्छ वाटत होते, पण आत सारा गलथानपणा भरून राहिलेला होता. हॉस्पिटलचे पहारेकरी काही मुली 'ठेवून' घेत होते. मुलींचा गैरफायदा घेतला जातोय, त्यांचा गैरवापर होतोय असे रमाबाईंना दिसून आले. रमाबाई लिहितात 'हे दुःख व हे संकट माझ्यावर आणले आहे ते पुण्यातील सरकारी अधिकाऱ्यांनी. कितीतरी चांगल्या चांगल्या मुली प्लेग हॉस्पिटलच्या व सेग्रेगेशन कँपच्या निमित्ताने आपापल्या सग्यासोयऱ्यां पासून अशा रीतीने दुरावल्या गेल्या असतील व त्यांच्या आयुष्यांचा नाश करण्यात आला असेल हे एक परमेश्वरालाच ठाऊक. '

'सेग्रेगेशन कँपमध्ये नेटिवांची (भारतीयांची) नीट व्यवस्था होत नाही. मोऱ्या नाहीत, पायखाने घाणेरडे आहेत, स्त्रियांना विसावा घेण्यासाठी खोल्या नाहीत, याविषयीही रमाबाई आवाज उठवतात. एकदा प्लेग हॉस्पिटलमध्ये त्यांना प्लेगग्रस्त मुलींसाठी जावे लागले. तेव्हा तेथे त्यांना उघड्या जमिनीवर झोपावे लागले. थेथे रोग्यांचीही नीट काळजी घेतली जात नाही असे त्यांना दिसून आले. त्यावेळी रमाबाईंचे डोळेही आले होते. तशाही अवस्थेत त्या त्या ठिकाणी 'गार्डियन' या वृत्तपत्रासाठी पत्र लिहित होत्या. 'मातांनो ! आपल्या जीवाचे मोल देऊन आपल्या कन्यांचे रक्षण करा.' असा मोलाचा त्यांनी त्यातून दिला.

१ सप्टेंबर १८९७ च्या 'गार्डियन' च्या एका पत्रात रमाबाईंनी भारतीय स्त्रीच्या शालिनतेचे वर्णन करून स्त्री डॉक्टर नसतील; तर सरकारी डॉक्टरांनी या स्त्रियांची वैद्यकीय तपासणी करताना त्यांचा योग्य तो आदर ठेवून वागणूक द्यावी, असे म्हटले आहे. त्या लिहितात, 'Is it not the Indian woman quite as modest as the English woman? Does she not as a woman deserve better treatment even at the hands of the Governer and the plague committee of poona.' यावर मुंबईच्या गव्हर्नरने, रमाबाईंचे हे म्हणणे सत्याला सोडून व गैरसमज

पसरविणारे आहे, असा शेरा मारला. सँडहर्स्ट या न्यायालयाच्या कक्षेतील अधिकाऱ्याला रमाबाई जाहीर आव्हान देत म्हणतात,

---

६: सेग्रेगेशन कँप : प्लेगग्रस्तांसाठी केलेल्या छावण्या. प्लेगग्रस्तांना इतर लोकांपासून वेगळं ठेवण्यासाठी केलेली ही व्यवस्था होती.

‘माझे म्हणणे सत्याला सोडून आहे, असे जर म्हणत असतील; तर त्यांनी माझ्याजवळ त्याचा पुरावा मागावा. इंग्रज अधिकारी आणि जनताही पुराव्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवत नसताना, माझ्याकडे पुरावा न मागता असा आरोप ते माझ्यावर कसा करू शकतात.’ असा प्रश्न रमाबाई उपस्थित करतात.

१२ सप्टेंबर १८९७ च्या ‘अमृतबझार’ पत्रिकेनेही याच संदर्भात एक स्फुट लिहिले. त्यात ‘प्लेगच्या संदर्भातील ही स्थिती रमाबाईंनी जितक्या उत्कटतेने इंग्रजीत लिहिली, तसे एकाही मराठी वर्तमनापत्राने लिहिलेले नव्हते,’ असे म्हटले आहे. एरव्ही रमाबाईंच्या धर्मांतराबद्दल टीका करणारे लोकमान्य टिळक म्हणतात की, ‘रखमाबाईंचे इतर काहीही असो, पण बाई बुद्धिळमान व निधड्या छातीची खरी.’

रमाबाईंनी लोकमान्य टिळकांविषयीचा आपला आदरही असाच व्यक्त केलेला आहे. लोकमान्य टिळकांच्या शिक्षेला कारणीभूत झालेले त्यावेळचे मुंबई प्रांताचे गव्हर्नर एकदा केडगाव आश्रम बघायला आले. तेव्हा रमाबाईंनी त्यांचे नाममात्र स्वागत केले होते. याचे नवल वाटणाऱ्यांना त्या म्हणाल्या, टिळकांसारख्या देशभक्ताला अकारण एवढी सजा देणाऱ्या माणसाचे आणखी कशाप्रकारे स्वागत करायचे? आपल्याच समकालीन व्यक्तिविषयी, ज्यांनी प्रखर विरोध करून मनस्ताप दिला, त्यांच्याविषयी मनात कसलाही किंतु न ठेवता, त्यांनी आपली स्वतःचीही राष्ट्रभक्ती या प्रसंगातून व्यक्त केली आहे.

पंडिता रमाबाईंचा देशाभिमान किती जाज्ज्वल्य होता, हे त्यांच्याच उद्गारांवरून दिसून येते. एका भाषणात त्या म्हणतात, “स्वदेशाभिमान

कसा असावा, ह्याविषयी इकडे शाळांत काहीच शिकवत नाहीत. इकडची पुस्तकेही शिक्षणार्ह नाहीत. इकडच्या पुस्तकातील मुख्य तत्त्व काय; तर राणीसरकारची भक्ति करा. राजनिष्ठा असणे हे मी काही वाईट म्हणत नाही. परंतु आपल्या आईच्या भक्तीहून त्या भक्तीची मी अधिक मातब्बरी समजत नाही. आपल्या जननीस लत्ताप्रहार करून राणीची भक्ती करण्यात विशेष आहे, असे मला वाटत नाही." अशी व्याख्याने देण्यात रमाबाईंनी मूर्खपणा केला, असे 'ज्ञानोदय' ने १ ऑगस्ट १८८९ च्या अंकात म्हटले आहे. एक खिस्ती झालेली बाई, खिस्तीधर्मीय सरकारविरोधात बोलते आहे याबद्दल 'ज्ञानोदय' कर्त्यांना खेद वाटत असावा.

आपल्या हृदयातील धगधगणारा स्वदेशाभिमान दाखविताना अमेरिकनांच्या स्वदेशाभिमानाविषयी, 'युनायटेड स्टेटसची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त' या ग्रंथात रमाबाई लिहितात, 'विलायतेहून आलेला चहा घेतल्याने व तिकडचे कपडे नेसल्याने माझ्या देशी उद्योगधंद्यास धक्का पोचत आहे, म्हणून मी तसला चहा मुळीच पिणार नाही व विलायती कपडेही नेसणार नाही. मोठे-छोटे कसले देशी कापड मिळेल तसलेच नेसेन, असे अमेरिकन मनुष्याने म्हटले व तशी कृति करून दाखवली आणि आम्ही काय केले? तर आम्ही आपले सोने देऊन विलायती जस्ताची भांडी घेतली, आपले मार्ग बंद करून विलायती स्वस्त कापड नेसायला लागलो. आम्ही काचेच्या चकाकणाऱ्या रंगीबेरंगी मण्यांच्या सौंदर्याला भुलून काचेचे मणी व मद्य भरून आणलेल्या काचेच्या बाटल्या घेऊन आपली रत्नभूमी परदेशी लोकांस विकून टाकली आणि आता त्या मद्याने आमचे प्राण जात आहेत. आणि त्या फुटक्या काचा आमच्या पायांना लागून आम्हास मोठाल्या जखमा होत आहेत. म्हणून आमचा देश इतका हीन अवस्थेत आहे.'७ आमची जीवनप्रणाली चुकल्यामुळे आपल्याच पायावर धोंडा पडला आहे. याबद्दल त्या चीड व्यक्त करतात.

भारताची राष्ट्रभाषा हिंदी असावी; म्हणून रमाबाईंनी मांडलेले विचारही मननीय आहेत. 'आमच्या देशात असलेल्या सर्व भाषा नाहीशा करून त्याच्या जागी इंग्रजी स्थापणे म्हणजे हिंदुस्थानाला समुद्रात बुडवून त्याच्याठिकाणी ब्रिटिश बेटे आणून ठेवण्यासारखे आहे. आमचे विद्वान, बुद्धिमान, विचारी लोक स्वदेशाची व स्वजातीची उन्नति करू पाहातात; तर आपल्या देशात सगळ्यांस समजण्यासारखी एक भाषा व ती, स्वदेशी भाषाच असणे अवश्य आहे. ही गोष्ट त्यांच्या ध्यानात कशी येत नाही. हिंदी भाषा हिंदुस्थानातील बहुतेक सर्व लोकांस समजते. हिंदी भाषा शिकवण्यासाठी फारसे श्रम घ्यावे लागत नाहीत. इंग्रजी प्रमाणेच हिंदीत पृथ्वीवरील सगळ्या भाषांचा समावेश होऊ शकतो. म्हणून तिची वाढ होण्याला काही अडचण नाही. असली अमोलिक सुरेख भाषा आपल्या, लभ्य असता आणि ती राष्ट्रीय भाषा करायचे इतके सुलभ असता, आमचे विद्वान बंधू हिंदुस्थानातील सार्वजनिक गोष्टींची वाटाघाट करण्याची ती, सातासमुद्राकडून आलेल्या प्राचीन मिसरी चित्रलिपीप्रमामे साधारण लोकांस न कळणाऱ्या इंग्रजी भाषेत काय म्हणून करतात, ह्याचा उलगडा ते करून देतील काय? ८ असा रोकडा सवाल त्या करतात. रमाबाईंना संस्कृत, कानडी, बंगाली, मराठी, हिंदी, इंग्रजी, हिब्रू, ग्रीक अशा अनेक देशी-परदेशी भाषा साऱ्या बारकाव्यासह अवगत होत्या. रमाबाई स्वतः कित्येक वर्ष परदेशात राहून आलेल्या होत्या. त्यांना उत्तम इंग्रजी येत होतं. इंग्रजी भाषेत त्यांचे ग्रंथलेखन व पत्रव्यवहार होत होता. तरीही

---

७ : युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त-पंडिता रमाबाई . (पृ. ३३७)

८: युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त (पृ. १८४-१८५)

आपल्या देशी भाषेचा, राष्ट्रभाषेचा, हिंदी भाषेचा पुरस्कार त्यांनी केलेला आहे.

स्वदेशी वस्तूंचा वापर, खादीच्या वस्त्रांचा वापर व स्व-भाषेबद्दलचे रमाबाईंचे हे विचार भारत देशाविषयी त्यांना असलेला अभिमान व देशनिष्ठा सूचित करणारे आहेत. पंडिता रमाबाईंचे कार्य काशीबाई कानिटकर आणि रमाबाई रानडे यांनाही प्रेरणादायी ठरले होते.९ पंडिता रमाबाई मद्यपान निषेधक स्त्रीमंडळाच्याही कृतिशील सदस्य होत्या. रमाबाईंच्या एकूणच कार्यकर्तृत्वाबद्दल १९७९ साली, कैंसर-ए-हिंद हा किताब त्यांना, सरकारने दिला.

केडगावमधील व पुण्यातीलही सदनांतील रमाबाईंचे प्रशासन कौशल्य अचंबित करणारे आहे. सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार, खरेदी-विक्री-विमापॉलिसी जमिनी व त्यावरील बांधकामाची व्यवस्था रमाबाई एकट्या बघत असत. शंभर एकर जमिनीत तेरा विहिरी खणून त्यातील पाण्यावर सभोवतीचा वैराण परिसर त्यांनी हिरवागार केला. जमिनीतून निघालेल्या दगडांचा वापर इमारती बांधण्यासाठी त्यांनी केला. ‘मुक्तिसदना’ त आश्रम परिसरात शाळा-हॉस्पिटल-पतित स्त्रिया, वृद्ध, अपंग, अनाथ, अंध स्त्रियांसाठी कृपासदन, प्रीतीसदन, बार्तमीसदन१० अशी सदने आणि छापखाना उभा केला. एका बाजूला हे व्यवस्थापन; तर दुसऱ्या बाजूला लेखन, ‘बायबल’ भाषांतर, घराबाहेर व शहर-गावाबाहेर व्याख्याने अशी विविध कामे रमाबाई एकाच वेळी करीत होत्या.

---

९: महाराष्ट्राची तेजस्विनी-पंडिता रमाबाई-देवदत्त नारायण टिळक. (पृ. ९४-९६)

१०: बार्तमीसदन : बार्तमी नावाच्या एका अंध व्यक्तीचा संदर्भ ‘बायबल’ मध्ये मिळतो, त्या नावाने पंडिता रमाबाईंनी अंधासाठी सदन उभारले.

# कर्तृत्वशालिनी

पंडिता रमाबाईंच्या एकूणच आयुष्याचा प्रवास खडतर असा आहे. रमाबाई सहा महिन्याची असताना त्यांची आई, रमाबाईंना टोपलीत घालून, ती टोपली डोक्यावर घेऊन प्रवासास निघाली होती. रमाबाईंच्या मृत्युनंतर त्यांची शवपेटिका 'मुक्तिमिशन' मधील मुलींनी खांद्यावर वाहून नेली, तोपर्यंत रमाबाईंचा प्रवास अव्याहतपणे चालला होता. या मधल्या काळातला त्यांचा प्रवास त्यांच्या स्वतःच्या पायावर, स्वबळावर झाला होता. आपल्या तरुण वयातील चार हजार मैलांचा भारतभरचा प्रवास तर त्यांनी आपल्या भावाबरोबर पायीपायीच केला होता. त्यांच्या प्रतिभेला पंख लाभल्यावर मात्र त्यांचा हा प्रवास भारताबाहेरही झाला. इंग्लंड, अमेरिका, जपान, इंडोनेशिया येथील प्रवास शारीरिक-मानसिक-बौद्धिक-आध्यात्मिक अशा अनेक पातळींवर त्यांना समृद्ध करणारा होता. जीवनविषयक आलेले भान आणि परिपक्वता यामुळे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेणे त्यांना सोयीचे झाले.

संस्कृत भाषा अवगत करून धर्मग्रंथांचे ज्ञान प्राप्त करणे त्यांच्या वडिलांच्या पुरोगामी वृत्तीमुळे व आईच्या प्रेरणादायी वृत्तीमुळे रमाबाईंना शक्य झाले. वडिलांच्या पुरोगामी विचाराचा वारसा पंडिता रमाबाईंनी पुढे चालवला. ज्या काळात बालविवाह होत होते, त्या काळात, आईवडिलांच्या हयातीत सोळा वर्षे उलटून गेल्यावरही त्या अविवाहित होत्या. घरातील सर्वजणांच्या मृत्युनंतर वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी विवाह करण्याचा निर्णय स्वतः घेतला. त्यांचा विवाह आंतरजातीय, आंतरप्रांतीय, प्रतिलोम आणि त्यामुळे नोंदणी पद्धतीने झालेला होता. पुरोगामी समजल्या जाणाऱ्या बंगालमध्येदेखील हा विवाह अनेकांना मान्य नव्हता. नोंदणी पद्धतीने केलेल्या विवाहाचे परिणाम आपल्या वैधव्यापर्यंत त्यांना भोगावे लागले.

कलकत्ता येथील सुधारकांच्या व अन्य ठिकाणच्या मेळाव्यात व विशेषत्वाने पुरुषांच्या सभेत संस्कृत भाषेत बोलणारी पहिली भारतीय महिला म्हणून रमाबाईंचा उल्लेख करावा लागेल. वैदिक काळातील गार्गी आणि मैत्रेयीनंतर इंग्रजी अंमलात संस्कृतमध्ये सभेत बोलणारी रमाबाई ही अशी सभा जिंकणारी महिला दिसते.

पंडिता रमाबाईंनी अतिशय धीराने आणि धाडसाने प्रतिकूल परिस्थितीवर मात केलेली आहे. मग तो आपल्या भावाबरोबरचा रानावनातून, काट्याकुट्यातून, श्वापदांनी भरलेल्या जंगलातून केलेला प्रवास असो, वा बुखारा बोटीवरून लहानगी मनोरमा व तिची मैत्रीण आनंदीबाई हिच्याबरोबर केलेला प्रवास असो. आपले आई, वडील, बहीण, भाऊ यांच्या मृत्युनंतर तसेच पती व मुलगी यांच्या मृत्युनंतरही केवळ शोक करीत न बसता लगेचच आपल्या कामास त्या सिद्धय झालेल्या आहेत.

समुद्रपर्यटन करणारी पहिली भारतीय महिला म्हणून आनंदीबाई जोशींचा उल्लेख केला जातो. आनंदीबाई जोशी डॉक्टर होण्यासाठी समुद्रमाग्रे अमेरिकेला गेल्या होत्या; तर पंडिता रमाबाई समुद्रमार्गे इंग्लंडला गेल्या होत्या. त्यामुळे इंग्लंडला जाणारी पहिली भारतीय महिला म्हणून पंडिता रमाबाईंचे नाव घ्यावे लागेल.

पंडिता रमाबाईंनी शेवटपर्यंत आपले विचार व आविष्कारस्वातंत्र्य जपले. कोणाच्याही प्रभावाखाली न येता ख्रिस्ती धर्मग्रंथांचा विचारपूर्वक अभ्यास करून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार जसा त्यांनी केला तसेच प्लेगच्या दिवसात सरकारी अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर टीका करून गव्हर्नरला निरूत्तर करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. आपल्या मातृभूमीची सेवा हे त्यांनी आपले आद्य कर्तव्य मानले होते. म्हणूनच इंग्लंडमध्ये धर्मांतर केल्यानंतरही वा अमेरिकेत शिक्षण घेतल्यानंतरही त्यांनी परदेशात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला नाही. महाराष्ट्र ही

त्यांनी आपली कर्मभूमी म्हणून निवडली व केडगावसारख्या आडमार्गावर असलेल्या गावी भारतभरातील उपेक्षित स्त्रियांनी आश्रय दिला.

आपली पाच वर्षाची मुलगी मनोरमा हिला मठवासिनींबरोबर इंग्लंडला पाठवून रमाबाई अमेरिकेत आपल्या सामाजिक कार्यात व शिक्षणात गढून गेल्या. भारतातही मठवासिनीच्या वसतिगृहात मनोरमेला ठेवून आपल्या कार्यासाठी त्या बाहेर पडत असत. वैधव्यानंतर प्रथमच त्या जेव्हा मुंबई व पुण्यात गेल्या. तेव्हाही त्यांनी मनोरमेला खिस्ती साध्वींकडे ठेवण्यांचा प्रयत्न केलेला होता.आपल्या लहानग्यांना पाळणाघरात वा वडिलधाऱ्यांकडे ठेवून बाहेर पडण्याचा प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अशा पद्धतीने झाला होता हे लक्षात घ्यायला हवे.

वाणी, लेखणी आणि कृति यांचा सुयोग्य संवाद साधून प्रबोधन करणारी कर्तृत्वसंपन्न विदुषी म्हणून महिला सुधारकांमध्ये रमाबाईंचे नाव अग्रणी आहे. आपल्या लेखणी आणि वाणीच्या बळावर अमेरिकेत 'पंडिता रमाबाई असोसिएशन' स्थापन करण्यास त्यांनी परकियांना प्रवृत्त केले. दहा वर्षेपर्यंत आर्थिक पाठबळ मिळवून मुंबई व पुण्यात स्त्रीशिक्षणविषयक संस्था स्थापन करणारी कृतिशील महिला म्हणून रमाबाईंचा उल्लेख केला जातो. हंटर कमिशनपुढे त्यांनी दिलेल्या साक्षीमुळे तर व्हिक्टोरिया राणीने भारतात स्त्रीवैद्य नेमण्याचा व स्त्रियांसाठी वेगळे दवाखाने घालण्याचा आदेश दिला होता.

पंडिता रमाबाईंनी ज्या तडफदारपणे महाराष्ट्रात प्रबोधनाचे, सामाजिक जाणीव-जागृतीचे कार्य आपल्या व्याख्यानांनी व लेखनाने केले होते. त्याच तडफेने आध्यात्मिक स्वरूपाचे कार्यही त्यांनी सुरू केले होते. 'शारदासदन' मधील धर्मांतराचे किटाळ उठविणाऱ्या पुण्या-मुंबईतील टीकाकारांना केडगावच्या 'मुक्तिसदन' मध्ये रमाबाईंनी उघडपणे उत्तर दिले. येथील स्त्रियांनी खिस्ताला पूर्णपणे ओळखावे म्हणून त्यांनी उघडपणे प्रार्थना आरंभिली. यावेळी टीकाकारांच्या प्रश्नाला उत्तर देण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही. समाजाच्या तळागाळातून

आलेल्या, समाजाने उपेक्षित ठरविलेल्या या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वासाठी, आत्मिक उन्नतीसाठी, ख्रिस्ती धर्माचा त्यांना आधार वाटला.

पंडिता रमाबाईंनी स्वयंस्फूर्तीने केडगावला 'मुक्तिसदन' सुरू केले. केडगाव येथील जमीन विकत घेतानाची त्यांची दूरदृष्टी वाखाणण्यासाठी आहे. प्लेगच्या काळात, मॅजिस्ट्रेटने फतवा काढल्याबरोबर रातोरात त्यांनी मुलींना पुण्यातून केडगावात हलविले. आधी त्या झोपडीवजा घरात राहिल्या. गुजरात-मध्यप्रदेश येथील दुष्काळातही, त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना भेटून, उपेक्षित स्त्रियांना घेऊन येणारी, त्यांना विनामूल्य आश्रय देणारी धीट व कनवाळू स्त्री म्हणूनही रमाबाईंचा उल्लेख करावा लागतो. 'मुक्तिसदन' ही उपेक्षित भारतीय स्त्रियांसाठी, परदेशी व देशी जनतेच्या आर्थिक मदतीवर-देणग्यांवर बांधलेली भारतातील एकमेव मोठी संस्था होती. त्याचे श्रेय रमाबाईंकडे जाते, ख्रिस्ती मिशनऱ्यांचा आदर्श जसा रमाबाईंसमोर होता, तसेच ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा जोतिराव फुले यांसारख्या, स्त्रियांसाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारकांचाही आदर्श त्यांच्यासमोर होता.

चरितार्थ संपादनाचे, पुरुषवर्गाचे सारे व्यवसाय स्त्री-जीवनात आणणारी आद्य प्रवर्तक म्हणून पंडिता रमाबाईंचे नाव घ्यावे लागते, केडगावसारख्या रुक्ष प्रदेशात विहीर खणणे, सुरुंग लावणे, बांधकाम करणे अशी कामेही स्त्रिया करीत. तिकडच्या जमिनीत पीक काढण्यापासून छापखाना चालविण्यापर्यंतची सारी कामे स्त्रिया करीत. केडगाव येथे रमाबाईंनी महिलांचा एक गावच वसवला होता. या गावात नवऱ्याने सोडून दिलेल्या, उपेक्षित, दुष्काळग्रस्त अशा अनेक प्रकारच्या स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या राहून सन्मानाने जीवन जगू इच्छित होत्या. 'जगातील अर्धा भाग स्त्रियांनी व्यापलेला आहे' असे म्हणणाऱ्या रमाबाईंनी त्यांची योग्य ती काळजी घेतली व त्यांच्या भविष्याची तरतूद करून ठेवली.

अंधासाठी 'बार्तमीसदन' नावाचे स्वतंत्र घर रमाबाईंनी बांधले. रमाबाईंची मुलगी मनोरमा स्वतः ब्रेललिपी शिकलेली होती. अंधांना लेखन-वाचनाची व विविध कला अवगत करण्याची संधी रमाबाईंनी 'मुक्तिसदन' मध्ये दिली.

किंडर-गार्टन ही शिक्षण पद्धती आपल्याकडील बालकांसाठी उपयुक्त ठरेल. असे वाटल्यावरून पंडिता रमाबाईंनी अमेरिकेत असताना, त्यांचे प्रशिक्षण घेतले, व ही पद्धाती प्रथमतः भारतात अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. काही क्रमिक पुस्तकांचे भाषांतरही त्यांनी केले होते, त्याचप्रमाणे अनौपचारिक शिक्षण देणारी शाळा म्हणून 'शारदासदन' ही बालविधवांसाठी चालविलेली शाळा अमेरिकेतील शिक्षणपद्धतीचाच परिपाक होता.

विविध ठिकाणचा प्रवास व वास्तव्य यामुळे रमाबाईंनी अनेक भाषा आत्मसात केल्या होत्या. सामाजिक परिस्थितीची माहिती करून घेण्यासाठी, तसेच, नवे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी भाषांची असलेली आवश्यकता व महत्त्व त्यांनी ओळखले होते. याच निवडीतून त्या ग्रीक व हिब्रू भाषा शिकल्या व 'पवित्र बायबल' चे मराठी भाषांतर करण्याचे मोठेच कार्य त्यांनी शिरावर घेतले. मूळ हिब्रू व ग्रीक भाषेतील 'बायबल' मराठीत आणणारी पंडिता रमाबाई ही पहिली भारतीय महिला आहे. 'पवित्र बायबल' ची जगभरातील भाषांतरे पुरुष अधिकाऱ्यांनी-धर्माधिकाऱ्यांनी केलेली आहेत, पंडिता रमाबाई ही ख्रिस्ती-जगतातील पहिली महिला आहे, हे विशेषत्वाने नमूद करावयास हवे.

विविध भाषा आत्मसात केलेल्या असल्या तरी हिंदी ही राष्ट्रभाषा असावी असा रमाबाईंचा आग्रह होता. खादीचे कपडे वापरण्यावरही त्यांचा भर होता. 'पवित्र बायबल' चे भाषांतर करताना भारतीय संकल्पना नाकारणाऱ्या रमाबाई आपला पोषाख, आहार, भाषा याबाबतीत मात्र पूर्णतः भारतीय राहिल्या.

गोडसे भटजी वरसईकर यांचे ‘माझा प्रवास’ हे मराठी साहित्यातील पहिले प्रवासवर्णन गणले जाते. त्यातील प्रवास १८५७ चा असला; तरी ते १९०७ साली प्रसिद्ध झालेले आहे. तथापि पंडिता रमाबाईंचे ‘इंग्लंडचा प्रवास’ हे प्रवासवर्णन १८८३ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले आहे. मराठीतील ते पहिले परदेश प्रवासवर्णन म्हणावे लागेल. शिवाय ते पत्ररूप असल्याने तत्कालीन परिस्थितीचे पडसादही त्यात उमटलेले आहेत.

पंडिता रमाबाई स्वतः कानाने अधू होत्या. त्यांच्या वैद्यकीय शिक्षणातील तो मोठाच अडसर होता. मात्र त्यांचा ‘आतला-आवाज’ त्यांना स्पष्टपणे ऐकू येत होता. प्रदूषित सामाजिक वातावरणात, अनिष्ट रूढीपरंपरात जखडून पडलेल्या अनेकांना बाहेर काढून त्यांची मने निरोगी करण्याचे, त्यांना आरोग्य देण्याचे काम त्यांनी केले. एका वेगळ्या रीतीने हे वैद्यकीय कार्यच त्यांनी केले.

केवळ धर्मातरामुळे पंडिता रमाबाई हिंदू समाजाचे लक्ष्य ठरली. ख्रिस्ती धर्मस्वीकार केलेला असला; तरी कोणत्याही ख्रिस्ती पंथातील पुरोहितशाही त्यांनी नाकारली. त्यामुळे कॅथलिक या पंथासह अनेक प्रोटेस्टंट पंथांनीही तिला आपले मानले नाही. रमाबाईंनी ख्रिस्त आणि त्याची शिकवण व त्यानुसार आचरण स्वीकारले होते. ख्रिस्तापर्यंत पोहोचण्यासाठी कोणा मध्यस्थाची गरज त्यांना वाटली नाही. आपले आत्मबळ आणि आध्यात्मिक शक्ती यावर आपल्या विरोधकांशी व आपल्या समर्थकांशीही त्या सडेतोडपणे, स्वच्छ विचारानिशी व मतस्वातंत्र्याला, आविष्कार स्वातंत्र्याला कोणत्याही प्रकारचा धक्का लागू दिला नाही. आपल्या विशुद्धा विचारांचे सोने त्यांनी शेवटपर्यंत जपले. त्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व झळाळून निघाले. आयुष्याच्या संध्याकाळी जरी त्या पूर्णपणे ख्रिस्तावर विसंबून होत्या, तरीही त्यांच्या सामाजिक कार्यावर त्याचा झाकोळ उमटला नाही. त्यांनी मानवता म्हणून ओळखण्यासाठी केलेली

प्रयत्नांची पराकाष्ठा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सदैव उर्जस्वल असेच राहिले आहे.

## पंडिता रमाबाईंचा जीवनपट

| | |
|---|---|
| २३ एप्रिल १८५८ — | कर्नाटकातील माळहेरंब येथे जन्म. मूळ नाव : रमा डोंगरे. |
| जुलै १८७४ — | वडील, अनंतशास्त्री डोंगरे यांचा मृत्यू. |
| ऑगस्ट १८७४ — | मातोश्री, लक्ष्मीबाई डोंगरे यांचा मृत्यू. |
| डिसेंबर १८७५ — | थोरली बहीण, कृष्णाबाई हिचा मृत्यू. |
| १८७५ ते १८७८ — | बंधू श्रीनिवास शास्त्रींबरोबर भारतभ्रमण. |
| १८७८ — | कलकत्ता येथे आगमन व तेथे 'पंडिता रमाबाई सरस्वती' ही पदवी प्राप्त. |
| ८ मे १८८० — | बंधू श्रीनिवास शास्त्री यांचे निधन. |
| १३ जून १८८० — | बाबू बिपिन बिहारी मेधावी यांच्याशी विवाह. |
| १६ एप्रिल १८८१ — | कन्या, मनोरमा हिचा जन्म. |
| ४ फेब्रुवारी १८८२ — | बिपिन बिहारी मेधावी यांचे निधन. |
| मार्च १८८२ — | रमाबाईंचे कन्येसह पुण्यात आगमन. |
| १ मे १८८२ — | पुण्यात 'आर्य महिला समाज' ची स्थापना. |
| ३० नोव्हेंबर १८८२ — | मुंबईत 'आर्य महिला समाज' ची स्थापना. |
| १८८२ — | 'स्त्रीधर्मनीती' हे पहिलं मराठी पुस्तक प्रकाशित. |
| फेब्रुवारी १८८३ — | 'हंटर एज्युकेशन कमिशन' समोर साक्ष. |
| २० एप्रिल १८८३ — | मनोरमेसह इंग्लंडला प्रयाण. |
| १७ मे १८८३ — | इंग्लंडमधील 'सेंट मेरीज होम' वॉण्टेज येथे प्रवेश. |
| १८८३ — | 'माझा इंग्लंडचा प्रवास' हे पत्ररूप लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित. |
| २९ सप्टेंबर १८८३ — | ख्रिस्तीधर्मस्वीकार. |
| १७ फेब्रुवारी — | इंग्लंडहून अमेरिकेस प्रयाण. |

| | |
|---|---|
| १८८६ | |
| ६ मार्च १८८६ | — अमेरिकेत आगमन. |
| १८८७ | — फिलाडेल्फियात वास्तव्य. अमेरिकेतील अनेक ठिकाणी प्रवास व व्याख्याने. अमेरिकन ‘रमाबाई असोसिएशन’ ची स्थापना. |
| १८८८ | — ‘The High Caste Hindoo Woman’ हे पुस्तक प्रकाशित. |

| | | |
|---|---|---|
| ११ नोव्हेंबर १८८८ | — | चीन व जपानमार्गे परतीच्या प्रवासास प्रारंभ. |
| फेब्रुवारी १८८९ | — | कलकत्ता येथे आगमन. |
| मार्च १८८९ | — | पुण्यात आगमन. |
| ११ मार्च १८८९ | — | मुंबईत 'शारदासदन' ची स्थापना. |
| १८८९ | — | 'युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त' हे मराठी पुस्तक प्रकाशित. |
| डिसेंबर १८८९ | — | 'इंडियन नॅशनल काँग्रेस' समोर भाषण करणारी पहिली स्त्री प्रतिनिधी. |
| २६ जुलै १८९१ | — | 'शारदा सदन' पुण्यास हलविले. |
| १८९६ ते १८९७ | — | दुष्काळातील मदत कार्य. |
| जानेवारी ते | — | |
| ऑगस्ट १८९८ | — | अमेरिकेला दुसऱ्यांदा भेट. |
| २४ सप्टेंबर १८९८ | — | केडगाव येथे 'मुक्तिसदन' चा शुभारंभ. |
| १९००-१९०५ | — | ख्रिस्तीधर्म प्रसाराचे व धार्मिक स्वरूपाच्या लेखनाचे कार्य. |
| १९०५-१९२२ | — | 'बायबल' भाषांतराचे कार्य. |
| २४ जुलै १९२१ | — | कन्या मनोरमा हिचा मृत्यू. |
| ५ एप्रिल १९२२ | — | पंडिता रमाबाईंचा मृत्यू. |

## पंडिता रमाबाईंची प्रसिद्ध झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | देववाणी परिदेवितम् | → | पंडिता रमाबाई विरचितं काव्यम् (संस्कृत), १८८१. एकूण २६ कडवी. |
| | दोन संस्कृत श्लोक | → | ख्रिस्तविषयक संस्कृत श्लोक. |
| २. | स्त्रीधर्मनीति (मराठी) १८८२, | | |
| | प्रकाशक | : | वामन गोविंद रानडे, ज्ञानप्रकाशक, पुणे, |
| | पृष्ठे | : | ८ + १४५ |
| ३. | इंग्लंडचा प्रवास (मराठी) १८८३ | | |
| | प्रकाशक | : | सदाशिव पांडुरंग केळकर, इंडियन प्रिटिंग छापखाना, मुंबई, |
| | पृष्ठे | : | ४७ |
| ४. | वेदांतसार (हिंदी अनुवाद) १८४३-(लेखरूपाने संग्रहित) | | |
| ५. | The High Caste Hindoo Woman (इग्रंजी) १८८७ | | |
| | प्रकाशक | : | फिलाडोल्फिया, अमेरिका |
| | पृष्ठे | : | १९ + ५१ |
| ६. | युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त (भाग-१) मराठी १८८९ | | |
| | प्रकाशक | : | मुंबई निर्णयसागर छापखाना |
| | पृष्ठे | : | ३६० |
| ७. | शालेय क्रमिक पुस्तके (भाषांतर) (इंग्रजीतून मराठी) १८९२ शारदीय वाचनपाठ, प्रथमपाठ | | |

प्रकाशक : पंडिता रमाबाई, आर्कनेज छापखाना, पुणे

८. Famine Expepince in India (इंग्रजी) १९००

९. यीसूजीके गीत (हिंदी) १९०२

१९०४ ते १९०५ या काळात प्रसिद्ध झालेली पुस्तके पुढीलप्रमाणे :-

१०. देव प्रीती आहे (मराठी)

११. मी किती सोसू (मराठी)

१२. रोजचा उजेड (मराठी)

| | |
|---|---|
| १३. | उद्या येणार आहे (मराठी) |
| १४. | पवित्र आत्म्याने व अग्नीने बाप्तिज्मा (मराठी) १९०६ |
| १५. | आत्मे जिंकणे (भाषांतर) (इंग्रजीतून मराठी) १९०८, पृष्ठे : १२२ |
| १६. | इबरी व्याकरण- १९९८ (हिब्रू भाषेचे व्याकरण), पृष्ठे १९०८ |
| १७. | एक गोष्ट (मराठी) १९०८ |
| १८. | शास्त्रकथा (मराठी) |
| १९. | प्रभू येशूचे चरित्र – १९१३ (मराठी), पृष्ठे ३६० |
| २०. | जार्ज मुल्लरची साक्ष- (मराठी) १९९४, पृष्ठे ४१ |
| २१. | येशू येणार आहे (भाषांतर) (इंग्रजीतून मराठी) १९१६ |
| २२. | सकाळ संध्याकाळची प्रार्थना (मराठी) १९१६ |
| २३. | भविष्यकथा- १९१७ (मराठी) पृष्ठे ७ + २४७ |
| २४. | A Testimony (इंग्रजी) १९१७, पृष्ठे ५६ |
| २५. | माझी साक्ष (भाषांतर), इंग्रजीतून मराठी अनुवादः रेव्ह. आर. जोशी, |
| | केडगाव. पहिली आवृत्ती : १९६८, दुसरी आवृत्ती : १९७० |
| | अनुवाद- मिस. आर. आढाव, पृष्ठे ५५ |
| २६. | गीते (पुस्तक दुसरे)१९१७, पृष्ठे : ७४ |
| २७. | पवित्र शास्त्रातील गीते (हिब्रूमधून मराठी भाषांतर) १९१९, पृष्ठे : १२३ |
| २८. | मूळज्ञान- (दुसरी आवृत्ती) १९२१, पृष्ठेः ९५ |
| २९. | गीतांची स्वरमालिका- १९२१, पृष्ठे ४१ |
| ३० | पवित्र शास्त्र (हिब्रू व ग्रीक या मूळ भाषांतून मराठीत भाषांतर) |
| | १९२४ साली प्रसिद्ध, पृष्ठेः १७१७ |
| ३१. | Mukti Prayer Bells & News letter (इंग्रजी वार्तापत्र) |
| ३२. | Letters & Correspondence Of Pandita Ramabai |

| | |
|---|---|
| | १८८४-१९०४ पर्यंतचा पत्रव्यवहार, पृष्ठे ३६ + ४३५ |
| | प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती |
| | मंडळ, मुंबई १९७७ |

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**
**महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत मालिकेतील चरित्रग्रंथ**

| | | |
|---|---|---|
| १) एस.एम. जोशी | श्री. ग.प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) मामासाहेब जगदाळे | श्री. व.न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव | रु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाटील | ४०/- |
| १० | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११ | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२ | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागिरदार | रु. ४५/- |
| १३ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४ | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५ | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही.डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६ | स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रु. ४५/- |
| १७ | पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८ | भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५५/- |
| १९ | धोंडो केशव कर्वे | डॉ. न.म. जोशी | रु. ४०/- |
| २० | लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ४०/- |
| २१ | यदुनाथ थत्ते | डॉ. मु.ब. शहा | रु. ४०/- |
| २२ | गोविंदभाई श्रॉफ | डॉ. विजय दिवाण | रु. ४५/- |
| २३ | लोककवी शाहीर रामजोशी | डॉ. शिरीष गंधे | रु. ४५/- |
| २४ | वसंतराव नाईक | डॉ. उत्तम रुद्रवार | रु. ३५/- |
| २५ | महात्मा फुले | श्री. श्रीराम गुंदेकर | रु. ४०/- |
| २६ | स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव | श्री. व्यंकटेश कामतकर | रु. ४६/- |
| २७ | ना.ग. गोरे | श्री. ग.प्र. प्रधान | रु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३५/- |
| २८ | शंकरराव चव्हाण | डॉ. सुरेश सावंत | रु. ४५/- |

| **मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे** | **अधिक माहिती/चौकशीसाठी** |
|---|---|
| सर्व शासकीय ग्रंथ भांडार<br>मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते | सचिव,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,<br>पु.ल. देशपांडे कला अकादमी.<br>दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,<br>सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००१४<br>दूरध्वनी – २४२२६१५६/२४३२५९२९ |

| महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास | शां.भा. देव | |
| | प्रागैतिहासिक महाराष्ट्र | | |
| | (खंड पहिला भाग – १) | | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास | संपादक गो. त्र्यं. कुलकर्णी | |
| | (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र | प्रा. म.श्री. माटे | |
| | (सामाजिक आणि सांस्कृतिक | | |
| | जीवन) | | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील | अनुवादक हेमकांत बळकुंदी | |
| | प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | | रु. २९५/- |
| ५) | पं. जवाहरलाल नेहरू | संपादक बा.ह. कल्याणकर | |
| | व्यक्ती आणि कार्य | | रु. १४०/- |
| ६) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा.ना. कुबेर | रु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १०९/- |
| ७) | मराठी वाङ्मायकोश खंड-४ | समन्वय संपादक | रु. ३२०/- |
| | | डॉ. विजया राजाध्यक्ष | |
| ८) | दादासाहेब गायकवाड | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| | काल आणि कर्तृत्व | | |
| ९) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि.श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १०) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| ११) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शंकुतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| १२) | मराठी वाङ्मीयकोश | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |
| | खंड-२, भाग – १ | | |
| १३) | महाराष्ट्राचा इतिहास | डॉ. वि.गो. खोबरेकर | रु. २७५/- |
| | मराठा कालखंड, भाग-१ (शिवकाल) | | |
| **मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे** | | **अधिक माहिती/चौकशीसाठी** | |

| | |
|---|---|
| सर्व शासकीय ग्रंथ भांडार<br>मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व<br>महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते | सचिव,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,<br>पु.ल. देशपांडे कला अकादमी.<br>दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,<br>सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००१४<br>दूरध्वनी – २४२२६१५६/२४३२५९२९ |

## डॉ. सिसिलिया कार्व्हालो

डॉ. सिसिलिया कार्व्हालो या महाराष्ट्रातील एक नामवंत कवयित्री आहेत. आपलं जगणंच त्यांनी आपल्या शब्दात थाटलेलं आहे. काव्यलेखनाबरोबर ललितगद्य, कथा, संशोधन, आस्वादन, संपादन, लोकसाहित्यविषयक अशा विविध प्रकारचं लेखन त्यांनी केलेलं आहे. त्यांचे हे लेखन वाचक-रसिकप्रिय ठरलेले आहे. ललित लेखनाबद्दल महाराष्ट्र राज्य शासनाचे दोन पुरस्कार आणि अन्य अनेक पुरस्कारांनी महाराष्ट्राने त्यांना सन्मानित केलेले आहे. मराठी साहित्याचे अध्ययन व महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवरील मराठी भाषा व साहित्याचे अध्यापन त्यांना समृद्ध करीत गेलेले आहे.

फेब्रुवारी २००० या वर्षी नाशिक येथे झालेल्या ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले असून, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या ‘युवकभारती’ (इयत्ता अकरावी) या पाठ्यपुस्तकाचे संपादक म्हणून त्यांचे कार्य, जागतिक मराठी अकादमीतर्फे जगभरातील मराठी माणसांना एकत्र आणण्याच्या कामी ‘शोध मराठी मनाचा’ या कार्यक्रमांतर्गत केलेले कार्य मोलाचे ठरले आहे. स्थानिक व राज्यपातळीवरील मराठी भाषेची सेवा व सामाजिक प्रबोधनपर कार्यातील त्यांचा सक्रिय सहभाग नेहमीच प्रेरणादायी ठरलेला आहे.

पंडिता रमाबाईंच्या प्रगत विचारांचा वारसा चालवणारी व स्त्रियांच्या प्रश्नांवरील प्रबोधनकर्ती म्हणून सिसिलिया कार्व्हालो यांचे ‘महाराष्ट्राचे शिल्पकार : पंडिता रमाबाई’, या पुस्तकाचे स्वागत होईल अशी आशा आहे.